# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - १ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय -** मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .
मा.सभापती साहेब - मागील सभेचे विषय आपणच मंजूर केलेले आहेत.
मा.श्री गंधे मि.स.- ठिक आहे.

**ठराव** - मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री
अनुमोदक - मा.श्री
ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - २ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - २ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय -**अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस परिवहन उपक्रम सेवा बी.ओ.तत्वावर सुरू करणे कामी मनपाचे अटी शर्ती व नियमा नुसार अभिकर्ता नेमणे साठी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** -अहमदनगर शहर बस वाहतुकी बाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेचे अटी शर्ती व नियमानुसार अभिकर्ता नेमणेसाठी दै.लोकमत दि.१२/११/२००५ रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात येवून ११/१२/२००५ अखेर निविदा फॉर्म विक्री ठेवण्यांत आणिी होती. सदर काळामध्ये एकूण ६ निविदा फॉर्म रु.५००/- ) प्रमाणे विक्री झालेली आहे. दि.१४/१२/२००५ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यत सहा पैकी एकूण चार निवीदा वेळेत व मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत.सदरील मोहरबंद चारही निविदा १. मे.एस ए.करीन ट्रानसपोर्ट ॲण्ड २. हुंडेकरी मोटर्स प्रा. ३. नाथ टुरीस्ट सेवा संघ ४. अहमदनगर प्रवाशी व माल वहातुक सहकारी संस्था मर्यादित यांचे समक्ष तसेच मा.आयुक्त साहेब,मा.उपायुक्त साहेब ,मेकॅनिकल इंजिनिअर यांचे समक्ष मा.आयुक्तसाहेब यांचे कार्यालयात उघडण्यांत आलेल्या आहेत. सदर निविदा समक्ष उघडून त्यावर मा.उपायुक्त साहेब व ऑडीटर साहेब यांच्या स्वाक्ष-या देखील घेणेत आलेल्या आहेत.

अहमदनगर शहर बस वाहतुकी बाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेचे अटी शर्ती व नियमानुसार अभिकर्ता नेमणेसाठी आलेल्या निविदाचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

| मे.एस ए.करीम ट्रान्सपोर्ट ॲण्ड ट्रव्हल्स सर्जेपुरा रोड,फकीर गल्ली अहमदनगर | हुंडेकरी मोटर्स प्रा.लिमिटेड मनमाड रोड ,सावेडी अहमदनगर. |
|---|---|
| सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.५अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८४९ अन्वये बयाणा रक्कम डी डी द्वारे भरली आहे. निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ५% स्वामीत्व धन (रॉयल्टी )दिल्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. | सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.६ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८५० अन्वये बयाणा रक्कम डी डी द्वारे भरली आहे.<br>निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातुन रोजच्या उत्पन्नातून मनपास ६% स्वामीत्व धन (रॉयल्टी )दिल्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. |

सादर,

अहमदनगर शहर बस वाहतुकीबाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेच्याअटी शर्ती व नियमानुसार आभिकर्ता नेमणे कामी एकूण चार निविदाचा तुलनात्मक तक्ता केला असता चारही निविदा धारकांनी नियमा प्रमाणे बयाणा रक्कम,कागदपत्रे जोडलेली आहेत. शहर बस सेवेच्या दैनंदिन उत्पनावर सर्वात जास्त स्वामीत्व धन (रॉयल्टी) अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक

सहरकारी संस्था मर्या .यांनी ७.२% इतके देण्याचे मान्य केले असून उत्कृष्ट सेवा देण्यांचे देखील नमूद केले आहे.

अहमदनगर मनपास फायदा होण्याचे दृष्टीने असे नागरिकांचा विचार करता सदर निविदा काराने नमूद केलेले ७०२%रॉयल्टी व उत्कृष्ठ सेवेचा विचार करता अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक सह .संस्था यांचे निविदेस मंजूरी मिळणेस तसेच कार्यवाही करणेस व सदरचा तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समिती यांचेक कडेस मंजूरीस्तव पाठविणेस मंजूरी मिळावी. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

| नाथ टुरीस्ट सेवा संघ गवळीवाडा भिगार | अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या .अ.नगर |
|---|---|
| सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.२ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रामणे सा.पा.नं. ९०८५१ अन्वये आहे. निविदे सोबत आवश्यक असणारी कागद पत्रे अपुरी आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ५.४% स्वामीत्व धन (रॉयल्टी )देण्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. | सदर निविदार काराने निविदा फॅार्म नं.४ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८५२ अन्वये बयाण रक्कम डी डी द्वारे भरली आहे. निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बससेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ७.२% स्वामीत्व ध्न (रॉयल्टी )देण्याचे निविदेमध्ये नमूद केले आहे. |

मा.सादर,

अहमदनगर शहर बस वाहतुकी करिता खाजगी अभिकर्ता नेमून बससेवा सुरू करणेच्या दृष्टीकोनातून जादा देकार देणा-याची जाहीर निविदा मागविली अता ,अ.नगर प्रवासी व माल वाहतुक संस्था अ.नगर यांचक सर्वात जादा म्हणजेच एकूण उत्पन्नावर ७.२% (सात पूर्णांक दोन टक्के) साठी रायल्टी मनपास देणारी निविदा प्राप्त झालेली आहे.

मुख्य लेखा परिक्षक - मेक. इंजि. यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित यांची सर्वात अधिक ७०.२% ने निविदा प्राप्त झालेली आहे. सबब जादा दराची निविदा स्विकारणेस हरकत नाही. तथापी मा.स्थायी समितीने निणर्य घेणे बाबत आदेशार्थ .

मा.उपायुक्त कर - मेकॅनिकल इंजिनिअर यांचे कडील प्रस्ताव व मुख्य लेखा परिक्षकांच्या अभिप्राया प्रमाणे प्रस्ताव मंजूरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री गंधे मि.स.- माहिती सांगा .

मा.उपायुक्त साहेब (सा) - आपण बी.ओ.तत्वावर खजणगी करणतून बस सेवा चालनविण्यांस देणार आहेत. त्यांना तिकीटे ही आपण छापून देणार आहेता अभिकर्ता नेमणे साठी निविदा मागविल्या आहेत . ७.२% टक्के जास्तीचे रॉयल्टी निविदा आली आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- हुंडकेरी यांची सहा टक्केची निविदा आहे. त्यांचे कडेस माल वाहतुकीसाठी शंभर दिडशे ट्रक आहेत. या व्यावसायातील त्यांचा अनभव जास्त आहे. जादा रॉयल्टी देणारे संस्थेस अनुभव आहे का?त्यांचा अनुभव पाहून मनपाचा फायदा करील त्याचा विचार करावा.

मा.श्री जोशी अ.सु.- हुंडेकरी माल वाहतुकी साठी प्रसिध्द आहे. तरी ही संस्था प्रवासी वाहतुकीसाठी अनुभवी आहे.
मा.श्री गंधे मि.सं.- हुंडकरी यांनी कमी रॉयल्टी दिलेली आहे.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- त्यांना निगाशिएशन साठी बोलवावे.
मा.उपायुक्त साहेब (सा) - आता निगोशिएशन करता येत नाही.
मा.श्री गंधे मि.स.- त्यांनी आर टी ओ एस टी इत्यादी कडील परवाने घेतले आहेत का?
मा.उपायुक्त साहेब (सा) - परवाने घेणे कामी आपण मदत करावयाची आहे.
मा.श्री गंधे मि.स.- त्यास किती कालावधी लागु शकेल.
मा.उपायुक्त साहेब (सा) - दिड ते दोन महिने किंवा त्या पेक्षा जास्त ही कालावधी लागु शकेल.
मा.श्री बारस्कर पो.ज.- बस कुठपर्यत जाणार रूट ठरवून द्या.
मा.सभापती साहेब -बस मार्ग ठरलेलले आहेत.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- अनुभवी संस्थेस ठेका द्यावा.
मा.उपायुक्त साहेब (सा) - प्रोसिजर प्रमाणे कार्यवाही झाली आहे जादा रॉयल्टी देणा-या निविदा नकारणे बाबतची कारणे द्यावी लागतील.
मा.श्री लोंढे सु.सो.- माहिती सांगा.
मा.उपायुक्त साहेब (सा) -हा विषय सभेपुढे दोनदा आला आहे. बरीच चर्चा झाली आहे.प्रकरण पाहून आपणांस माहिती घेता येईल?
मा.श्री लोंढे सु.सो.- प्रस्ताव ज.बो.मध्ये जाउ द्या  फेर निवीा काढाव्यात
मा.श्री जोशी अ.सु.-नागरीकांचे जिव्हाळयाचा प्रश्न आहे.
मा.श्री गंधे मि.स.- निविदा धारकांनी निविदा भरते वेळी काळजी घेणे चांगले हुंडेकरी यांनी कमी रॉयल्टी टेंडर भरले आहे.
मा.उपायुक्त साहेब (सा) - टेंडर भरणारी संस्था अपात्र ठरत नाही ती पर्यत आपण काही करू शकत नाही. टेंडर नकारता येणार नाही.
मा.श्री गंधे मि.स.- बयाना रक्कम किती
मा.उपायुक्त साहेब (सा) - बयाना रक्कम रूपये पन्नास हजार व बँन्क गॅरंटी पंचवीस लाख ठरवलेली आहे.
मा.श्री गंधे मि.स.-त्यांनी अटी शर्तीच भंग केल्यास सदर रकमा जप्त करता येतील.
मा.श्री .त्रिपाठी सु.चं.- जकातीचा निर्णय आपण बदलू शकलो नाही.विचार करून निर्णय घ्यावा.
मा.उपायुक्त साहेब (सा) - अटी शर्ती ठरल्यानुसार निविदा मागविल्या त्याकश्श बदलणार.
मा.श्री जोशी अ.सु.- बस सेवे बाबत,अटी शर्ती बाबत तक्रार आल्यास सेवाअसमाधान कारक असल्यास आपण कार्यवाही करू शकतो. फेर विचार करता येईल.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- ठेकेदाराने चुका केल्यास आपण कार्यवाही करू पण जकात ठेकेदार एस्कॉर्ट जास्त घेतो हे सर्वांनी पाहिले काय कार्यवाही झाली.
मा.श्री गंधे मि.स.- इथे त्यांचे उत्तर घ्यावे.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- दहा वर्षा साठी बस सेवा चालविण्यांस देणार आहोत बॅन्क गॅरंटी पन्नास लाख करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- आपल्या मिटींगला जागा अपुरी पडते अधिका-यांना बसण्यास जागा नाही.
मा.सभापती साहेब - पुढील मिटींग सभागृहात घेउ.

मा.श्री जोशी अ.सु.- प्रस्ताव मंजूर करावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- अटी शर्ती काय आहेत बयाना रकमेचा डी.डी नॅशनलाईन बॅन्केचा हवा होता त्या ऐवजी सहकारी बॅन्केची पे स्लीप घेतली. बॅन्करचा चेक चालत नाही टेंडर अटी शर्ती नुसार नाही.
मॅकेनिकल इंजि.- डी डी. पाहिजे होता शहर सहकारी बॅन्केची पे स्लीप आणली होती.
मा.उपायुक्त साहेब (सा) - बॅन्कर्स चेक ही डिमांड ड्राफ्र आहे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- बसचे रंग फिक्स करणेचे ठरले होते.
मॅकेनिकल इंजि.- बसचे रंग शासन ठरवून देणार आहे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- रंग सदस्यांनी ठरवावा असा सहा महिन्या पूर्वी विषय होता टेंडरचे वेळी ठरवू असे ठरले होते तसेच आम्हाला तसे पत्र का दिले नाही.
मा.सभापती साहेब - आपण रंगा बाबत सुचना करू शकतो.
मा.श्री गंधे मि.स.- शासन ठरविणार असेल तर आपण चर्चा करून काय निष्पन्न होणार.
मा.श्री चव्हाण दि.ना.- एका टेंडरला एक नियम दुस-यास वेगळा एकाला डी.डी.दुस-याला बॅन्क गॅरंटी असे करता येणार नाही या अगोदर एक टेंडर नाकारले होते .वर्क ऑर्डर घेतली तर पंचवीस लाख जप्त करणार.
मा.उपायुक्त साहेब (सा) - पंचवीस लाख भरल्या शिवाय वर्क ऑर्डर देणार नाही.
मा.श्री . गंधे मि.स.-७.२% रॉयल्टीचे टेंडर मंजूर करावे.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.-जनतेच्या सेवेसाठी आपण बस सेवा देत आहोत. वीस हजार लोकांचे जीवन रिक्ष धंदयावर अवलबुन आहे. त्याचेशी बैठक घ्यावी. विचारविनिमय करून निर्णय घ्यावा.
मा.सभापती साहेब - विषय ज.बो. मध्ये मंजूरीस असतांना आपण त्याचाउल्लेख केला नाही.
मा.श्री उडाण शिवे भा.भि.- त्यांचा विरोध असल्यास त्यांचेशी चर्चा करावी.
मा.सौ.वर्षा आरिफ - आता हा विषयच राहिला नाही. बी.ओ तत्वावर देण्याचे ठरले आहे. कार्यवाही करावी.
मा.सभापती साहेब - रिक्षा बसचे मार्ग वेगवेगळे आहेत.
मा.श्री गंधे मि.सं.- बस शहराबाहेर चालणार आहेत.
मा.श्री जोशी अ.सु.- सी.टी बसची आमचे भागातील लोकांची मागणी आहे.सार्वजिनक हिताचा विषय आहे. बस सेवा सुरू होणे गरजेचे आहे.
मा.श्री गंधे मि.स.- महिलासाठी बसमध्ये ५०% आरक्षण ठेवावे.
मा.उपायुक्त साहेब (सा) - मा.स्थायी समितीने ठरवावे.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.- पुढे वाद होण्या अगोदर रिक्षा संघटनेला पत्र द्यावे बैठक घ्यावी त्यांच्या शंकाचे समाधान करावे मग निर्णय घ्यावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- आर.टी.ओ. एस टी शासन इत्यादीच्या परवानग्या कोण घेणार त्याला मर्यादा नाही.
मा.उपायुक्त साहेब (सा) - आपण त्यांना मदत करणार ठराविक दिवसात त्याने त्या घ्याव्यात अशी टत त्याला घालून देउ.
मा.श्री चव्हाण दि.ना.- परवानग्या घेण्यांस ७/८ महिने जाणार बस सेवा सुरू करणेस किती मुदत देणार नंतर डिझेलचे भाव वाढले काही झाले तर ठेकेदार बस सेवा सुरू करणार नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - तीन महिन्याची मुदत टाकू काही त्रुटी राहिल्या (मुदतीच्या) त्या आता पूर्ण करू.
मा.श्री गंधे मि.स.- वर्क ऑर्डर अटी शर्ती सह द्यावी त्यांने त्रुटी ठेवल्यास शिक्षेची तरतूद असावी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ३ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ३ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज रस्त्याचे मजबूती करण करणे कामी मंजूर अंदाज पत्रका (निवीदा) व्यतिरिक्त खडीकरण व पाईप गटरचे कामास व मूळ अंदाज पत्रकातील बचती मधून रक्कम रूपये ८,०८.२४१/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट ओदशार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती रिपोर्ट कि, सदरील कामाचे मंजूर एस्टीमेट मध्ये वेटमिक्स W.B.M.ची मंजूरी आहे. सदर ठिकाणी काळी मातीची जमीन आहे. त्यामुळे वारंवार जमीन खचली जाते. सदर ठिकाणी फर्शी लोखंड, सिमेंटचे दुकाने आहेत. त्यांचे कडे ज्यादा वजनाच्या (Heavyloaded) वाहतुक असते. मुरूम भराईचे केलेले काम ज्यादा वजनाच्या वाहतुकीमुळे ब-याच भागात खचल्याने वाहतुकीस अडथडा येत आहे. सदर कामाची मा.आयुक्त ,मा.उपायुक्त शहर अभियंता ,उपशहर अभियंता तसेच सदर कामाचे ठेकेदार व आर्किटेक्ट ,शाखा अभियंता यांनी समक्ष पहाणी केली व त्या रस्त्याचे परिस्थ्तिीचा विचार करून मुरूम भराई करण्यातआली तद्नंतर सदर रस्त्याचे काळया मातीचे थराची प्रयोगित चाचणी शास्त्रीय प्रयोग शाळे मध्ये केली. त्याची सी.बी.आर (/crush Bearing ratio value )२.०९ येते. सदरचा रेशोहा निर्धारीत ८% पेक्षा कमी आहे.

त्या करिता वरील रस्त्याचे मजबुतीकरण करण्या करिता खडीकरण करणे आवश्यक आहे. श्री एन.सुमतीलाल यांचे दुकाना समोरील रस्त्यावरील तसेच जुने टिळक रोड येथून येणारे गटारीचे पाण तसेच पावसाळयात येणारे पाणी या रस्त्याच्या खालून जाणे जरूरीचे आहे. त्यासाठी ९०० एम.एम.एम.पी.-३ क्लास व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकून पाणी सिनानदीत सोडणे आवश्यक आहे, असे आर्किटेक्ट यांचे मत आहे. त्या बाबत आर्किटेक्ट यांनी लेखी पत्र दिले आहे.

आर्किटेक्ट यांचे रिपोर्टा प्रमाणे खडीकरण करिता रू.६,९४,६०१/- व पाईप गटर करण्याकरिता रू.१,१३,६४०/-असे एकूण रू.८,०८,२४१/- सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज चौका पर्यतच्या रस्त्यास ज्यादा खर्च करावा लागणार आहे.

सदरचा वाढीव खर्च एक्स्ट्रा ऑयटम (Extra item) हा मूळ अंदाजपत्रका मधील बचती मधूनच करावयाचा आहे. त्या करीता वाढीव तरतूद करावी लागणार नाही. मूळ अंदाजपत्रकात सदर ज्यादा कामाचा अंतर्भाव नाही.

मंजूर निविदा मधील शर्ती प्रमाणे सर्व सारधण ठेक्याचे अटी मधील कलम ७४/४ प्रमाणे निविदा व्यतिरिक्त कामाचा बाबी करावयाचे असल्याने संबधीत ठेकेदारस शहर अभियंता यांचे पत्रानुसार वरील बाबी अंदाजपत्रकीय दराध्ये करून घेण्यात आलेल्या आहेत.

तरी केलेल कामास व त्याकामी लागणारा खर्च रूपये ८,०८२४१/- ला मंजूरी करिता रिपोर्ट आदेशार्थ सादर.

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब सा - मा.स्थायी समितीकडे मंजूरी साठी सादर करणेस शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - मंजूर निविदेतील किती काम आहे. व किती व कोणते काम शिल्लक आहे या माहितीसह फेरसादर करा.

फेरसादर,

| | | |
|---|---|---|
| कामाची निवीदा | - | रक्कम १,१५,१४३००/- |
| आज अखेर एकूण कामावर झालेला खर्च व काम रू. | - | ७३,१३,९३५/- |
| उर्वरित डांबरीकरण व शुभोभिकरणाचे राहिलेले काम रू. | - | ४७,७४,९२८/- |
| शुशोभिकरणाचे कामातील बचत रक्कम रू . | - | ८,५०८९२/- |
| निविदा व्यतिरिक्त जादा कामासाठी लागणारी रक्कम रू. | - | ८,०८,२४१/- |

(रस्त्याचे मजबूतीकरण व पाईप गटार)

जादा कामामुळे मंजूर निविदा रक्कमे मध्ये वाढ होणार नाही सदर जादा कामाचे रू.८,०८२४१/- खर्चास मान्यता मिळणेसाठी आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त साहेब - अहवालानुसार मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - सहमत

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ४ दिनांक १९/१/२००६

ठराव क्रमांक - ४ दिनांक १९/१/२००६

प्रस्तावाचा विषय -अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील बुरूडगांव रोड वरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट जवळ टि.पी.स्की.नं. ३ फा.प्लॉ.नं.९२ मधील व्यायाम शाळेच्या कंपाउन्ड लगत दुकान गाळे बांधणेस व एस्टीमेट रक्कम रूपये १६,३८,२२७/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकूर - उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट कि, मा.शहर अभियंता ,मा.नगररचनाकार याचे समवेत दिनांक २४/२/०५ रोजी उपरोक्त ठिकाणी समक्ष पहाणी करणेत आली बुरूडगांव रोडवरील टी.पी.स्कीम नं.३ फायनल प्लॉट क्र.९२ मध्य मनपाचे मालकीचे श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट असून त्याचे दक्षिणेत मनपाची व्यायामशाळा असून व्यायाम शाळेच्या भोवती आर.सी.सी. कॉलम व वीट बांधकामाची संरक्षक भिंत बांधणेत आली आहे. सदर संरक्षक भिंतीचा आधार घेवून गाळे बांधणे बाबत झालेल्या चर्चे नुसार सदर ठिकाणी उत्तरेकडील भिंतीचा आधार घेवून २.५० मी.x ३.०० मी आतील आकाराची १८ दुकाने बांधता येतील.

सदर ठिकाणी काळी माती (b.l.Soil) असलेने पक्का पाया लागत नसलेने दगडी बांधकामाचा पायर करता येत नसलेने " पाईल फौंडेशन " करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २००४-२००५ सार्व बांधकाम विभागाचे दर सूची नुसार अंदाज पत्रक तयारकेले असता अंदाज पत्रकीय किमंत रू.१८ दुकानांसाठी रू.७,०३,२८२/- होत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे गाळे बांधणेस व येणारे रक्कम रू.७,०३,२८२/- चे खर्चास प्रशासकीय मान्यते साठी सविनय सादर.

शहर अभियंता - सदरची बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असल्यामुळे आपण व नगररचना विभाग याच्या कडील संयुक्त प्रस्तावा प्रशासकीय मान्यता घेवून कार्यवाही करणे योग्य

मा.उपायुक्त साहेब सा- व्यायाम शाळेच्या दक्षिण व उत्तर या दोन्ही बाजूस दुकान गाळे काढणे शक्य असलयास तशा प्रकारचा प्रस्ताव अंदाजपत्रक व नगररचनाकार यांचे अहवालासह सादर करा.

फेर सादर - उपरोक्त आदेशानुसार बुरूडगांव रोडवरील टी.पी. स्कीम नं.३ फायनल प्लॉट नं.९२ मधील अस्तित्वातील व्यायाम शाळेच्या दक्षिण उत्तर संरक्षक भिंतीचा वापर करून गाळे (दुकाने ) काढणेचे शक्यते बाबत मा.नगररचनाकार यांचे समवेत २.५० मी-x ३.०० आत आत मापाचे १९ दुकाने व उत्तरेकडील भिंतीलगत १७ दुकाने असे एकूण असे एकूण ३६ दुकाने बांधता येतील.

सन २००४-२००५ चे सार्व .बांधकाम विभागा कडील दरसुची नुसार अंदाज पत्रक तयार केले असता ३६ दुकानांसाठी रक्कम रू.१६,३८,२२७/-खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे दुकाने बांधणे व येणारे रक्कम रू.१६,३८,२२७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

शहर अभियंता - नगररचना विभागाचा अभिप्रायानुसार बुरूडगांव रोड वरील टि.पी.स्कीम नं.३ फायनल प्लॉट क्र.९२ मधील व्यायाम शाळेच्यासुरक्षा भिंतीच्या दोन्ही बाजूस ३६ दुकाने बांधता येतील असे कळविले आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,३८,२२७/- आहे. प्रशासकीय मान्यता मिळणेस सादर.

मा.उपायुक्त साहेब सा - शहर अभियंता ,नगररचनाकार व मुख्य लेखा परिक्षक यांचे अहवालानुसार मंजूरीसाठी शिफारस आहे. मात्र काम करतांना कामाचा 'A' व 'B' असे दोन भाग करून एक काम पूर्ण झाल्यानंतर प्रतिसाद पाहून दुसरे काम करणे उचित राहील. सन २००४-०५ चे अर्थ संकल्पीय अंदाजात हे काम करणे शक्य नसल्याने आगामी वर्षात म्हणजेच सन २००५-०६ चे अंदाजपत्रकातून काम करणे योग्य राहील आदेशार्थ सादर.

सन २००५-२००६ करिता तरतुद

| | | |
|---|---|---|
| नविन इमारत | - | १,००,०००/- |
| पेंडिग बिले | - | Nil |
| या प्रस्तावातील खर्च | - | १६,३८,२२७/- |
| एकूण खर्च | - | १६,३८,२२७/- |

सन २००५-२००६ करिता "नवीन इमारत " या लेखा शिर्षकांतर्गत रू.१.०० लक्ष तरतूद अंदाजपत्रकामध्ये करणेतआली असून बुरूडगांव रोडवरील टी.पी स्कीम नं.lll फायनल प्लॉट नं.९२ मनपाचे व्यायाम शाळेच्या दक्षिणोत्तर संरक्षक भिंतीलगत गाळे बांधणेचे रक्कम रूपये१६,३८,२२७/- अंदाज पत्रक तयार करणेत आले आहे.

सध्या पुरशी तरतूद नसलेने उपरोक्त कामाचा निविदा काढता येणार नाहीत. तरी आदेशार्थ सादर.

मा.शहर अभियंता - सन २००५-२००६ करिता नवीन इमारत या लेखा शिर्षकांतर्गत रू.१.०० लक्ष तरतूद आहे व कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,३८,२२७/- आहे तरी अर्थ संकल्प तरतूद नसल्यामुळे काम करणे / निविदा काढणे उचीत नाही. योगय आदेशार्थ सादर

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे अर्थ संकल्पीय तरतुद उपलब्ध नसलेमुळे तूर्त मान्यता देणे योग्य नाही.

मा.उपायुक्त साहेब सा - कलम १०१ अन्वये तरतुदीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावे.

फेर सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो कि, बुरूडगांव रोडवरील दुकाने ताबंधणे बाबत मा.महापौर साहेब यानी मागणी केली हे त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सन २००५-०६ हयाआर्थिक वर्षा मध्ये बुरूडगांव रोडवरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्के ट जवळ दुकाने बांधणेचा कामास रक्कम रूपये ५,००,००/- (पांच लाख)ची तरतूद करण्यांत आलेली आहे.सदरच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्म रूपये १६,३८,२२७/- इतकी आहे.

वरील ठिकाण्चा कामास समक्ष समितीची मान्यता घेणे टेडर काढणे,तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समितीपुढे ठेवणे व कार्यादेश इत्यादी बाबी करिता किमान दोन महिन्याचा कालावधी

लागणार आहे. त्यामुळे सन सन २००५-२००६ मधील अंदाजपत्रकीय तरतूद वरील ठिकाणेच प्राथमिक कामासाठी पुरेशी आहे. परंतु सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाच्या दोन उर्वरीत रक्कमेची तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी अंदाजपत्रकीय तरतूदीस अधिन राहून बुरूडगांव रोडवरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट जवळ दुकाने बाधंणेचा कामास समक्ष समितीपुढे ठेवणेच्या आदेशार्थ सादर.

शहर अभियंता - शाखा अभियंता यांच्या अहवालानुसार मंजुरीस सादर.

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे सदरचे काम पूर्ण करावयाचे झालेस सन २००६ -२००७ चे अदांज पत्रकीय तरतूदी मधे अंदाज पत्रकीय रक्कम तरतूद करून मा.मनपा सभेची मान्यता घेणे बाबत दक्षता घेणे आवश्यक सदरची जबाबदारी शहर अभियंता यांचे वर निश्चिीत करणेत यावी.

मा.उपायुक्त साहेब सा - वर्षाचा उर्वरित कालावधी विचारात घेता या वर्षात संपूर्ण रक्कम खर्च होवू शकणार नाही. त्यामुळे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - सहमत.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ५ दिनांक १९/१/२००६

ठराव क्रमांक - ५ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका लिपीक श्री संभाजी कार्ले फायर फायटर विभाग यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथील दि.९/१/०६ ते दि.७/४/०६ या कालावधीत होणा-या प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० करिता पाठविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये लिपीक अग्निशमन विभाग याजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो कि, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे सन २००५-२००६ मध्ये प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० आयोजित करणेत आलेला असून दि.२८/११/२००५ पर्यत प्रवेश अर्ज पाठविणे बाबत संदर्भीय पत्रकानुसार कळविणेत आलेले आहे.

सदरचे प्रशिक्षण हे दि.१५/१२/०५ ते दि.१२/३/०६ या कालावधीत असून सदरच्या प्रशिक्षणास माझी मनापासून जाण्याची तयारी असून व असलेल्या संपूर्ण अटी मी पूर्ण करीत आहे तसेच दि.१/१/२००५ ते दि.२४/६/२००५ या कालावधी मध्ये प्रभारी फायर इनचार्ज म्हणून मी यशस्वीरित्या काम केलेले आहे. तरी सदरच्या प्रशिक्षणास घेण्यासाठी मला जाणेस व प्रशिक्षण पूर्ण करणेस मान्यता मिळावी हि विनंती.

मा.उपायुक्त साहेब कर - श्री कार्ले यांनी यापूर्वी प्रभारी फायर इनचार्ज म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. प्रस्तावीत प्रशिक्षणासाठी श्री कार्ले यांचा प्रवेश अर्ज राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे कडे पाठविणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - सहमत.

फेरसादर,

उपरोक्त विषयान्वये मुख्या अग्निशमन अधिकारी याजकडून फेर विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो कि, मा.अग्निशमन सल्लागार यांचे कडील पत्र क्र. ५६५ रा.अ.प्र.के अन्वये राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० (पुरस्कृत) यापाठयक्रमाकरिता आग्निशमन सेवेतील कर्मचा-यांचे अर्ज विहीत नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दि.२८/११/०५ पर्यत मा.अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालयात पाठविणे बाबत कळविणेत आले हाते.

त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांचे मंजुरीने श्री कार्ले यांचा प्रवेश अर्ज पाठविणेत आला होता. त्यामध्ये श्री कार्ले यांची सदरच्या प्रशिक्षणास निवड झाल्याने सदरचे प्रशिक्षण दि.१५/१२/०५ ते १५/३/०५ ऐवजी दि.९/१/०६ ते ि,७/४/०६ या कालावधीत पूर्ण करणेस व प्रशिक्षण खर्चास मंजूरी मिळणेस मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

मा.उपायुक्त साहेब कर - प्रस्ताव 'अ' प्रमाणे कार्यवाही करणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - सहमत

सभापती साहेब - कार्यालयीन प्रस्तावानुसार प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण हे दि.९/१/०६ पासून सुरू होणार असल्यामुळे कालावधीचा विचार करता व प्रशासनाने दिलेली मंजूरी पाहता श्री संभाजी कार्ले यांना प्रशिक्षणास पाठविणेस मंजूरी देण्यात येत आहे. मात्र अखेर मंजूरी करीता लगताच्या स्थायी समितीपुढे ठेवण्यांत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ६ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ६ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मंजूरीस्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकूर** - महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५९ (१) नमुना क्र.२७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर बाबवार जमा - खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे ".असे नमूद करण्यात आले आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेवून मा.स्थायी समिती सभेपुडे मंजूरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

या प्रमाणे लेखापाल अहमदनगर महानगरपालिका यांचा प्रस्ताव
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ७ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ७ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१ मार्च २००५ अखेरचा मत्ता,दायित्वे व वार्षिक लेख्यांचा सारांश मुख्य लेखा परिक्षक यांचे अहवाला सह मंजूरीस्तव सादर

**प्रस्तावाचा मजकूर** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये " नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे " असे नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपारिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर वार्षिक लेख्याचा सारांश तयार करण्यात आला असून यात सुरवातीचे शिलकेसह रू.६० कोटी ७ लाख ६७ हजार ३९९ इतके जमा झाले असून ५४ कोटी ५१ लाख २ हजार ४१० रूपये खर्च वजा जाता रू.५ कोटी ५६ लाख ६४ हजार ९८९ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं.६१ नमुना नं.२९ प्रमाणे ३१ मार्च २००५ अखेरचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले असून यात मता हे ३१ कोटी ४ लाख १९ हजार ८०१ असून दायित्व १ अब्ज ८६ कोटी २३ लाख ९२ हजार ३१६ असून दायित्व हे मत्तेपेक्षा १ अब्ज ५५ कोटी १९ लाख ७२ हजार ५१५ ने अधिक आहे. तरी मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल घेवून मा.स्थायी समिती सभेपुढे मंजूरीस ठेवणेसाठभ् आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

मा.उपायुक्त साहेब (सा) - अहवालानुसार सादर.

आयुक्त साहेब - मु.ले.अहवालाचे अवलोकन करतामनपाचे दायित्व हे १५५ कोटी १९ लाख आहे. सदरची बाब गंभीर असून मनपाआर्थिक संकटास असल्याचे आढळते. सदरचे दायित्वाचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे.यासाठी मनपाने महसुली उत्पान्नाचे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ८ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ८ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार सौ.सुनिता रवि कांबळे बिगारी यांना महानगरपालिका नोकरीतून बडतर्फ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर (२)** - आरोपीत कामगार सौ.सुनिता रवि कांबळे गार्डन बिगारी यांना आस्था ४५९ दि.१३/५/०५ अन्वये आरोप पत्र क्र.६१९ दि.३०/५/०५ चे देण्यांत आले ते असे,

तुम्ही महानगरपालिकेचे गार्डन बिगारी या पदावर कामावर होता परंतु दिनांक १/१२/९९ पासून कोठल्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता व ऑफिसची परवानगी न घेता परस्पर गैरहजर राहिले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या कामाचा खोळंबा झाला असून आपण ऑफिस कामाची खोटी केलेली असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले असलेने तुमचेवर आरोप पत्र ठेवण्यात येत आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रामध्ये ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास दिनांक २४/६/०५ रोजी खुलासा दिलेला आहे. तसेच खातेनिहाय चौकशी मध्ये आरोपीत कामगाराने दि.३०/७/०५ व दि.११/८/०५ रोजी जबाब दिलेला आहे. सदर जबाबामध्ये आरोपीत कामगाराने त्यांचे वर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबूल केले आहेत. व आधिक असे म्हटले आहे कि,माझे घरची परिस्थिती ही नाजूक असून मला नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. माझे कडून सदरील चूक झालेली आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही. याबाबत मी दक्षता घेईल तरी मला एकवेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे. अशी विनंती आरोपीत कामगाराने केलेली आहे.

चार्ज ऑफिसर यांनी आरोपीत कामगाराविरूध्द आरोप पत्र भरलेले आहे. तथापी चौकशी कामी चार्ज ऑफिसर हे एकाही तारखेस हजर राहिलेले नाहीत.

आरोपीत कामगाराने त्याचेवर आरोपपत्रामध्ये ठेवलेले आरोप कबूल केल्यामुळे आरोपीत कामगारा विरूध्द आरोप शाबीत होत आहेत.

आरोपीत कामगाराविरूध्द आरोप शाबीत झालेले असलेने आरोपीत कामगार हे शिक्षेस पात्र ठरत आहेत. आरोपीत कामगाराविरूध्द शिक्षेचा निर्णय घेतानां आरोपीत कामगार हे दिनांक १/१२/९९ पासून गैरहजर आहेत. याबाबतही निर्णय होणे आवश्यक आहे. तरी आदेशार्थ सादर येणे प्रमाणे चौकशी अहवाल असे.

या प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा) - संबधीत कर्मचा-याचा एकूण सेवाकाळ विचारात घेता त्यांचे गैरहजेरीचा काळ फार मोठा असून दोषारोष सिध्द झाल्याने सौ.सुनिता कांबळे यांना खालील शिक्षा प्रस्तावीत करण्यात येत आहे.

मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये " पुढे नौकरी मिळण्यास अपात्र होणार नाही. अशा प्रकारे मनपा सेवेतून काढून टाकणे " हि शिक्षा देणे आवश्यक वाटते याबाबत कलम ५६ (३) अन्वये आपली बाजू मांडणे साठी सौ.सुनिता कांबळे यांना संधी देणे बंधनकारक आहे. तसेच या कामी मनपा अधिनियमातील कल ५६ (१) चे परंतु (अ) अन्वये स्थायी समितीची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी त्याना अंतिम संधी देणे बाबत व विषय मा.स्थायी समिती कडे सादर कारणे बाबत ओदशार्थ सादर.

आयुक्त साहेब - प्रस्तावीत शिक्षे बाबत कारणे दाखवा नोटीस काढा.

फेरसादर,

आरोपीत कामगार सौ.सुनिता रवि कांबळे उद्यान बिगारी यांचे वर आस्था जा.नं.४५९ दि.१३/५/०५ अन्वये देण्यात आलेले आरोपपत्र क्र.६१९ दि.३०/५/०५ चे दोष सिध्दीनंतर त्यांना जा.नं.कामगार

१९८० दि.३/१०/०५ अन्वये,"तुम्ही पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे मनपा सेवेतून कमी करण्यांत येत आहे. अशी शिक्षा का करणेत येवू नये याचा खुलासा कारणे दाखवा नोटीस दिली असता आरोपीत कामगार सौ.कांबळे यांनी अद्याप पावेतो सदर नोटीशीस खुलासा दिलेला नाही.

तरी आदेशार्थ फेरसादर असे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - कारणे दाखवा नोटीसीस खुलासा देणे त आलेला नाही. प्रस्तावीत करणेत आलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल तथापी मा.स्थायी समितीची पूर्व मंजूरी आवश्यक असल्याने प्रकरण स्थायी समिती मध्ये ठेवावे.आदेशार्थ .

मा.आयुक्त साहेब - संबंधीतीस सुनावनीसाठी नोटीस काढा.

सौ.सुनिता रवी कांबळे बिगारी ग्रामपंचायत केडगांव मनपा झाले पासून कामावर हजर नाही.गैरहजर राहणेसाठी सबळ कारण नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - आरोपीत कर्मचारी सौ.सुनिता रवि कांबळे हे दि.३०/११/०५ रोजी सुनावणीसाठी मा.आयुक्त साहेब यांचे समोर हजर राहून त्यांनी त्यांचे गैरहजेरी बाबत बाजू मांडली गैरहजेरी बाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. तथापी त्यांचा एकूण गैरहजर कालावधी पाहता त्यांना नौकरीची आवश्यकता नाही असे दिसून येते सबब त्यांना प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल. सदर शिक्षेस मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (अ) अनुसार मंजूरीस्तव प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठवावे लागेल तरी आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ९ दिनांक १९/१/२००६

ठराव क्रमांक - ९ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी व पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजा साठी आर.टी.ओ.कडील योग्य परवाना धारक वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो कि,मनपाचे अधिकारी पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी आरटीओ नियमाप्रामाो योग्य परवानाधारक वाहने सन २००५-२००६ या आर्थिक वर्षा करीता भाडयाने लावणे कामी दै.लोकसत्ता दि.१४ जुलै २००५ अंकात जाहीर टेंडर नोटीस दिली असता वेळेत व मुदतीत एकूण १२ दरपत्रक (पुरवठा दाशंनी ) सादर केलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्त केला असता बहुतांश वाहन पुरवठा दासाठी वाहन एक किंवा दोन वाहनांची दर पत्रक सादर केली असून नियमाप्रमाणेआरटी ओ कडील योग्य परवाना असलेली कागदपत्रे देखील दरपत्रका सोबत जोडलेली आहेत.

दरपत्रकांचा तुलनात्मक दृष्टया अभ्यास केला असता माउलीटुर्स ॲण्ड ही संस्था असून त्यांचे टाटा इंडिकाचे व मारूती व्हॅनचे इंधना व्यतिरिक्त प्रतिदिनी (२४ तास) रूपय ४५१/- ,३९५ दतके आहेत. तसेच शिवराणा बहुउद्येशीय केंद्र हि देखील संस्था असून त्यांनी स्कार्पिओ वाहनाचे इंधना व्यतिरिक्त १२ तासा करिता रूपये१२५०/- किंवा प्रति किम.६/- चे दिलेले असून कमीचे आहेत तसेच क्वॉलिस चे दर १२ तास ६००/-२४ तास १०००/- व प्रतिदिनी ५.७५ प्रमाणे टाटा सुमो व स्पसीओ १२ तास ६००/- २४ तास १०००/- प्रतिदिनी ५.७५/- मार्शल १२ तास ६००/- २४ तास १०००/- प्रतिदिनी ५.७५ सॅन्टो - १२ तास ४७५/- २४ तास - ९००/- प्रतिदिनी ६.५०/- या प्रमाणे दर दिलेले आहेत.

त्यामुळे मारूती टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहुउदेशीय केंद्र या दोन संख्या मनपास अनेक प्रकारची वाहने भाडे तत्वावर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास केला असता ,कमी दराने उपलब्ध (आवश्यकतेनुसार ) करून देवू शकतात.

तरी सन २००५-२००६ साला करिता दिपो नमूद केलेले माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहु उद्येशीय सेवा केंद्र या दोन संख्या असून त्यांनी वाहन भाडयाने दर देखील कमी दिलेले असून त्यांचे दर मंजूर करण्या करिता तसेच मनपास आवश्यकते नुसार मा.अधिकारी पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामासाठी संबधीत कमीची वाहने भाडयाने लावणे मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी हि विनंती तथापी आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

मॅकेनिकल इंजि.- अहमदनगर महानगरपालिकेची विविध अधिकारी व मा.पदाधिकारी यांचे प्रशासकयी वापरा करिता मनपा कडील वाहने अपुरी पडतात पर्यायाने त्यांचे करिता भाडयाने वाहन

उपलब्ध येणेस्तव या वाहनांचा दरा करिता निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या निविदेतील आलेले कमीचे दर स्वीकरण्यास व मंजूर दरानुसार निवीदास मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,या विभागाचे परवानाधारक वाहन उपलब्ध करून देणेस योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

मुख्या लेखा परिक्षक - सदर शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. वाहन १०.०५प्र.क्र.१३/२००५ विनिपम मुंबई कडील शासन निर्णय दि.२५ मे २००५ प्रमाणे व मॅकेनिकल इंजि. याचे कडी प्रस्तावा प्रमाणे माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहुउद्येशीय सेवा कर यांचे कमीचे दरास मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब - अ प्रमाणे प्रस्ताव मंजूरीस मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - आर.टी.ओ. यांनी जिव्हायात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रक ठरविणे असल्यास त्याची माहिती घेवून फेरसादर करा. तसेच यापूर्वी गत २ वर्षाचे मनपाचे मंजूर दराची माहितीही द्यावी.

मा. फेरसादर.

आर टी ओ यांनी जिल्हयात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रके ठरविले किंवा कसे ? याबाबत प्रत्यक्षउपप्रादेशीक परिवहन कार्यालय अहमदनगर येथे प्रत्यक्ष चौकशी केली असता त्यांनी मा.विभागीयच आयुक्त ,नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालयात झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दि.११/२/२००४ रोजीच्या सभेतील ठरावा प्रमाणे टॅक्सी व ट्रॅक्सचे सुधारीत दराची कॉपी दिलेली आहे त्याची तपशीववार माहिती पुढील प्रमाणेत्यामुळे माउती टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स या दोन संस्था मनपास अनेक प्रकारची वाहने भाडे तत्वावर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास केला असता ,कमी दराने उपलब्ध (आवश्यकतेनुसार ) करून देवू शकतात.

तरी सन २००५-२००६ साला करिता डिपॉझीट नमूद केलेले माउली टुर्स ॲण्ड व शिवराणा बहुउद्येशीय सेवा केंद्र या दोन संख्या असून त्यांनी वाहने भाडयाने दर देखील कमी दिलेले असून त्यांचे दर मंजूर करण्या करिता तसेच मनपास आवश्यकते नुसार मा.अधिकारी,पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामासाठी संबंधीत फर्मची वाहने भाडयाने लावणे कामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी ही विनंती तथापी आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

मॅकेनिकल इंजि- अहमदनगर महानगरपालिकेची विविध अधिकारी व मा.पदाधिकारी यांचे प्रशासकीय वापरा करिता मनपा कडील वाहने अपूरी पडतात पर्यायाने त्यांचे करिता भाडयाने वाहन उपलब्ध होणेस्तव या वाहनांच्या दरा करिता निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. निविदेतील आलेले कमीचे दर स्वीकरण्यास व मंजूर दरानुसार निविदारास मा.प्रादेशीक परिवहन अधिकारी या विभागाचे परवाना धारक वाहन उपलब्ध करून देणेस योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

मुख्या लेखा परिक्षक - महा.शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वाहन १०.०५/प्र क्र.१३/२००५ विनियम मुंबई याचे कडील शासन निर्णय दि.२५ मे २००५ प्रमाणे व मेकॅ.इजि.याचे कडील प्रस्तावा प्रमाणे माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहुउद्येशीय सेवा कर याचे कडील दरास मान्यता देणेस हारकत नाही.

मा.उपायुक्त साहेब सा - अ प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आुयक्त साहेब - आर टी ओ यांनी जिल्हयात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रक ठरविले असल्यास त्याची माहिती घेवून फेरसादर करा . तसेच यापूर्वी गत २३ वर्षाचे मनपाचे मंजूर दराची माहितीही द्यावी.

फेर सादर,

आर टी ओ यांनी जिल्हयात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रक किंवा कसे ? याबाबत प्रत्यक्ष उपप्रादेशीक परिवन कार्यालय अहमदनगर येथे प्रत्यक्ष चौकशी केली असता त्यांनी मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालयात झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दि.११/२/२००४ रोजीच्या सभेतील ठरावा प्रमाणे टॅक्सी व ट्रॅक्सचे सुधारीत दराची कॉपी दिलेलीआहे . त्याची तपशीलवार माहिती पुढील प्रमाणे.

विषय क्र.११ वातानूकुलीत कॅबचे दर

| अ.नं | वाहनांचा प्रकार | प्रति कि.मी. | १२ तास किंवा १२० कि. मी. | २४ किंवा २५० कि.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | वॅगनोर | ६.०० | ७२० | १५०० |
| २ | झेन | ६.०० | ७२० | १५०० |
| ३ | मारूती | ५.०० | ६०० | १२५० |
| ४ | इंडिका | ५.५० | ६६० | १३७५ |
| ५ | सेंन्ट्रो | ६.०० | ७२० | १५०० |
| ६ | ॲम्बेसिटर | ५.५० | ६६० | १३७५ |
| ७ | इंडिगो | ७.०० | ८४० | १७५० |
| ८ | आयकॉन फोर्ड | ९.०० | १०८० | २२५० |
| ९ | उनो | ६.५० | ७८० | १६२५ |
| १० | पालिओ | ५.५० | ६६० | १३७५ |
| ११ | होंडा सिटी | १५.०० | १८०० | ३७५० |
| १२ | इस्टीम | १०.०० | १२०० | २५०० |
| १३ | सिएलो | ८.०० | ९६० | २००० |
| १४ | टोयाटो | १२.०० | १४४० | ३००० |
| १५ | टाटाइस्टेट | ८.०० | ९६० | २००० |
| १६ | मार्सिडीज | ८.०० | ९६० | २००० |
| १७ | ११८एम ई | २५.०० | ३००० | ६२५० |
| १८ | सुमो | ६.०० | ७२० | १५०० |
| १९ | क्वॉलिस | ७.०० | ८४० | १७५ |
| २० | टाटा सफारी | १०.०० | १२०० | २५०० |
| २१ | असेंट | १०.० | १२०० | २५०० |
| २२ | स्कार्पिओ | १२.०० | १४४० | ३००० |
| २३ | ओपेलो | १२.०० | १४४० | ३००० |
| २४ | ओपेलोफोरसा | १२.०० | १४४० | ३००० |

तसेच गत दोन वर्षा पूर्वीचे मनपाचे दराचीमाहिती मा.सथाय समिती ठराव क्र.८ दि.१४/८/२००४ चे मंजूरीने तसेच निगोशिएशन मध्ये झालेल्या चर्चेनुसार टा टा सुमो प्रतिदिनी रूपये ४१०/- क्वॉलिसचे प्रतिदिनी रूपये ४००/- व मारूती व्हॅन प्रतिदिनी रू.४०५/- इंधन व्यतिरिक्त मंजूरीने दर होते. परंतु त्यावेळेस आर टी ओ कडील योग्य परवान्याची अट पुरवठादार

यांना टाकण्यात आल नव्हती सदरची अट ठरावानंतर वर्तमानपत्रात आरटी ओ कडील प्रसिध्दी खुलासा आल्यानंतर दिनांक १४१/२००५ पासून घालण्यात आली होती मंजूर टेंडर दराने योग्य परवाना असलेली वाहने भाडयाने लावणेस अनेक अडचणी आल्या.

येणे प्रमाणे माहिती देण्यांत येत आहे.

मॅकेनिकल इंजिनिअर - तरी सन २००५-२००६ साला करिता वाहन पुरवठादार यांनी दिलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता पाहता माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स यांचे मारूती व्हॅन व टाटा इंडिका यावाहनांचे भाडयाचे दर कमी असल्याचे तसेच शिवराण बहुउद्येशीय सेवाकेंद्र यांचे १. टाटा सुमो २. महेंद्र मार्शल ३. क्वॉलिस ४. स्कर्पिओ ५. सॅन्ट्रो ६. स्पॅसिवो या वाहनाचे भाडयाचे दर असल्याचे दिसते तसेच त्यांनी लेखी पत्र देवून तोंडी चर्चेस बोळविण्यास वाहन भाडयाने दर कमी करण्याची तयारी देखील दर्शविली आहे. त्यामुळे मनपास आवश्यकते नुसार मा.आधिकारी ,पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी संबंधीत फर्मची वाहने भाडयाने लावणे कामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी हि विनंती. तथापी आदेशार्थ रिपोर्ट सादर.

मा.उपायुक्त साहेब कर - उपरोक्त अहवाल सविनय सादर प्रस्ताव मान्यते करिता मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - मु.ले.तपासून अभिप्रायासह सादर करा.

मुख्य लेखा परिक्षक - मेकॅनिकल इंजि. यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे निगोशिएशन करिता बोलाविणेस हरकत नाही.

मा.आयुक्त साहेब - संबंधीताशी दर कमी करणे बाबत वाटाघाटी कराव्यात.उपायुक्त +अभियंता यांत्रिकी यांचे समक्ष.

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो कि,मनपाचे अधिकारी व पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यकते नुसार वाहने भाडयाने लावणे कामी वर्तमानपत्रात जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करून दरपत्रके मागवून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता ,संबधीत वाहन पुरवठादार यांना वाहन भाडयाचे दर कमी करण्यासाठी जा.क्र३८९/१७/१२/०५ अन्वये पत्रानुसार दि.१९/१२/२००५ रोजी स.११.३० वाजता मा.उपायुक्त साहेब (कर) यांचे दालनात निगोशिएशन करणे करिता समक्ष बोलाविले असता त्यांनी वाहन भाडयाचे दर कमी करण्यास तयारी दर्शविली असून लेखी पत्र देखील दिले आहे. १. माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स अ.नगर यांनी खालील वाहनांचे निगोसिएशन मध्ये कमी केलेल दर दिलेले आहेत.

| वाहनाचा प्रकार | प्रतिदिनी |
|---|---|
| १. टाटा इंडिका | ४५२/- |
| २. मारूती व्हॅन | ३९०/-* |

२. शिवराणा बहुउदेशीय सेवा क्रेंद्र व स्वयंरोजगार सेवा उद्योग सहकारी संस्था अहमदनगर यांनी

| वाहनाचा प्रकार | १२ तास | २४ तास |
|---|---|---|
| १. टाटा सुमो | ४८५/- | ८००/- |
| २. स्पॅसिओ | ४८५/- | ८००/- |
| ३. क्वॉलिस | ५५०/- | ८२५/- |
| ४. मार्शल | ४७५/- | ६५०/- |
| ५. सॅन्ट्रो | ४५०/- | ७००/- |
| ६. स्कार्पिओ | ६००/- | ८००/- |

तरी रिपोर्टात दर्शविल्याप्रमाणे निगासिएशन मध्ये कमी केलेल्या वाहन भाडयाने दराने माउली टुर्स ॲण्ड अ.नगर या फर्म मार्फत मारूती व्हॅन व टाटा इंडिका कार वाहन भाडयाने लावण्यास तसेच शिवराणा बहउदेशीय सेवा केंद्र व स्वयंरोजगार सेवा उद्योग सहाकारी संस्था या फर्म मार्फत टाटा सुमो ,स्पॅपिओ, क्वॉलिस ,मार्शल सॅन्ट्रो ,स्कार्पिओ ही वाहने मनपाचे आधिकारी ,पदाधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यकते नुसार वाहने भाडयाने लावणो तसेच त्याकामी येणा-या खर्चास व कामास मंजूरी मिळावी तसेच संबसधीत बाबतचा पुरवठा आदेश देणेस देखील मंजूरी आदेशार्थ सविनय साद.

मेकॅनिकल इंजिनिअर - अहमदनगर मनपाचे अधिकारी / पदाधिकारी यांना प्रशासकीय कार्यालयीन कामकाजा करिता भाडयाने परवानाधारक वाटणे लावणे कामी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.वाहन धारक संस्थेशी दराबाबत निगोसिएशन केल्यानंतर आलेले कमीचे दर मंजूरीस्तव सादर.

मुख्य लेखा परिक्षक - निगोसिएशन मध्ये कमी करून दिलेल्या दरानुसार १. माउुली ॲण्ड ट्रॅव्हल व २. शिवराणा बहुउदेशीय सेवा केंद्र या फर्म मार्फत वेळोवेळी व आवश्यकते नुसार वाहन भाडयाने लावणे बाबत मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर) - प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - प्रति कि.मी.दर आणि वाहनाचे टुरिस्ट परवान्या बाबत स्पष्ट अभिप्राय देवून फेर सादर करा.

मेकॅनिकल इंजिनिअर - प्रति कि.मी.चे दराबाबत वाहन कमीत कमी ३०० कि.मी.चा ॲव्हरेज घेत असल्याने त्या दराने वाहने भाडयाने लावण्यास निगोसिएशन मध्ये कमीकेलेल्या वाहन भाडयाचा दरापेक्षा जास्त रक्कम द्यावी. लागणार असल्याने प्रति कि.मी.चा विचार निगोसिएशन मध्ये करण्यात आलेला नाही. तसेच वाहने भाडयाने लावतांना टुरिस्ट परवाना असल्याशिवाय वाहने भाडयाने लावण्यात येणार नाहीत. येणे प्रमाणे खुलासा करण्यात योग्य आहे तरी मंजूरीस्तव सादर,

मा.उपायुक्त (कर ) - उपरोक्त प्रमाणे अहवाल सविनय सादर.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - १ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय -** मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर -** मागील सभा दिनांक २८/१२/२००५ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब - मागील सभेचे विषय आपणच मंजूर केलेले आहेत.

मा.श्री गंधे मि.स.- ठिक आहे.

**ठराव** - मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/१२/२००५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.
अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सू.
ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - २ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - २ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस परिवहन उपक्रम सेवा बी.ओ.तत्वावर सुरू करणे कामी मनपाचे अटी शर्ती व नियमा नुसार अभिकर्ता नेमणे साठी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** -अहमदनगर शहर बस वाहतुकी बाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेचे अटी शर्ती व नियमानुसार अभिकर्ता नेमणेसाठी दै.लोकमत दि.१२/११/२००५ रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात येवून १३/१२/२००५ अखेर निविदा फॉर्म विक्री ठेवण्यांत आली आणि होती. सदर काळामध्ये एकूण ६ निविदा फॉर्म (रू.५००/-) प्रमाणे विक्री झालेली आहे. दि.१४/१२/२००५ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यत सहा पैकी एकूण चार निवीदा वेळेत व मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत.सदरील मोहरबंद चारही निविदा १. मे.एस ए.करीम ट्रान्सपोर्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स २. हुंडेकरी मोटर्स प्रा.लि. ३. नाथ टुरीस्ट सेवा संघ ४. अहमदनगर प्रवाशी व माल वहातुक सहकारी संस्था मर्यादित यांचे समक्ष तसेच मा.आयुक्त साहेब,मा.उपायुक्त साहेब ,मेकॅनिकल इंजिनिअर यांचे समक्ष मा.आयुक्तसाहेब यांचे कार्यालयात उघडण्यांत आलेल्या आहेत. सदर निविदा समक्ष उघडून त्यावर मा.उपायुक्त साहेब व ऑडीटर साहेब यांच्या स्वाक्ष-या देखील घेणेत आलेल्या आहेत.

अहमदनगर शहर बस वाहतुकी बाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेचे अटी शर्ती व नियमानुसार अभिकर्ता नेमणेसाठी आलेल्या निविदाचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

अहमदनगर शहर बस वाहतुक बी.ओ.तत्वावर अभिकर्ता नेमणे कामी निविदांचा तुलनात्मक तक्ता

| मे.एस ए.करीम ट्रान्सपोर्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स सर्जेपुरा रोड,फकीर गल्ली अहमदनगर | हुंडेकरी मोटर्स प्रा.लिमिटेड मनमाड रोड ,सावेडी अहमदनगर. |
|---|---|
| सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.५अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८४९ अन्वये बयाणा रक्कम डी डी द्वारे भरली आहे. निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ५% स्वामीत्व धन (रॉयल्टी)देण्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. | सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.६ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८५० अन्वये बयाणा रक्कम डी डी द्वारे भरली आहे.<br>निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातुन रोजच्या उत्पन्नातून मनपास ६% स्वामीत्व धन (रॉयल्टी ) देल्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. |

| नाथ टुरीस्ट सेवा संघ गवळीवाडा भिगार | अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या .अ.नगर |
|---|---|
| सदर निविदा काराने निविदा फॉर्म नं.२ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रामणे सा.पा.नं. ९०८५१ अन्वये बयाणा रक्कम डी.डी द्वारे भरली आहे. निविदे सोबत आवश्यक असणारी कागद पत्रे अपुरी आहेत.<br>शहर बस सेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ५.४% स्वामीत्व धन (रॉयल्टी )देण्याचे निविदे मध्ये नमूद केले आहे. | सदर निविदा काराने निविदा फॅार्म नं.४ अन्वये निविदा दाखल केलेली आहे. नियमाप्रमाणे सा.पा.नं.९०८५२ अन्वये बयाणा रक्कम डी डी द्वारे भरली आहे. निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>शहर बससेवा उपक्रमातून रोजच्या उत्पन्नातून मनपास ७.२% स्वामीत्व ध्न (रॉयल्टी )देण्याचे निविदेमध्ये नमूद केले आहे. |

सादर,

अहमदनगर शहर बस वाहतुकीबाबत बी ओ तत्वावर महानगरपालिकेच्याअटी शर्ती व नियमानुसार आभिकर्ता नेमणे कामी एकूण चार निविदाचा तुलनात्मक तक्ता केला असता चारही निविदा धारकांनी नियमा प्रमाणे बयाणा रक्कम,कागदपत्रे जोडलेली आहेत. शहर बस सेवेच्या दैनंदिन उत्पनावर सर्वात जास्त स्वामीत्व धन (रॉयल्टी) अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहरकारी संस्था मर्या .यांनी ७.२% इतके देण्याचे मान्य केले असून उत्कृष्ट सेवा देण्यांचे देखील नमूद केले आहे.

अहमदनगर मनपास फायदा होण्याचे दृष्टीने तसेच नागरिकांचा विचार करता सदर निविदा काराने नमूद केलेले ७.२%रॉयल्टी व उत्कृष्ठ सेवेचा विचार करता अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक सह .संस्था यांचे निविदेस मंजूरी मिळणेस तसेच कार्यवाही करणेस व सदरचा तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समिती यांचे  कडेस मंजूरीस्तव पाठविणेस मंजूरी मिळावी. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

टिप - टेंडर फॉर्म सोबत दिलेल्या अटी शर्ती नुसारच अभिकर्ता नेमण्यात येईल अभिकर्त्याने दिलेल्या अटी शर्ती चा विचार केला जाणार नाही.

येणे प्रमाणे मो.व्हे.क्लार्क यांचा अहवाल असे.

मा.सादर,

अहमदनगर शहर बस वाहतुकी करिता खाजगी अभिकर्ता नेमून बससेवा सुरू करणेच्या दृष्टीकोनातून जादा देकार देणा-याची जाहीर निविदा मागविली असता ,अ.नगर प्रवासी व माल वाहतुक संस्था अ.नगर यांचे सर्वात जादा म्हणजेच एकूण उत्पन्नावर ७.२% (सात पूर्णांक दोन टक्के) इतकी रॉयल्टी मनपास देणारी निविदा प्राप्त झालेली आहे.

तरी एकूण प्राप्त निविदे पैकी जादा दराने रॉयल्टी देणा-या संस्थेस मंजूरी मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे मॅके.इंजि.याचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक - मेक. इंजि. यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्यादित यांची सर्वात अधिक ७०.२% ने निविदा प्राप्त झालेली आहे. सबब जादा दराची निविदा स्विकारणेस हरकत नाही. तथापी मा.स्थायी समितीने निणर्य घेणे बाबत आदेशार्थ .

मा.उपायुक्त कर - मेकॅनिकल इंजिनिअर यांचे कडील प्रस्ताव व मुख्य लेखा परिक्षकांच्या अभिप्राया प्रमाणे प्रस्ताव मंजूरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री गंधे मि.स.- माहिती सांगा .

मा.उपायुक्त साहेब (सा) - आपण बी.ओ.तत्वावर खाजगी करणातून बस सेवा चालविण्यांस देणार आहोत. त्यांना तिकीटे ही आपण छापून देणार आहोत. अभिकर्ता नेमणे साठी निविदा मागविल्या आहेत . ७.२% टक्के जास्तीचे रॉयल्टीची निविदा आली आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- हुंडकेरी यांची सहा टक्केची निविदा आहे. त्यांचे कडेस माल वाहतुकीसाठी बरेच ट्रक आहेत. या व्यावसायातील त्यांचा अनभव जास्त आहे. जादा रॉयल्टी देणारे संस्थेस अनुभव आहे का?त्यांचा अनुभव पाहून मनपाचा फायदा करील त्याचा विचार करावा.

मा.श्री जोशी अ.सु.- हुंडेकरी माल वाहतुकी साठी प्रसिध्द आहे.तशी ही संस्था प्रवासी वाहतुकीसाठी अनुभवी आहे.

मा.श्री गंधे मि.सं.- हुंडकरी यांनी कमी रॉयल्टी दिलेली आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- त्यांना निगाशिएशन साठी बोलवावे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - आता निगोशिएशन करता येत नाही.

मा.श्री गंधे मि.स.- त्यांनी आर टी ओ एस टी परिवहन इत्यादी कडील परवाने घेतले आहेत का?

मा.उपायुक्त साहेब (सा) - परवाने घेणे कामी आपण मदत करावयाची आहे.

मा.श्री गंधे मि.स.- त्यास किती कालावधी लागु शकेल.

मा.उपायुक्त साहेब (सा) - दिड ते दोन महिने किंवा त्या पेक्षा जास्त ही कालावधी लागु शकेल.

मा.श्री बारस्कर पो.ज.- बस कुठपर्यंत जाणार रूट ठरवून द्या.

मा.सभापती साहेब -बस मार्ग ठरलेले आहेत.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- अनुभवी संस्थेस ठेका द्यावा.

मा.उपायुक्त साहेब (सा) - प्रोसिजर प्रमाणे कार्यवाही झाली आहे जादा रॉयल्टी देणा-या संस्थेची निविदा नकारणे बाबतची कारणे द्यावी लागतील.

मा.श्री लोंढे सु.सो.- माहिती सांगा.

मा.उपायुक्त साहेब (सा) - हा विषय सभेपुढे दोनदा आला आहे. बरीच चर्चा झाली आहे.प्रकरण पाहून आपणांस माहिती घेता येईल\

मा.श्री लोंढे सु.सो.- प्रस्ताव ज.बो.मध्ये जाउ द्या फेर निवीदा काढाव्यात
मा.श्री जोशी अ.सु.-नागरीकांचे जिव्हाळयाचा प्रश्न आहे.
मा.श्री गंधे मि.स.- निविदा धारकांनी निविदा भरते वेळी काळजी घेणे चांगले हुंडेकरी यांनी कमी रॉयल्टीचे टेंडर भरले आहे.
मा.उपायुक्त साहेब (सा) - टेंडर भरणारी संस्था अपात्र ठरत नाही तो पर्यत आपण काही करू शकत नाही. टेंडर नकारता येणार नाही.
मा.श्री गंधे मि.स.- बयाणा रक्कम किती
मा.उपायुक्त साहेब (सा) - बयाणा रक्कम रूपये पन्नास हजार व बँन्क गॅरंटी पंचवीस लाख ठरवलेली आहे.
मा.श्री गंधे मि.स.-त्यांनी अटी शर्तीचा भंग केल्यास सदर रकमा जप्त करता येतील.
मा.श्री .त्रिपाठी सु.चं.- जकातीचा निर्णय आपण बदलू शकलो नाही.विचार करून निर्णय घ्यावा.
मा.उपायुक्त साहेब (सा) - अटी शर्ती ठरल्यानुसार निविदा मागविल्या त्या कशा बदलणार.
मा.श्री जोशी अ.सु.- बस सेवे बाबत,अटी शर्ती बाबत तक्रार आल्यास सेवा असमाधान कारक असल्यास आपण कार्यवाही करू शकतो. फेर विचार करता येईल.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- ठेकेदाराने चुका केल्यास आपण कार्यवाही करू पण जकात ठेकेदार एस्कॉर्ट जास्त घेतो हे सर्वांनी पाहिले काय कार्यवाही झाली.
मा.श्री गंधे मि.स.- इथे त्यांचे उत्तर घ्यावे.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- दहा वर्षा साठी बस सेवा चालविण्यांस देणार आहोत बॅन्क गॅरंटी पन्नास लाख करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- आपल्या मिटींगला जागा अपुरी पडते अधिका-यांना बसण्यास जागा नाही.
मा.सभापती साहेब - पुढील मिटींग सभागृहात घेउ.
मा.श्री जोशी अ.सु.- प्रस्ताव मंजूर करावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- अटी शर्ती काय आहेत बयाना रकमेचा डी.डी नॅशनलाईज बॅन्केचा हवा होता त्या ऐवजी सहकारी बॅन्केची पे स्लीप घेतली. बॅन्करचा चेक चालत नाही टेंडर अटी शर्ती नुसार नाही.
मॅकेनिकल इंजि.- डी डी. पाहिजे होता शहर सहकारी बॅन्केची पे स्लीप आणली होती.
मा.उपायुक्त साहेब (सा) - बॅन्कर्स चेक हा डिमांड ड्राफ्ट आहे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- बसचे रंग फिक्स करणेचे ठरले होते.
मॅकेनिकल इंजि.- बसचे रंग शासन ठरवून देणार आहे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- रंग सदस्यांनी ठरवावा असा सहा महिन्या पूर्वी विषय होता टेंडरचे वेळी ठरवू असे ठरले होते तसेच आम्हाला तसे पत्र का दिले नाही.
मा.सभापती साहेब - आपण रंगा बाबत सुचना करू शकतो.
मा.श्री गंधे मि.स.- शासन ठरविणार असेल तर आपण चर्चा करून काय निष्पन्न होणार.
मा.श्री चव्हाण दि.ना.- एका टेंडरला एक नियम दुस-यास वेगळा एकाला डी.डी.दुस-याला बॅन्क गॅरंटी असे करता येणार नाही या अगोदर एक टेंडर नाकारले होते .वर्क ऑर्डर घेतली तर पंचवीस लाख जप्त करणार.
मा.उपायुक्त साहेब (सा) - पंचवीस लाख भरल्या शिवाय वर्क ऑर्डर देणार नाही.

मा.श्री . गंधे मि.स.-७.२% रॉयल्टीचे टेंडर मंजूर करावे.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.-जनतेच्या सेवेसाठी आपण बस सेवा देत आहोत. वीस हजार लोकांचे जीवन रिक्षा धंदयावर अवलबुन आहे. त्याचेशी बैठक घ्यावी. विचारविनिमय करून निर्णय घ्यावा.
मा.सभापती साहेब - विषय ज.बो. मध्ये मंजूरीस असतांना आपण त्याचाउल्लेख केला नाही.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.- त्यांचा विरोध असल्यास त्यांचेशी चर्चा करावी.
मा.सौ.वर्षा आरिफ - आता हा विषयच राहिला नाही. बी.ओ तत्वावर देण्याचे ठरले आहे. कार्यवाही करावी.
मा.सभापती साहेब - रिक्षा बसचे मार्ग वेगवेगळे आहेत.
मा.श्री गंधे मि.सं.- बस शहराबाहेर चालणार आहेत.
मा.श्री जोशी अ.सु.- सी.टी बसची आमचे भागातील लोकांची मागणी आहे.सार्वजिनक हिताचा विषय आहे. बस सेवा सुरू होणे गरजेचे आहे.
मा.श्री गंधे मि.स.- महिलासाठी बसमध्ये ५०% आरक्षण ठेवावे.
मा.उपायुक्त साहेब (सा) - मा.स्थायी समितीने ठरवावे.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.- पुढे वाद होण्या अगोदर रिक्षा संघटनेला पत्र द्यावे बैठक घ्यावी त्यांच्या शंकाचे समाधान करावे मग निर्णय घ्यावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- आर.टी.ओ. एस टी शासन इत्यादीच्या परवानग्या कोण घेणार त्याला मर्यादा नाही.
मा.उपायुक्त साहेब (सा) - आपण त्यांना मदत करणार ठराविक दिवसात त्याने त्या घ्याव्यात अशी अट त्याला घालून देउ.
मा.श्री चव्हाण दि.ना.- परवानग्या घेण्यांस ७/८ महिने जाणार बस सेवा सुरू करणेस किती मुदत देणार नंतर डिझेलचे भाव वाढले काही झाले तर ठेकेदार बस सेवा सुरू करणार नाही.
मा.उपायुक्त साहेब (सा) - तीन महिन्याची मुदत टाकू काही त्रुटी राहिल्या (मुदतीच्या) त्या आता पूर्ण करू.
मा.श्री गंधे मि.स.- वर्क ऑर्डर अटी शर्ती सह द्यावी त्यांने त्रुटी ठेवल्यास शिक्षेची तरतूद असावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- अटी शर्ती मध्ये मुदत कुठे ही नाही. त्यामुळे बॅन्क गॅरंटी जप्त करता येणार नाही . या पूर्वी मुदत का टाकली नाही नाक्याचे टेंडरला तीन वेळा कालमर्यादा होती. नियम तयार करा परत मिटींग घ्या.
मा.उपायुक्त साहेब (सा) - त्यासाठी वेळ लागणार असल्याने मुदत टाकली नाही. तीन महिन्याची मुदत देवू अन्यथा पुढील कार्यवाही करू.
मा.श्री चव्हाण दि.ना.- अटी शर्ती सांगा.
त्या प्रमाणे मॅ.इंजि. यांनी अटी शर्ती वाचून दाखविल्या.
मा.श्री चव्हाण दि.ना.- मुंबई प्रांतिक चे कोणते कलम आहे की अटी शर्ती भंगामुळे टेंडर रद्य करण्यांत येईल.
मा.उपायुक्त साहेब (सा) - अशी कलमे आहेत.
मा.श्री गंधे मि.स.- त्यांनी आर टी ओ एस टी परिवहन इत्यादीचे नियम पाळावयाचे आहेत.
मा.श्री चव्हाण दि.ना.- आपण चार दिवसानी सभा घेवू अटी शर्ती तयार करा.

मा.सभापती साहेब - विषय दोनदा सभेपुढे आला. आपण अभ्यास केला आहे अटी शर्ती ठरविल्या आहेत. टेंडर मंजूरी साठी आहे.

मा.श्री गंधे मि.स.- बस सेवेस आर टी ओ एस टी परिवहन इत्यादीचे नियम लागू होतात.

मा.श्री चव्हाण दि.ना.- आपल्या संस्थेच्या अटी शर्ती ठरवाव्यात.

मा.श्री लोंढे सु.सो. व मा.श्री खैरे दि.सा.- चार दिवसानी सभा घ्यावी.

मा.सभापती साहेब - नियमावली वाचून दाखवा.

त्या प्रमाणे मॅ.इंजि. यांनी परिवहन सेवा नियमावली वाचून दाखविली.

मा.श्री चव्हाण दि.ना.- वाचलेल्या नियमा व्यतिरिक्त ठेकेदाराने उल्लंघन केल्यास पुढे काय ?

मा.श्री गंधे मि.स.- बस सेवा सुरू करणेस मुदत व अटी शर्ती भंगा बाबत शिक्षेचा प्रश्न आहे त्यास आर टी ओ परिवहन कायदयातील नियम लागू होतात.

मा.श्री खैरे दि.सा.- रूट वाचून दाखवा

त्या प्रमाणे मॅ.इंजि .यांनी मा.स्थायी समितीने मंजूर केलेले रूट वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री जोशी अ.सु.- या रूट व्यतिरिक्त नविन मार्ग ही ठरविता येतील.

मा.सभापती साहेब - बस सेवा सुरू करणेस ठेकेदारास मुदत टाका मंजूर करा.

मा.श्री लोंढे सु.सो.- कॉग्रेस राष्ट्रवादीचा विरोध नोंदवावा

मा.श्री गंधे मि.स.- मंजूर करा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- चार दिवसांनी सभा घ्यावी मतदान घ्यावे,मतदाना बाबतचे नियम वाचा

त्या प्रमाणे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन अनुसुची ड मधील स्थायी समिती मनपा सभेचे कामकाज कलम फ व क्यु वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री चव्हाण दि.ना.- नव्वद दिवसाचे मुदतीत बस सेवा सुरू करण्यांत यावी असे टाईम लिमिट टाकून टेंडर मंजूर करा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस परिवहन उपक्रम सेवा बी ओ तत्वावर सुरू करणे कामी मनपाचे अटी शर्ती व नियमानुसारअभिकर्ता नेमणे साठी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता शहर बस सेवेच्या दैनंदिन उत्पन्नावर सर्वात जास्त स्वामित्वधान (रॉयल्टी) देणारी ७.२ % ची अहमदनगर प्रवासी व मालवाहतुक सहकारी संस्था मर्यादित अहमदनगर यांची निविदा मंजूर करणेत येत आहे.

तसेच मंजूर निविदाकार यांचशी करार करतांना १. महानगरपालिकेस मंजूर निविदाकार यांनी पंधरा दिवसाचे आत शहर बस परिवहन उपक्रम सेवे विषयी करारनामा करून देण्यांत यावा.२. मंजूर निविदाकार यांनी कार्यादेश मिळाले पासून तीन महिन्याचे आत शहर बस परिवहन सेवा सुरू करावी.३. शर्तीचे प्रयत्न करूनही केवळ काही शासकीय मान्यता मुदतीत प्राप्त झाले नाही अशा प्रकारची मा.आयुक्त साहेबांची खात्री पटल्यास तशा आशयाचा मुदत वाढीचा प्रस्ताव स्थायी समिती कडेस सादर करण्यांत यावा.

ना मंजूर निविदाकार यांची टेंडर बयाणा रिफंड करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ३ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ३ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज रस्त्याचे मजबूती करण करणे कामी मंजूर अंदाज पत्रका (निवीदा) व्यतिरिक्त खडीकरण व पाईप गटरचे कामास व मूळ अंदाज पत्रकातील बचती मधून रक्कम रूपये ८,०८.२४१/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट ओदशार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती रिपोर्ट कि, सदरील कामाचे मंजूर एस्टीमेट मध्ये वेटमिक्स W.B.M.ची मंजूरी आहे. सदर ठिकाणी काळी मातीची जमीन आहे. त्यामुळे वारंवार जमीन खचली जाते. सदर ठिकाणी फर्शी लोखंड, सिमेंटचे दुकाने आहेत. त्यांचे कडे ज्यादा वजनाच्या (Heavyloaded) वाहतुक असते. मुरूम भराईचे केलेले काम ज्यादा वजनाच्या वाहतुकीमुळे ब-याच भागात खचल्याने वाहतुकीस अडथडा येत आहे. सदर कामाची मा.आयुक्त ,मा.उपायुक्त शहर अभियंता ,उपशहर अभियंता तसेच सदर कामाचे ठेकेदार व आर्किटेक्ट ,शाखा अभियंता यांनी समक्ष पहाणी केली व त्या रस्त्याचे परिस्थितीचा विचार करून मुरूम भराई करण्यातआली तद्नंतर सदर रस्त्याचे काळया मातीचे थराची प्रयोगित चाचणी शास्त्रीय प्रयोग शाळे मध्ये केली. त्याची सी.बी.आर (/crush Bearing ratio value )२.०९ येते. सदरचा रेशोहा निर्धारीत ८% पेक्षा कमी आहे.

त्या करिता वरील रस्त्याचे मजबुतीकरण करण्या करिता खडीकरण करणे आवश्यक आहे. श्री एन.सुमतीलाल यांचे दुकाना समोरील रस्त्यावरील तसेच जुने टिळक रोड येथून येणारे गटारीचे पाण तसेच पावसाळयात येणारे पाणी या रस्त्याच्या खालून जाणे जरूरीचे आहे. त्यासाठी ९०० एम.एम.एम.पी.-३ क्लास व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकून पाणी सिनानदीत सोडणे आवश्यक आहे, असे आर्किटेक्ट यांचे मत आहे. त्या बाबत आर्किटेक्ट यांनी लेखी पत्र दिले आहे.

आर्किटेक्ट यांचे रिपोर्टा प्रमाणे खडीकरण करिता रू.६,९४,६०१/- व पाईप गटर करण्याकरिता रू.१,१३,६४०/-असे एकूण रू.८,०८,२४१/- सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज चौका पर्यतच्या रस्त्यास ज्यादा खर्च करावा लागणार आहे.

सदरचा वाढीव खर्च एक्स्ट्रा ऑयटम (Extra item) हा मूळ अंदाजपत्रका मधील बचती मधूनच करावयाचा आहे. त्या करीता वाढीव तरतूद करावी लागणार नाही. मूळ अंदाजपत्रकात सदर ज्यादा कामाचा अंतर्भाव नाही.

मंजूर निविदा मधील शर्ती प्रमाणे सर्व सारधण ठेक्याचे अटी मधील कलम ७४/४ प्रमाणे निविदा व्यतिरिक्त कामाचा बाबी करावयाचे असल्याने संबधीत ठेकेदारस शहर अभियंता यांचे पत्रानुसार वरील बाबी अंदाजपत्रकीय दराध्ये करून घेण्यात आलेल्या आहेत.

तरी केलेल कामास व त्याकामी लागणारा खर्च रूपये ८,०८२४१/- ला मंजूरी मिळणे करिता रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता उपशहर अभियंता व शहर अभियंता यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - मा.स्थायी समितीकडे मंजूरी साठी सादर करणेस शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - मंजूर निविदेतील किती काम आहे. व किती व कोणते काम शिल्लक आहे या माहितीसह फेरसादर करा.

फेरसादर,

कामाची निवीदा - रक्कम १,१५,१४३००/-

आज अखेर एकूण कामावर झालेला खर्च व काम रू. - ७३,१३,९३५/-

उर्वरित डांबरीकरण व शुभोभिकरणाचे राहिलेले काम रू.- ४७,७४,९२८/-

शुशोभिकरणाचे कामातील बचत रक्कम रू . - ८,५०८९२/-

निविदा व्यतिरिक्त जादा कामासाठी लागणारी रक्कम रू. - ८,०८,२४१/-

(रस्त्याचे मजबूतीकरण व पाईप गटार)

जादा कामामुळे मंजूर निविदा रक्कमे मध्ये वाढ होणार नाही सदर जादा कामाचे रू.८,०८२४१/- खर्चास मान्यता मिळणेसाठी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता उपशहर अभियंता व शहर अभियंता यांचा अहवाल फेरसादर असे.

मा.उपायुक्त साहेब(सा) - अहवालानुसार मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - सहमत

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री बारस्कर पो.ज.- सदर रस्त्याचे खडीकरण झालेले आहे.

मा.श्री दातरंगे अ.भा.- रस्ता खचला होता.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- इंजिनिअनर यांनी काय केले अभ्यास न करता एस्टीमेट केले किंवा कसे?

मा.सभापती साहेब - काळी माती होती मुरूम टाकाला आहे.एजन्सीने एस्टिमेट केले आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- आपले येथील इंजिनिअर बाहेर गावी काम करतात व बाहेर गांवाचे नगरमध्ये

मा.उपायुक्त साहेब (सा) - पुढील वेळेस अशा कामी बाहेर गांवच्या एजन्सीज नेमू नका,प्रस्तावातील काम

टेंडर व्यतिरिक्त चे आहे. पाईप लाईन मुरूम भराईचे एस्टीमेट आहे.

मा.श्री जोशी अ.सु.- काम अजून होणे बाकी आहे.

मा.श्री लोंढे सु.सो.- रस्ता होणे आवश्यक आहे.

मा.श्री खैरे दि.सा.- मंजूर करा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- मुळ एस्टीमेट किती खर्च झाले किती ?

सिटी इंजि.श्री कुलकर्णी एन डी.-

मा.श्री चव्हाण दि.ना.- बचत किती डब्ल्यु बी एम एस्टिमेट किती

सिटी इंजि . श्री कुलकर्णी एन.डी.- डब्ल्यु बी एम साठी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सदर रस्ता हस्तांतरणा बाबत पत्र आले आहे का?

सिटी इंजि . श्री कुलकर्णी एन.डी.- होय.

मा.श्री चव्हाण दि.ना.- जर मूळ अंदाज पत्रकातील रक्कम कमी झाली असेल तर बचत झाली असे म्हणता येईल

अन्यथा प्रस्ताव चुकला आहे Belwe टेंडर आले म्हणून बचत म्हणता येणार नाही जर बचत

झाली नसेल तर डांबरीकरणसाठी ही एस्टिमेट वाढवून घ्यावे लागेल २५ एम एम डांबरीकरण

टिकेल काय सदर रस्ता नॅशनल हायवे साठी वर्ग करणे बाबतचे पत्रा प्रमाणे कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त साहेब (सा) - हस्तांतरणा बाबत पी डब्ल्यु डी चे पत्र आले आहे. डांबरीकरणे थांबविलेले आहे

मा.श्री चव्हाण दि.ना.- ११ वे वित्त आयोगाचे पैसे आले आहेत ? काम थांबविले

मा.उपायुक्त साहेब (सा) - ज.बो. मध्ये रस्ता करावयाचे ठरले

मा.श्री चव्हाण दि.ना.- रस्त्याचा खर्च पी डब्ल्यु डी कडून परत मिळणे साठी प्रयत्न करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब - मंजूर करा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज रस्त्याचे मजबुत करण करणे कामी मंजूर अंदाज पत्रका (निविदा) व्यतीरिक्त खडीकरण व पाईप गटरचे कामास व मुळ अंदाज पत्रकातील बचती मधून रक्कम रूपये ८,०८,२४१/- (रू.आठ लाख आठ हजार दोनशे एक्केचाळीस फक्त ) चे खचार्स मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी

सुचक - मा.श्री जोशी अं.सु.

अनुमोदक - मा.श्री गंधे मि.स.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ४ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ४ दिनांक १९/१/२००६

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगांव रोड वरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट जवळ टि.पी.स्की.नं. ३ फा.प्लॉ.नं.९२ मधील व्यायाम शाळेच्या कंपाउन्ड लगत दुकान गाळे बांधणेस व एस्टीमेट रक्कम रूपये १६,३८,२२७/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट कि, मा.शहर अभियंता ,मा.नगररचनाकार यांचे समवेत दिनांक २४/२/०५ रोजी उपरोक्त ठिकाणी समक्ष पहाणी करणेत आली बुरूडगांव रोडवरील टी.पी.स्कीम नं.३ फायनल प्लॉट क्र.९२ मध्ये मनपाचे मालकीचे श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट असून त्याचे दक्षिणेस मनपाची व्यायामशाळा असून व्यायाम शाळेच्या भोवती आर.सी.सी. कॉलम व वीट बांधकामाची संरक्षक भिंत बांधणेत आली आहे. सदर संरक्षक भिंतीचा आधार घेवून गाळे बांधणे बाबत झालेल्या चर्चे नुसार सदर ठिकाणी उत्तरेकडील भिंतीचा आधार घेवून २.५० मी.x ३.०० मी आतील आकाराची १८ दुकाने बांधता येतील.

सदर ठिकाणी काळी माती (b.l.Soil) असलेने पक्का पाया लागत नसलेने दगडी बांधकामाचा पाया करता येत नसलेने " पाईल फौंडेशन " करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २००४-२००५ सार्व बांधकाम विभागाचे दर सूची नुसार अंदाज पत्रक तयार केले असता अंदाज पत्रकीय किमंत १८ दुकानांसाठी रू.७,०३,२८२/- होत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे गाळे बांधणेस व येणारे रक्कम रू.७,०३,२८२/- चे खर्चास प्रशासकीय मान्यते साठी सविनय सादर.

येणे प्रमाणे ज्यु.इंजि.श्री सोनटक्के वि.ग.व सिटी इंजिनिअर यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता सदरची बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असल्यामुळे आपण व नगररचना विभाग याच्या कडील संयुक्त प्रकरणी वरिष्ठा कडून प्रशासकीय मान्यता घेवून कार्यवाही करणे योग्य

मा.उपायुक्त साहेब (सा) - शहर अभियंता व्यायाम शाळेच्या दक्षिण व उत्तर या दोन्ही बाजूस दुकान गाळे काढणे शक्य असलयास तशा प्रकारचा प्रस्ताव अंदाजपत्रक व नगररचनाकार यांचे अहवालासह सादर करा.

फेर सादर - उपरोक्त आदेशानुसार बुरूडगांव रोडवरील टी.पी. स्कीम नं.३ फायनल प्लॉट नं.९२ मधील अस्तित्वातील व्यायामशाळेच्या दक्षिण उत्तर संरक्षक भिंतीचा वापर करून गाळे (दुकाने ) काढणेचे शक्यते बाबत मा.नगररचनाकार यांचे समवेत दिनांक १०/३/०५ रोजी फेर पडताळणी केली असता मा.नगररचनाकार यांनी दिलेल्या अभिप्रायाचा दक्षिण भिंती लगत २.५० मी-x ३.०० आत आत मापाचे १९ दुकाने व उत्तरेकडील भिंतीलगत १७ दुकाने असे एकूण ३६ दुकाने बांधता येतील.

सन २००४-२००५ चे सार्व .बांधकाम विभागा कडील दरसुची नुसार अंदाज पत्रक तयार केले असता ३६ दुकानांसाठी रक्कम रू.१६,३८,२२७/-खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे दुकाने बांधणेस व येणारे रक्कम रू.१६,३८,२२७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे ज्यु.इंजि.श्री सोनटक्के वि.ग. यांचा अहवाल फेरसादर असे.

शहर अभियता - नगररचना विभागाच्या अभिप्रायानुसार बुरूडगांव रोड वरील टि.पी.स्कीम नं.३ फायनल प्लॉट क्र.९२ मधील व्यायाम शाळेच्या सुरक्षा भिंतीच्या दोन्ही बाजूस ३६ दुकाने बांधता येतील असे कळविले आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,३८,२२७/- आहे. प्रशासकीय मान्यता मिळणेस सादर.

मा.उपायुक्त साहेब (सा) - शहर अभियंता ,नगररचनाकार व मुख्य लेखा परिक्षक यांचे अहवालानुसार मंजूरीसाठी शिफारस आहे. मात्र काम करतांना कामाचा 'A' व 'B' असे दोन भाग करून एक काम पूर्ण झाल्यानंतर प्रतिसाद पाहून दुसरे काम करणे उचित राहील. सन २००४-०५ चे अर्थ संकल्पीय अंदाजात हे काम करणे शक्य नसल्याने आगामी वर्षात म्हणजेच सन २००५-०६ चे अंदाजपत्रकातून काम करणे योग्य राहील आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब - नविन बजेटचे मंजूरी नंतर फेरसादर करा.

सन २००५-२००६ करिता तरतुद

| | | |
|---|---|---|
| नविन इमारत | - | १,००,०००/- |
| पेंडिग बिले | - | Nil |
| या प्रस्तावातील खर्च | - | रू. १६,३८,२२७/- |
| एकूण खर्च | - | रू. १६,३८,२२७/- |

सन २००५-२००६ करिता "नवीन इमारत " या लेखा शिर्षकांतर्गत रू.१.०० लक्ष तरतूद अंदाजपत्रकामध्ये करणेत आली असून बुरूडगांव रोडवरील टी.पी स्कीम नं.lll फायनल प्लॉट नं.९२ मनपाचे व्यायाम शाळेच्या दक्षिणोत्तर संरक्षक भिंतीलगत गाळे बांधणेचे रक्कम रूपये१६,३८,२२७/- अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सध्या पुरशी तरतूद नसलेने उपरोक्त कामाच्या निविदा काढता येणार नाहीत. तरी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे ज्यु.इंजि.श्री सोनटक्के वि.ग. यांचा अहवाल फेरसादर असे.

शहर अभियंता - सन २००५-२००६ करिता नवीन इमारत या लेखा शिर्षकांतर्गत रू.१.०० लक्ष तरतूद आहे व कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,३८,२२७/- आहे तरी अर्थसंकल्प तरतूद नसल्यामुळे काम करणे / निविदा काढणे उचीत नाही. योगय आदेशार्थ सादर

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसलेमुळे तूर्त मान्यता देणे योग्य नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - कलम १०१ अन्वये तरतुदीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावे.

फेर सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो कि, बुरूडगांव रोडवरील दुकाने बांधणे बाबत मा.महापौर साहेब यानी मागणी केलेली आहे त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सन २००५-०६ या आर्थिक वर्षा मध्ये बुरूडगांव रोडवरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजीमार्केट जवळ दुकाने बांधणेच्या कामास रक्कम रूपये ५,००,००/- (पांच लाख)ची तरतूद करण्यांत आलेली आहे.सदरच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्म रूपये १६,३८,२२७/- इतकी आहे.

वरील ठिकाणच्या कामास सक्षम समितीची मान्यता घेणे टेडर काढणे,तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समितीपुढे ठेवणे व कार्यादेश देणे इत्यादी बाबी करिता किमान दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे सन सन २००५-२००६ मधील अंदाजपत्रकीय तरतूद वरील ठिकाणचे

प्राथमिक कामासाठी पुरेशी आहे. परंतु सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाच्या मध्ये उर्वरीत रक्कमेची तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी अंदाजपत्रकीतील तरतूदीस अधिन राहून बुरूडगांव रोडवरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट जवळ दुकाने बाधंणेच्या कामास सक्षम समितीपुढे ठेवणेच्या आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे ज्यु.इंजि.श्री सोनटक्के वि.ग. यांचा अहवाल फेरसादर असे.

शहर अभियंता - शाखा अभियंता यांच्या अहवालानुसार मंजुरीस सादर.

मुख्य लेखा परिक्षक - शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे सदरचे काम पूर्ण करावयाचे झालेस सन २००६ -२००७ चे अदांज पत्रकीय तरतूदी मधे अंदाज पत्रकीय रक्कम तरतूद करून मा.मनपा सभेची मान्यता घेणे बाबत दक्षता घेणे आवश्यक सदरची जबाबदारी शहर अभियंता यांचे वर निश्‍चित करणेत यावी.

मा.उपायुक्त साहेब (सा) - वर्षाचा उर्वरित कालावधी विचारात घेता या वर्षात संपूर्ण रक्कम खर्च होवू शकणार नाही. त्यामुळे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - सहमत.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री गंधे मि.स.- सध्या तेथे असलेले भाजी मार्केट चालत नाही.तेथे गाळे कसे चालतील.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- सध्याचे गाळे चुकीच्या पध्दतीने काढलेले आहेत. सुविधा नसलेने भाजी मार्केट विक्रेते बाहेर बसतात.

मा.उपायुक्त साहेब (सा) - गाळया मुळे भाजी मार्केट चालेल.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बजेट प्रोव्हिजन नाही त्यामुळे मंजूर कसे करणार बजेट किती शिल्लक आहे तेथे टप-या न बांधता चांगले काम करावे.

ज्यु.इंजि. श्री सोनटक्के - बजेट तरतूद पांच लाखाने कमी आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- जागा चांगली आहे. शॉपिंग सेंटर बांधावे

मा.श्री गंधे मि.स.- किती मोजमापाचे गाळे आहेत. जागा किती आहे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - व्यायाम शाळेच्या दक्षिणे कडे व उत्तरे कडे मार्केट कडे तोंड करून २.५० मी.X ३.०० मी आतआत मापाचे १९ व १७ असे एकूण ३६ गाळे बांधणे आहे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- ऑडीटरच्या शे-या प्रमाणे ज.बो.पुढे प्रकरण ठेवावे.मार्केट डिमॉलीश करून सर्व गाळे बांधावे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- त्यासाठी एक कमेटी नेमावी.

मा.श्री जोशी अ.सु.- बी.ओ.टी वर केल्यास मोठी इमारत होईल

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- सभापतींनी रूलींग द्यावे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - बजेट तरतुदी साठी ज.बो.कडे सादर करावे लागेल.

मा..श्री चव्हाण दि.ना.- जागा मोक्याची आहे भाजी मार्केट वापरात नाही त्यामुळे मोठया स्वरूपात सर्वच गाळे काढावेत विषय सध्या तहकूब ठेवा.पूर्ण अहवाल मागवून मोठा प्रोजेक्ट करावा.

मा.उपायुक्त साहेब (सा) - सदर जागी भाजी मंडईचे आरक्षण आहे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बेसमेंटला भाजी मार्केट पहिले दूसरे मजल्यास ऑफिस गाळे काढून मनपाने उत्पन्न वाढविणेसाठी भव्य शॉपिंग करावे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- छोटया गाळया पासून उत्पन्न कमी मिळेल तालमीच्या पुढील जागेचाही वापर करणेत यावा.

मा.श्री गंधे मि.स.- अतिक्रमण होवू नये. म्हणून कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब - नगर अभियंता व नगर रचनाकार यांनी जागा पहाणी करून भव्य शॉपींग कॉम्प्लेक्स बांधणे बाबत अहवाल सादर करावा. तूर्त सदर विषय तहकूब ठेवण्यांत यावा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील बुरूडगांव रोड वरील श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट जवळ टि.पी.स्कीम नं. ३ फा.प्लॉ.नं.९२ मधील व्यायाम शाळेच्या कंपाउन्ड लगत दुकान गाळे बांधणेस व एस्टिमेट रूपये १६,३८,२२७/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्टावर सभे मध्ये झालेल्या साधक -बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

नगर अभियंता व नगररचनाकार यांनी प्रस्तावातील जागेची पहाणी करून तेथे भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे किंवा दुसरा प्रोजेक्ट राबविणे विषयी प्रस्ताव तयार करून स्थायी समिती पुढे सादर करणेत यावा

सुचक - मा.श्री त्रिपाठी सु.चं.

अनुमोदक मा.श्री चव्हाण दि.ना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ५ दिनांक १९/१/२००६

ठराव क्रमांक - ५ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका लिपीक श्री संभाजी कार्ले फायर फायटर विभाग यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथील दि.९/१/०६ ते दि.७/४/०६ या कालावधीत होणा-या प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० करिता पाठविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये लिपीक अग्निशमन विभाग याजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो कि, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे सन २००५-२००६ मध्ये प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० आयोजित करणेत आलेला असून दि.२८/११/२००५ पर्यत प्रवेश अर्ज पाठविणे बाबत संदर्भीय पत्रकानुसार कळविणेत आलेले आहे.

सदरचे प्रशिक्षण हे दि.१५/१२/०५ ते दि.१२/३/०६ या कालावधीत असून सदरच्या प्रशिक्षणास माझी मनापासून जाण्याची तयारी असून व असलेल्या संपूर्ण अटी मी पूर्ण करीत आहे तसेच दि.१/१/२००५ ते दि.२४/६/२००५ या कालावधी मध्ये प्रभारी फायर इनचार्ज म्हणून मी यशस्वीरित्या काम केलेले आहे. तरी सदरच्या प्रशिक्षणास प्रशिक्षण घेण्यासाठी मला जाणेस व प्रशिक्षण पूर्ण करणेस मान्यता मिळावी हि विनंती.

येणे प्रमाणे फायर फायटर विभाग श्री संभाजी कार्ले यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) - श्री कार्ले यांनी यापूर्वी प्रभारी फायर इनचार्ज म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. प्रस्तावीत प्रशिक्षणासाठी श्री कार्ले यांचा प्रवेश अर्ज राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे कडे पाठविणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - सहमत.

फेरसादर,

विषय - राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे होणा-या पाठयक्रम ४० पुरस्कर कालावधी दि.१५/१२/०५ ते १५/३/०६ ऐवजी ९/१/०६ ते ७/४/०६ या अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रमास श्री संभाजी कार्ले यांना पाठविणेस व प्रशिक्षण खर्चास मंजूरी मिळणेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास सविनय सादर.

उपरोक्त विषयान्वये मुख्या अग्निशमन अधिकारी याजकडून फेर विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो कि, मा.अग्निशमन सल्लागार यांचे कडील पत्र क्र. ५६५ रा.अ.प्र.के अन्वये राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.४० (पुरस्कृत) यापाठयक्रमाकरिता आग्निशमन सेवेतील कर्मचा-यांचे अर्ज विहीत नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दि.२८/११/०५ पर्यत मा.अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालयात पाठविणे बाबत कळविणेत आले हाते.

त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांचे मंजुरीने श्री कार्ले यांचा प्रवेश अर्ज पाठविणेत आला होता. त्यामध्ये श्री कार्ले यांची सदरच्या प्रशिक्षणास निवड झाल्याने सदरचे प्रशिक्षण दि.१५/१२/०५

ते १५/३/०५ ऐवजी दि.९/१/०६ ते ि,७/४/०६ या कालावधीत पूर्ण करणेस व प्रशिक्षण खर्चास मंजूरी मिळणेस मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मुख्य अग्निशामक अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) - प्रस्ताव 'अ ' प्रमाणे कार्यवाही करणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - सहमत

सभापती साहेब - कार्यालयीन प्रस्तावानुसार प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठक्रम ४० हे दि.९/१/०६ पासून सुरू होणार असल्यामुळे कालावधीचा विचार करता व प्रशासनाने दिलेली मंजूरी पाहता श्री संभाजी कार्ले यांना प्रशिक्षणास पाठविणेस मंजूरी देण्यात येत आहे. मात्र अखेर मंजूरी करीता लगताच्या स्थायी समितीपुढे ठेवण्यांत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री चव्हाण दि.ना.- आपण कर्मचा-यांस प्रशिक्षणास पाठवितो.या पूर्वीच्या कर्मचा-यांना खर्च व सवलती दिल्या नाहीत.

मा.उपायुक्त साहेब (सा) - नियमा प्रमाणे देय्य सवलती दिल्या आहेत होस्टेल व इतराचा खर्च देता येणार नाही.

मा.श्री चव्हाण दि.ना.- त्यांना फायदा काय मिळणार रिपोर्ट वाचा .

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त साहेब (सा) - शासन फि भरणेत येईल.

मा.श्री चव्हाण दि.ना.- मंजूर करा.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- आपले कडे काही बिगारी जे.सी.बी.ड्रायव्हींग शिकले असून ते जे.सी.बी. ड्रायव्हरचे काम करतात.

मा.उपायुक्त साहेब (सा) - स्टॉपिंग पॅटर्न मध्ये त्यांचा विचार करणेत येईल प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कर्मचा-यांना भविष्यात फायदा होईल.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका लिपिक श्री संभाजी कार्ले फायर फायटर विभाग यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथील दिनांक ९/१/२००६ ते दिनांक ७/४/२००६ या कालावधीत होणा-या प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम ४० करिता पाठविणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - मा.श्री चव्हाण दि.ना..

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ६ दिनांक १९/१/२००६

ठराव क्रमांक - ६ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मंजूरीस्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकूर** - महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५९ (१) नमुना क्र.२७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर बाबवार जमा - खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे ".असे नमूद करण्यात आले आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेवून मा.स्थायी समिती सभेपुडे मंजूरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

या प्रमाणे लेखापाल अहमदनगर महानगरपालिका यांचा प्रस्ताव

मा.उपायुक्त (सा) - अहवाला नुसार सादर

मा.आयुक्त साहेब - सहमत

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभेमध्ये झालेली चर्चा

मा.श्री गंधे मि.स.- लेखी स्वरूपात माहिती द्यावी.

मा.श्री जोशी अ.सु.- अकौंट कोडचे नियमांचे पुस्तक मी वाचले माझे दोन मुद्दे आहेत त्याची माहिती मला मिळावी मार्च मध्ये आपण अंदाज पत्रक प्रसिध्द करतो त्या वेळी वर्ष अखेरची देय रकमेची माहिती देणे आवश्यक आहे किंवा नाही काही कालवधी नंतर बील रेकॉर्ड केले जाते ते ही निमयानुसार आहे का ? पांच वर्षा नंतर बील रेकॉर्ड केले जाते. दिले जाते हे नियमानुसारआहे ? निगोशिएशन ॲक्ट प्रमाणे दोन वर्षा नंतर बीलाची मागणी केली नाही तर देणे बुडते अशी तरतूद आहे आपले कडे तसे नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - गंभीर विषयावर आपण चर्चा करित आहेत.या बाबत चर्चा करून नियम करणे आवश्यक आहे. डबल एन्ट्री सिस्टीम मुळे,खाजगी मध्ये वर्ष अखेरीस देय रकमेची माहिती मिळते.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- ठेकेदार काम करतो त्याने केलेल्या कामाचे बील पेड करणे आवश्यक आहे.

मा.श्री जोशी अ.सु.- पंधरा वर्षा पूर्वीचे बिल रेकॉर्ड करतायेईल काय

मा.उपायुक्त साहेब (सा) - बीलाचे पहिले रेकॉर्डीग होणे आवश्यक आहे मग बील कधीही पेड करा सदर कामी चीफ ऑडीटर शहर अभियंता इ.ची कमेटी नेमू बजेट

मिटींग वेळी सर्व अभियंते यांना पेडींग बीला बाबत माहिती मागितली होती.

मा.श्री जोशी अ.सु.- सदर कामी चार्टर्ड अकौन्टन्ट नेमा.

मा.उपायुक्त साहेब (सा) - इंजिनिअर यांनीच माहिती दिली नाही तर तो कुणाला मार्ग दर्शन करणार बीले अकैांट ऑडीट,विभाग तसेच इंजिनिअर यांचे कडेस असतात.इंजिनिअर यांनी पेडींग बीले,वर्क ऑर्डर दिलेली कामे,अशाची यादी करावी. कोणतेही बील पेन्डीग नाही असे बजेट वेळी सर्टिफिकेट दयावे.

मा.श्री गंधे मि.सं.- बील तयार झाले की बील मनपाचे रेकॉर्डला असावे ते इकडे तिकडे नको एकाच जागी असावे.

मा.श्री जोशी अ.सु.- ३१ मार्च २००५ला चार कोटी चार लाख देणी होती सन २००६ ची परिस्थिती काय?

मा.उपायुक्त साहेब (सा) - पब्लीश करू आउट स्टॅडींगला असलेल्या बीलाच्या यादीसह

मा.श्री जोशी अ.सु.- नावा सह देणी द्यावी.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मंजूर करण्यांत येत आहे. अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे कडेस सादर

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री चव्हाण दि.ना.

अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ७ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ७ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१ मार्च २००५ अखेरचा मत्ता,दायित्वे व वार्षिक लेख्यांचा सारांश मुख्य लेखा परिक्षक यांचे अहवाला सह मंजूरीस्तव सादर

**प्रस्तावाचा मजकूर** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये " नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे " असे नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपारिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर वार्षिक लेख्याचा सारांश तयार करण्यात आला असून यात सुरवातीचे शिलकेसह रू.६० कोटी ७ लाख ६७ हजार ३९९ इतके जमा झाले असून ५४ कोटी ५१ लाख २ हजार ४१० रूपये खर्च वजा जाता रू.५ कोटी ५६ लाख ६४ हजार ९८९ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं.६१ नमुना नं.२९ प्रमाणे ३१ मार्च २००५ अखेरचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले असून यात मता हे ३१ कोटी ४ लाख १९ हजार ८०१ असून दायित्व १ अब्ज ८६ कोटी २३ लाख ९२ हजार ३१६ असून दायित्व हे मत्तेपेक्षा १ अब्ज ५५ कोटी १९ लाख ७२ हजार ५१५ ने अधिक आहे. तरी मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल घेवून मा.स्थायी समिती सभेपुढे मंजूरीस ठेवणेसाठभ आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

मा.उपायुक्त साहेब (सा) - अहवालानुसार सादर.

आयुक्त साहेब - मु.ले.अहवालाचे अवलोकन करतामनपाचे दायित्व हे १५५ कोटी १९ लाख आहे. सदरची बाब गंभीर असून मनपाआर्थिक संकटास असल्याचे आढळते. सदरचे दायित्वाचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे.यासाठी मनपाने महसुली उत्पान्नाचे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे.

लेखा परिक्षक यांचा अहवाल - अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता अहवाल देण्यांत येतो कि,

१. आर्थिक स्थिती बाबत- दिनांक ३१/३/०५ वरून अखेरची मत्ता व दायित्व पडताळणी केली असता दायित्व हे मत्ते पेक्षा रक्कम रूपये १,५५,१९,७२,५१५/- ने अधिक आहे. (सोबत तक्ता) यावरून मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे निदर्शनास येते.

२. मत्ता व दायित्व तक्यांमधील कर्मचारी,पुरवठादार ,ठेकेदार इतर अग्रीम धन एकूण रक्कम रू.६३,११,८३७/- ही रक्कम मत्ता सदरी दर्शविण्यांत आली असती तरी प्रत्यक्षात मनपा कडे रोख स्वरूपात जमा होणा-या नाहीत.त्या फक्त समायोजीत होणा-या आहे. सदरचा खर्च अंतिम रित्या योग्य त्या लेखा शिर्षकाखाली नोंदविला गेल्यावर सदरच्या रकमा कमी होतील पर्यायाने ती मत्ता समजणे योग्य होणार नाही.

३. मत्ता सदरी मनपास शासनाकडून देय असलेल्या अनुदानाची रक्कम ११,२८,२८,५४९/- एवढी मत्ता म्हणून नमूद केलेली आहे. सदरच्या रकमा शासनाकडून अदयाप मुळातच प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे मत्ता समजणे योग्य होणार नाही. त्यामुळे दायित्वाच्या रक्कमेत आणखी वाढ होईल.

४. मनपाचे कराचे थकबाकीचे प्रमाणे बरेच असल्याचे दिसून येते. दि.३१/२/०५ रोजी खालील प्रमाणे कराची वसुली होणे बाकी आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संकलीत कर व त्यावर आधारीत कराची थकबाकी (अंदाजे) | १,७०,२९,०००/- |
| २ | नळ धारकाकडील पाणी पट्टी | ९७,८३,०००/- |
| ३ | सर्व साधारण पाणी पट्टी | ३४,१७,०००/- |
| ४ | इमारत गाळा भाडे | ६०,१७,१५६/- |
| | एकूण वसुल न झालेले कर | ३,६२,४६,१५६/- |

प्रलंबीत कराच्या वसुलीसाठी मनपाने ठोस उपाय योजना न अवंबविल्यास वसुल झालेल्या रकमेतून अत्यावश्यक खर्च वजा जाता कर्जाच्या परत फेडीचे हप्ते व थकबाकीच्या रकमा प्रदान करणे मनपास शक्य नाही. त्यासाठी मनपाने खर्चात काटकसर करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे इतर करात वाढ करून आर्थिक स्थिती बळकट करणे आवश्यक आहे.त्यासाठी इतर उत्पन्नाची मार्ग शोधणे आवश्यक आहे.

५. मनपाने उभारलेल्या व्यापारी गाळयाच्या भाडयाबाबत वेळोवेळी फेर आकारणी करावी. करार करते वेळी अन्य कालावधीचा करार करून करारामध्येच भाडेवाढीची तरतूद ठेवावी.व वाढीव कर न देणा-या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून व्यापारी गाळे रिक्त करून रितसर भाडयाने देणे विषयी कार्यवाही करावी. परंतु मनपाने भाडयाने दिलेले व्यापारी गाळे तत्वाचे भाडे त्याची फेर आकारणी याबाबत मनपाकडून उदासिनता दिसून येते. त्यामुळे मनपास प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या व्याजा इतके देखील उत्पन्न मिळत नाही. यावरून आर्थिक बाजूला भक्कम करण्या कडे मनपा अधिका-याने पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे.

६. मनपा लेखा संहिता १९७१ नियम २७ मधील तरतुदी नुसार प्रत्येंक वर्षाच्या शेवटी जेथे सर्व साधारण प्रयोजनासाठी विनियोजन करणे शक्य नाही. अशा सर्व सवैधानिक निधीतील शिलकी ठेवी अनुदाने व कर्जे यातील अखर्चीत शिल्लक वगळून मनपा कडे मुबलक शिल्लक असणे आवश्यक आहे. तथापी अपेक्षित शिल्लक कमी आहे. म्हणजेच मनपाची आर्थिक परिस्थीती चांगली नसल्याने दिसनू येते.

७. मनपा कर वेळोवेळी विविध संस्थाकडून कर्ज घेतलेले आहेत. त्याची दरवर्षी हप्ते फेडणे दायित्वाचा भाग आहे.

८. मनपा कडे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे स्वतंत्र खाते असून दि.२२/६/०५ रोजी शिल्लक रक्कम रूपये २०,३६,१४१/- बँकेत मनपाच्या नावाने जमा आहे. सदर खर्चाचे अनुदानाचा समावेश मनपा मत्ता व दायित्व पत्रात केलेला नाही तरी योग्य ती दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

९. मनपा ने राखीव निधी ठेवलेले आहेत परंतु त्या निधी मध्ये भरणा कमी केल्याने सदरच्या रकमा दायित्वामध्ये घेणे आवश्यक आहे. यावरून आर्थिक स्थिती आणखी खराब असल्याने निदर्शनास येते.

१०. मनप कडील थकबाकी देणे बाकी

१. मुळा पाणी बिल जीवन प्राधिकरण

२. म.रा.वि.मंडळ पाणी बिल

३. मुळा वॉटर सप्लाय

४. स्कुल बोर्ड वर्गणी

५. इतर थकीत बिले बाबत रक्कम रूपये १,५८१९,३४,५१२/- हून अधिक देय आहे.

सोबत जोडलेल्या मत्ता व दायित्व रोजचा जमा खर्च आजची तातडीची देयके चालु आर्थिक वर्षातील मार्च ०६ अखेर कर्ज फेडीचे हप्ते याचा विचार करता मनपाची आर्थिक परिस्थिती असमाधानकारक असलेचे म्हणणे योग्य ठरेल. त्यानुसार मनापाने आर्थिक परिस्थिती बळकट होणेचे दृष्टीने पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१. वार्षिक कर मुल्य निश्चित झाले बरोबर सुधारीत मागणी बिले त्वरीत पाठवून ३१/३/०६ अखेर जास्तीत जास्त वसुली करून व टक्केवारी योग्य ठेवून अनुदानात कोणत्याही प्रकारे कपात होणार नाही याबाबत दक्षता घेणे.

२. व्यावसायिकाच्या पाणी पट्टी मध्ये व घरगुती वापर पाणी पटटी मध्ये वाढ करून पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण करणे.

३. नविन पदे निर्माण करू नयेत व आवश्यक ती रिक्त पदे आवश्यकता भासल्यास भरणे.

४. महाराष्ट्र शानसन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक बीजी टी २५९५ प्र.क्र.१० /अर्थ संकल्प १९ दि.५ एप्रिल ९५ मधील दुरध्वनी व विज वापरात काटकसर करणे आवश्यक आहे.तसेच लेखन सामुग्री खरेदी,व वापर वाहनावरील दुरूस्ती व देखभाल यावरील काटकसर करणे.

५. फनिर्चर व सुविधा विषयी विहीत प्रमाणात व आवश्यक `इतकेच फर्निचर खरेदी करणे अतिरिक्त फर्निचर सजावट यावरील खर्च टाळणेत यावा.

६. मनपाने जाहिरात कर,हॉटेल,बँका,सार्वजिनक कार्यालये इ.वरील संकलीत कर निर्धरीत करून उत्पन्न वाढीच्या संदर्भात प्रमाण निश्चित करावेत.

७. शहरातील विविध ठिकाणी केलेल्या अनाधिकृत बांधकामाचा तपासणी पथका माफर्त शोध मोहित घेवून दंडनीय कारवाई करावी.

८. अनाधिकृत नळ जोडणी तपासणी पथका मार्फत शोध मोहिम घेवून दंडनिहाय कारवाई करावी.

९. मनपा हद्यतील अतिक्रमणे काढून दंडात्मक कार्यवाही करावी.

१०. रस्त्यांवरील रस्त्यांलगत पडलेल्या बांधकाम साहित्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण करणा-यावर दंडात्मक कार्यवाही करून उत्पन्न वाढविणे योग्य.

११. शहरालगत ,उपनगरात मंगल कार्यालये ,भाजी मार्केट व व्यापारी गाळयांची संख्या वाढवून उत्पन्नात वाढ करणे.

१२. मोकाट जनावरे पकडून कोंडवाडयात टाकून त्यापासून उत्पन्न मिळविणे.

१३. नविन मोटार वाहने खरेदी न करणे.

१४.पेट्रोल व डिझेल खर्चात काटकसर करणे.

१५.भाडे तत्वावर वापर असलेल्या वाहनात कपात करणे.

१६.विजेच्या वापराबाबत मोठया प्रमाणावर काटकसर करणेत यावी.

१७.अपूर्ण बांधकामे लवकर पूर्ण करणे विलंब झालेस त्यांच्या किमतीत वाढ होवून संस्थेवर अधिक खर्चाचा भार पडणार नाही अशी कामे त्वरीत पूर्ण करणेत यावी.

उपरोक्त योजनांची अंमलबजावणी करून मनपाची आर्थिक परिस्थिती मजबूत होणे कामी कार्यवाही होणे योग्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१ मार्च २००५ अखेरचा मत्ता दायित्वे व वार्षिक लेख्यांचा सारांशास मुख्य लेखा परिक्षक यांचे अहवाला सह मंजूर ी देण्यांत येत आहे अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे कडेस सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री चव्हाण दि.ना.

अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ८ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ८ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार सौ.सुनिता रवि कांबळे बिगारी यांना महानगरपालिका नोकरीतून बडतर्फ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** - आरोपीत कामगार सौ.सुनिता रवि कांबळे गार्डन बिगारी यांना आस्था ४५९ दि.१३/५/०५ अन्वये आरोप पत्र क्र.६१९ दि.३०/५/०५ चे देण्यांत आले ते असे,

तुम्ही महानगरपालिकेचे गार्डन बिगारी या पदावर कामावर होता परंतु दिनांक १/१२/९९ पासून कोठल्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता व ऑफिसची परवानगी न घेता परस्पर गैरहजर राहिले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या कामाचा खोळंबा झाला असून आपण ऑफिस कामाची खोटी केलेली असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले असलेने तुमचेवर आरोप पत्र ठेवण्यात येत आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रामध्ये ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास दिनांक २४/६/०५ रोजी खुलासा दिलेला आहे. तसेच खातेनिहाय चौकशी मध्ये आरोपीत कामगाराने दि.३०/७/०५ व दि.११/८/०५ रोजी जबाब दिलेला आहे. सदर जबाबामध्ये आरोपीत कामगाराने त्यांचे वर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबूल केले आहेत. व आधिक असे म्हटले आहे कि,माझे घरची परिस्थिती ही नाजूक असून मला नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. माझे कडून सदरील चूक झालेली आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही. याबाबत मी दक्षता घेईल तरी मला एकवेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे. अशी विनंती आरोपीत कामगाराने केलेली आहे.

चार्ज ऑफिसर यांनी आरोपीत कामगाराविरूध्द आरोप पत्र भरलेले आहे. तथापी चौकशी कामी चार्ज ऑफिसर हे एकाही तारखेस हजर राहिलेले नाहीत.

आरोपीत कामगाराने त्याचेवर आरोपपत्रामध्ये ठेवलेले आरोप कबूल केल्यामुळे आरोपीत कामगारा विरूध्द आरोप शाबीत होत आहेत.

आरोपीत कामगाराविरूध्द आरोप शाबीत झालेले असलने आरोपीत कामगार हे शिक्षेस पात्र ठरत आहेत. आरोपीत कामगाराविरूध्द शिक्षेचा निर्णय घेतानां आरोपीत कामगार हे दिनांक १/१२/९९ पासून गैरहजर आहेत. याबाबतही निर्णय होणे आवश्यक आहे. तरी आदेशार्थ सादर येणे प्रमाणे चौकशी अहवाल असे.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा) - संबधीत कर्मचा-याचा एकुण सेवाकाळ विचारात घेता त्यांचे गैरहजेरीचा काळ फार मोठा असून दोषारोष सिध्द झाल्याने सौ.सुनिता कांबळे यांना खालील शिक्षा प्रस्तावीत करण्यात येत आहे.

मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) अन्वये " पुढे नौकरी मिळण्यास अपात्र होणार नाही. अशा प्रकारे मनपा सेवेतून काढून टाकणे " हि शिक्षा देणे आवश्यक वाटते याबाबत कलम ५६ (३) अन्वये आपली बाजू मांडणे साठी सौ.सुनिता कांबळे यांना संधी देणे बंधनकारक आहे. तसेच या कामी मनपा अधिनियमातील कल ५६ (१) चे परंतु (अ) अन्वये स्थायी समितीची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी त्याना अंतिम संधी देणे बाबत व विषय मा.स्थायी समिती कडे सादर कारणे बाबत ओदशार्थ सादर.

आयुक्त साहेब - प्रस्तावीत शिक्षे बाबत कारणे दाखवा नोटीस काढा.

फेरसादर,

आरोपीत कामगार सौ.सुनिता रवि कांबळे उद्यान बिगारी यांचे वर आस्था जा.नं.४५९ दि.१३/५/०५ अन्वये देण्यात आलेले आरोपपत्र क्र.६१९ दि.३०/५/०५ चे दोष सिध्दीनंतर त्यांना जा.नं.कामगार १९८० दि.३/१०/०५ अन्वये,"तुम्ही पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे मनपा सेवेतून कमी करण्यांत येत आहे. अशी शिक्षा का करणेत येवू नये याचा खुलासा कारणे दाखवा नोटीस दिली असता आरोपीत कामगार सौ.कांबळे यांनी अद्याप पावेतो सदर नोटीशीस खुलासा दिलेला नाही.

तरी आदेशार्थ फेरसादर असे.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - कारणे दाखवा नोटीसीस खुलासा देणे त आलेला नाही. प्रस्तावीत करणेत आलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल तथापी मा.स्थायी समितीची पूर्व मंजूरी आवश्यक असल्याने प्रकरण स्थायी समिती मध्ये ठेवावे.आदेशार्थ .

मा.आयुक्त साहेब - संबंधीतीस सुनावनीसाठी नोटीस काढा.

सौ.सुनिता रवी कांबळे बिगारी ग्रामपंचायत केडगांव मनपा झाले पासून कामावर हजर नाही.गैरहजर राहणेसाठी सबळ कारण नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - आरोपीत कर्मचारी सौ.सुनिता रवि कांबळे हे दि.३०/११/०५ रोजी सुनावणीसाठी मा.आयुक्त साहेब यांचे समोर हजर राहून त्यांनी त्यांचे गैरहजेरी बाबत बाजू मांडली गैरहजेरी बाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. तथापी त्यांचा एकूण गैरहजर कालावधी पाहता त्यांना नौकरीची आवश्यकता नाही असे दिसून येते सबब त्यांना प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल. सदर शिक्षेस मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (अ) अनुसार मंजूरीस्तव प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठवावे लागेल तरी आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर झालेली चर्चा

मा.सभापती साहेब - सौ.कांबळे मॅडमना सभेत बोलवा

त्याप्रमाणे सौ.सुनिता रवि कांबळे यासभेत उपस्थित झाल्या.

मा.सभापती साहेब - आपण गैरहजर का होता.

सौ.कांबळे - आजारपण व घरगुती कारणामुळे गैरहजर होते.

मा.उपायुक्त साहेब (सा) - सौ.कांबळे सहा वर्षे कामावर आलेल्या नाहीत त्यामुळे कामावर घेण्याचा प्रश्नच येत नाही.

मा.श्री गंधे मि.स- बडतर्फ करावे.

मा.श्री खैरे दि.सा.- त्यांना कामावर घ्यावे एक वेळ माफ करावे

मा.श्री सय्य सा.आ.- माफ करावे.

मा.उपायुक्त साहेब (सा) - त्यांना बडतर्फ करावे अन्यथा ४५१ नुसार मा.शासनास अहवाल पाठविणेत येईल.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- कुणाचे नुकसान करू नका त्यांना माफ करणे ही योग्य नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) - खाते निहाय चौकशी वेळी ब-याच वेळा बोलावले एकदाच हजर राहिल्या.

मा.श्री चव्हाण दि.नां.- मागील ठरावाच्या अंमल बजावणी बाबत काय झाले दिनांक २८/१२/०५ च्या निर्णया प्रमाणे निर्णय घ्यावा दिनांक ३०/६/०३ चे पूर्वी न.पा. असतांना का कार्यवाही केली नाही.

कामगार अधिकारी श्री ढाकणे - २८/१२/०५ चे निर्णयाची अंमल बजावणी अद्याप झालेली नाही

सौ.कांबळे यांचे सर्व्हिस बुक भरले नाही. त्या हदवाढी पासून कामावर हजर नाहीत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- दिनांक २८/१२/२००५ प्रमाणे निर्णय घ्यावा हदवाढी मधून हे कर्मचारी न.पा. मध्ये आले नंतर मनपा झाली मधले काळात ऑफिसने काय कार्यवाही केली त्यांना एकदा सवलत द्यावी.

मा.उपायुक्त साहेब (सा) - कामावर घेणे म्हणजे नविन नेमणुक आहे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सदर प्रकरणी लिगल रिटेनरचे मत मागवावे.

मा.सभापती साहेब - सदर प्रकरणी लिगल रिटेनर यांचे मत मागविण्यांत यावे व आलेल्या मता प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांनी कार्यवाही करावी.

**ठराव** - मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार सौ.सुनीता रवि कांबळे बिगारी यांना महानगरपालिका नोकरी तून बडतर्फ करणेस मंजूरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्ध प्रस्तावावर सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

सदर प्रकरणी महानगरपिालकेचे कायदेशीर सल्लागार यांचे मत घेण्यांत यावे व आलेल्या मता प्रमाणे मा.आयुक्त साहेबांनी पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री चव्हाण दि.ना.

अनुमोदक - मा.श्री गंधे मि.स.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.१०

विषय क्रमांक - ९ दिनांक १९/१/२००६

---

ठराव क्रमांक - ९ दिनांक १९/१/२००६.

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी व पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजा साठी आर.टी.ओ.कडील योग्य परवाना धारक वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो कि,मनपाचे अधिकारी पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी आरटीओ नियमाप्रमाणे योग्य परवानाधारक वाहने सन २००५-२००६ या आर्थिक वर्षा करीता भाडयाने लावणे कामी दै.लोकसत्ता दि.१४ जुलै २००५ अंकात जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द केली असता वेळेत व मुदतीत एकूण १२ दरपत्रके (पुरवठा दाशंनी ) सादर केलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्त केला असता बहुतांश वाहन पुरवठा दारांनी वाहन एक किंवा दोन वाहनांची दरपत्रके सादर केली असून नियमाप्रमाणेआर टी ओ कडील योग्य परवाना असलेली कागदपत्रे देखील दरपत्रका सोबत जोडलेली आहेत.

दरपत्रकांचा तुलनात्मक दृष्टया अभ्यास केला असता माउली टुर्स ॲण्ड ही संस्था असून त्यांचे टाटा इंडिकाचे व मारूती व्हॅनचे इंधना व्यतिरिक्त प्रतिदिनी (२४ तास) रूपये ४५१/- ,३९५ इतके आहेत. तसेच शिवराणा बहुउद्येशीय केंद्र हि देखील संस्था असून त्यांनी स्कार्पिओ वाहनाचे इंधना व्यतिरिक्त १२ तासा करिता रूपये६२५/- व २४ तासा करिता रूपये १२५०/- किंवा प्रती कि.मी.६/-रू चे दिलेले असून कमीचे आहेत तसेच क्वॅालिस चे दर १२ तास ६००/-२४ तास १०००/- व प्रतिदिनी ५.७५ प्रमाणे टाटा सुमो व स्पॅसीओ १२ तास ६००/- २४ तास १०००/- प्रतिकि मी ५.७५/- मार्शल १२ तास ६००/- २४ तास १०००/- प्रतिकि मी ५.७५ सॅन्ट्रो - १२ तास ४७५/- २४ तास - ९००/- प्रतिदिनी ६.५०/- या प्रमाणे दर दिलेले आहेत.

त्यामुळे मारूली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहुउदेशीय केंद्र या दोन संख्या मनपास अनेक प्रकारची वाहने भाडे तत्वावर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास केला असता ,कमी दराने उपलब्ध (आवश्यकतेनुसार ) करून देवू शकतात.

तरी सन २००५-२००६ साला करिता रिपोर्टात नमूद केलेले माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहु उद्येशीय सेवा केंद्र या दोन संस्था असून त्यांनी वाहन भाडयाचे दर देखील कमी दिलेले असून त्यांचे दर मंजूर करण्या करिता तसेच मनपास आवश्यकते नुसार मा.अधिकारी पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामासाठी संबधीत फॅर्मची वाहने भाडयाने लावणे कामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी हि विनंती तथापी आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे मो.व्हे.क्लार्क यांचा अहवाल असे.

मॅकेनिकल इंजि.- अहमदनगर महानगरपालिकेची विविध अधिकारी व मा.पदाधिकारी यांचे प्रशासकीय वापरा करिता मनपा कडील वाहने अपुरी पडतात पर्यायाने त्यांचे करिता भाडयाने वाहन उपलब्ध होणेस्तव या वाहनांच्या दरा करिता निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या निविदेतील आलेले कमीचे दर स्वीकरण्यास व मंजूर दरानूसार निवीदाकारास मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,या विभागाचे परवानाधारक वाहन उपलब्ध करून देणेस योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

मुख्या लेखा परिक्षक - मा. शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. वाहन १००५प्र.क्र.१३/२००५ विनिमय मुंबई यांचे कडील शासन निर्णय दि.२५ मे २००५ प्रमाणे व मॅकेनिकल इंजि. याचे कडील प्रस्तावा प्रमाणे माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व शिवराणा बहुउद्येशीय सेवा केंद्र यांचे कमीचे दरास मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर)- अ प्रमाणे प्रस्ताव मंजूरीस मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - आर.टी.ओ. यांनी जिल्हायात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रक ठरविली असल्यास त्याची माहिती घेवून फेरसादर करा. तसेच यापूर्वी गत २ वर्षाचे मनपाचे मंजूर दराची माहितीही द्यावी.

मा. फेरसादर. आर टी ओ यांनी जिल्हयात वाहने भाडयाने घेणे कामी दरपत्रके ठरविले किंवा कसे ? याबाबत प्रत्यक्ष उपप्रादेशीक परिवहन कार्यालय अहमदनगर येथे प्रत्यक्ष चौकशी केली असता त्यांनी मा.विभागाीय आयुक्त ,नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालयात झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे दि.११/२/२००४ रोजीच्या सभेतील ठरावा प्रमाणे टॅक्सी व ट्रॅक्सचे सुधारीत दराची कॉपी दिलेली आहे त्याची तपशीलवार माहिति पूढील प्रमाणे

विषय क्र.११ वातानूकुलीत कॅबचे दर

| अ.नं | वाहनांचा प्रकार | प्रति कि.मी. | १२ तास किंवा १२० कि. मी. | २४ किंवा २५० कि.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | वॅगनोर | ६.०० | ७२० | १५०० |
| २ | झेन | ६.०० | ७२० | १५०० |
| ३ | मारूती | ५.०० | ६०० | १२५० |
| ४ | इंडिका | ५.५० | ६६० | १३७५ |
| ५ | सॅन्ट्रो | ६.०० | ७२० | १५०० |
| ६ | ॲम्बेसिटर | ५.५० | ६६० | १३७५ |
| ७ | इंडिगो | ७.०० | ८४० | १७५० |
| ८ | आयकॉन फोर्ड | ९.०० | १०८० | २२५० |
| ९ | उनो | ६.५० | ७८० | १६२५ |
| १० | पालिओ | ५.५० | ६६० | १३७५ |
| ११ | होंडा सिटी | १५.०० | १८०० | ३७५० |
| १२ | इस्टीम | १०.०० | १२०० | २५०० |
| १३ | सिएलो | ८.०० | ९६० | २००० |
| १४ | टोयाटो | १२.०० | १४४० | ३००० |
| १५ | टाटाइस्टेट | ८.०० | ९६० | २००० |
| १६ | मार्सिडीज | २५.०० | ३००० | ६२५० |
| १७ | ११८एम ई | ६.०० | ७२० | १५०० |
| १८ | सुमो | ६.०० | ७२० | १५०० |
| १९ | क्वॉलिस | ७.०० | ८४० | १७५० |
| २० | टाटा सफारी | १०.०० | १२०० | २५०० |
| २१ | अेसेंट | १०.० | १२०० | २५०० |
| २२ | स्कार्पिओ | १२.०० | १४४० | ३००० |
| २३ | ओपेलो | १२.०० | १४४० | ३००० |
| २४ | ओपेलोफोरसा | १२.०० | १४४० | ३००० |

तसेच गत दोन वर्षा पूर्वीचे मनपाचे दराचीमाहिती मा.सथायी समिती ठराव क्र.८ दि.१४/८/२००४ चे मंजूरीने तसेच निगोशिएशन मध्ये झालेल्या चर्चेनुसार टा टा सुमो प्रतिदिनी रूपये ४१०/- क्वॉलिसचे प्रतिदिनी रूपये ४१५/- व इंडिका प्रतिदिनी रू.४००/- ॲम्बेसिटर प्रतिदिनी रू.४००/-व मारूती व्हॅन प्रतिदिनी रू.४०५/- इंधना व्यतिरिक्त मंजूरीचे दर होते. परंतु त्यावेळेस आर टी ओ कडील योग्य परवान्याची अट पुरवठादार यांना टाकण्यात आले नव्हती सदरची अट ठरावानंतर वर्तमानपत्रात आरटी ओ कडील प्रसिध्दी खुलासा आल्यानंतर दिनांक १४/१/२००५ पासून घालण्यात आली होती मंजूर त्यामुळे टेंडर दराने योग्य परवाना असलेली वाहने भाडयाने लावणेस अनेक अडचणी आल्या.येणे प्रमाणे माहिती देण्यांत येत आहे.

तरी सन २००५-२००६ साला करिता वाहन पुरवठादार यांनी दिलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता पाहता माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स यांचे मारूती व्हॅन व टाटा इंडिका यावाहनांचे भाडयाचे दर कमी असल्याचे तसेच शिवराण बहुउद्येशीय सेवाकेंद्र यांचे १. टाटा सुमो २. महेंद्र मार्शल ३. क्वॉलिस ४. स्कार्पिओ ५. सॅन्ट्रो ६. स्पॅसिवो या वाहनाचे भाडयाचे दर असल्याचे दिसते तसेच त्यांनी लेखी पत्र देवून तोंडी चर्चेस बोलाविल्यास वाहन भाडयाचे दर कमी करण्याची तयारी देखील दर्शविली आहे. त्यामुळे मनपास आवश्यकते नुसार मा.आधिकारी ,पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी संबंधीत फर्मची वाहने भाडयाने लावणे कामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी हि विनंती. तथापी आदेशार्थ रिपोर्ट सादर.

येणे प्रमाणे मो.व्हे.क्लॉर्क व मो.मॅकेनिक यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब कर - उपरोक्त अहवाल सविनय सादर प्रस्ताव मान्यते करिता मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - मु.ले.तपासून अभिप्रायासह सादर करा.

मुख्य लेखा परिक्षक - मेकॅनिकल इंजि. यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे निगोशिएशन करिता बोलाविणेस हरकत नाही.

मा.आयुक्त साहेब - संबंधीताशी दर कमी करणे बाबत वाटाघाटी कराव्यात.उपायुक्त + मु.ले.प.+अभियंता यांत्रिकी यांचे समक्ष.

सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो कि,मनपाचे अधिकारी व पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यकते नुसार वाहने भाडयाने लावणे कामी वर्तमानपत्रात जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करून दरपत्रके मागवून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता ,संबधीत वाहन पुरवठादार यांना वाहन भाडयाचे दर कमी करण्यासाठी जा.क्र३८९/१७/१२/०५ अन्वये पत्रानुसार दि.१९/१२/२००५ रोजी स.११.३० वाजता मा.उपायुक्त साहेब (कर) यांचे दालनात निगोशिएशन करणे करिता समक्ष बोलाविले असता त्यांनी वाहन भाडयाचे दर कमी करण्यास तयारी दर्शविली असून लेखी पत्र देखील दिले आहे. १. माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स अ.नगर यांनी खालील वाहनांचे निगोसिएशन मध्ये कमी केलेल दर दिलेले आहेत.

| वाहनाचा प्रकार | प्रतिदिनी |
|---|---|
| १. टाटा इंडिका | ४२५/- रू.इंधना व्यतिरिक्त |
| २. मारूती व्हॅन | ३९०/- रू.इंधना व्यतिरिक्त |

२. शिवराणा बहुउदेशीय सेवा क्रेंद्र व स्वयंरोजगार सेवा उद्योग सहकारी संस्था अहमदनगर यांनी वाहनाचा

| प्रकार | १२ तास | २४ तास |
|---|---|---|
| ७. टाटा सुमो | ४८५/- | ८००/- इंधना व्यतिरिक्त |
| ८. स्पॅसिओ | ४८५/- | ८००/- ----//------ |
| ९. क्वॉलिस | ५५०/- | ८२५/- -----//------- |
| १०. मार्शल | ४७५/- | ६५०/- ----//------- |
| ११. सॅन्ट्रो | ४५०/- | ७००/- ----//----- |
| १२. स्कार्पिओ | ६००/- | ८००/- ----//------ |

तरी रिपोर्टात दर्शविल्याप्रमाणे निगासिएशन मध्ये कमी केलेल्या वाहन भाडयाचे दराने माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स अ.नगर या फर्म मार्फत मारूती व्हॅन व टाटा इंडिका कार वाहने भाडयाने लावण्यास तसेच शिवराणा बहउदेशीय सेवा केंद्र व स्वयंरोजगार सेवा उद्योग सहाकारी संस्था या फर्म मार्फत टाटा सुमो ,स्पॅसिओ, क्वॉलिस ,मार्शल सॅन्ट्रो ,स्कार्पिओ ही वाहने मनपाचे आधिकारी ,पदाधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यकते नुसार वाहने भाडयाने लावणे तसेच त्याकामी येणा-या खर्चास व कामास मंजूरी मिळावी तसेच संबधीत फॅर्मला वेळोवेळी आवश्यकते नुसार वाहने पुरविण्या बाबतचा पुरवठा आदेश देणेस देखील मंजूरी मिळावी हि विनंती आदेशार्थ सविनय सादर.

मेकॅनिकल इंजिनिअर - अहमदनगर मनपाचे अधिकारी / पदाधिकारी यांना प्रशासकीय कार्यालयीन कामकाजा करिता भाडयाने परवानाधारक वाहणे लावणे कामी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.वाहन धारक संस्थेशी दराबाबत निगोसिएशन केल्यानंतर आलेले कमीचे दर मंजूरीस्तव सादर.

मुख्य लेखा परिक्षक - निगोसिएशन मध्ये कमी करून दिलेल्या दरानुसार १. माउुली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल व २. शिवराणा बहुउदेशीय सेवा केंद्र या फर्म मार्फत वेळोवेळी व आवश्यकते नुसार वाहन भाडयाने लावणे बाबत मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर) - प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य .

मा.आयुक्त साहेब - प्रति कि.मी.दर आणि वाहनाचे टुरिस्ट परवान्या बाबत स्पष्ट अभिप्राय देवून फेर सादर करा.

मेकॅनिकल इंजिनिअर - प्रति कि.मी.चे दराबाबत वाहन कमीत कमी ३०० कि.मी.चा ॲव्हरेज घेत असल्याने त्या दराने वाहने भाडयाने लावल्यास निगोसिएशन मध्ये कमीकेलेल्या वाहन भाडयाचा दरापेक्षा जास्त रक्कम द्यावी. लागणार असल्याने प्रति कि.मी.चा विचार निगोसिएशन मध्ये करण्यात आलेला नाही. तसेच वाहने भाडयाने लावतांना टुरिस्ट परवाना असल्याशिवाय वाहने भाडयाने लावण्यात येणार नाहीत. येणे प्रमाणे खुलासा करण्यात योग्य आहे तरी मंजूरीस्तव सादर,

मा.उपायुक्त साहेब (कर ) - उपरोक्त प्रमाणे अहवाल सविनय सादर.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावाशी सहमत.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री .गंधे मि.स.- गाडया कुणाला द्यावयाच्या ती माहिती द्यावी.

मॅके.इंजि.श्री निकम - सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांना गाडया देणे आहेत.

मा.उपायुक्त साहेब (सा) - वसुली विभागासाठी गाडी घेतो आहेत.

मा.श्री गंधे मि.स.- आता किती गाडया भाडयाने लावणे आहेत.

मॅके. इंजि. श्री निकम - आपण आवश्यकते नुसार गाडया भाडयाने लावतो त्याचे आता फक्त दर मंजूर करणे आहेत.

मा.श्री गंधे मि.स.- हे टेंडर सन २००५-२००६ करिताचे आहे. मार्च नंतर परत टेंडर काढा.

मा.सभापती साहेब - दर सांगा.

मॅके.इंजि.श्री निकम - माउली टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स अहमदनगर यांचे टाटा इंडिका प्रतिदिन रू.४२५/- व मारूती व्हॅन प्रतिदिन रू.३९०/- प्रतिदिन इंधनाव्यतिरिक्त व शिवराणा बहुउदेशीय सेवा केंद्र व स्वयंरोजगार सेवा उदयोग सहकारी संस्था अहमदनगर यांनी.

| वाहन प्रकार | १२ तास | २४ तास | इंधनाव्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| टाटा सुमो | ४८५/- | ८००/- इंधना व्यतिरिक्त | |
| स्पॅसिओ | ४८५/- | ८००/- ----//------ | |

| | | | |
|---|---|---|---|
| क्वॉलिस | ५५०/- | ८२५/- | -----//------- |
| मार्शल | ४७५/- | ६५०/- | ----//------- |
| सॅन्ट्रो | ४५०/- | ७००/- | ----//----- |
| स्कार्पिओ | ६००/- | ८००/- | ----//------ |

या प्रमाणे निगोशिएशन नंतरचे कमीचे दर आहेत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- डिझेल किती देता

मॅके.इंजि. श्री निकम - पांच लिटर डिझेल दिले तर ५० कि.मी. प्रवासाचे अॅव्हरेज पाहून पुन्हा डिझेल देतो.

मा.श्री गंधे मि.स.- मार्च पर्यत दरास मंजूरी

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजा साठी आर टी ओ काडील योग्य परवाना धारक वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट पहाता १. माउुजी टुर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स अहमदनगर २. शिवराणा बहुउदेशीय सेवा केंद्र व स्वयंरोजगार सेवा उघोग सहकारी संस्था अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच नामंजूर निविदा धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती ,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.११

विषय क्रमांक - १ दिनांक ४/२/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक ४/२/२००६

**प्रस्तावाचा विषय** - मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** - मागील सभा दिनांक १९/१/२००६ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर.

मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१/२००६ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे हा विषय वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री चव्हाण दि.ना.- मागील सभेत मंजूर झालेला श्रीमती कांबळे मॅडम विषयी ठराव लिगल रिटेनर यांचे कडेस अभिप्रायासाठी पाठविला आहे का?

मा.सभापती साहेब - मा.आयुक्त साहेब यांना झालेले ठराव दाखवून ते पाठविणे आहेत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सक्कर रोड बाबत काय ठराव झाला तो वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्रमांक तीन दि.१९/१/२००६ रोजी पारित झालेला ठराव वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- सदर विषया बाबत मा.जनरल बोर्डा मध्ये कमेटी नेमलेली आहे.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - कमेटीने जागा ही पाहिली आहे.

मा.सभापती साहेब - कमेटी बरोबर मा.नगरसेवक श्री गिरवले हेही होते.

मा.श्री गंधे मि.स.- सदर विषया बाबत स्थायी समिती व जनरल बोर्ड मधील मुद्दे वेगवेगळे होते.

मा.श्री चव्हाण दि.ना.- मा.स्थायी समिती मध्ये निर्णय झालेल्या विषयावर ज.बो. मध्ये चर्चा होउन कमेटी नेमणे बाबत निर्णय होतो. स्थायी समितीचे कार्यवृत्त कायम होणे आहे.मग ज.बो. मध्ये कमेटी नेमली जाते हे कसे.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - कुठल्याही विषया बाबत कुणाचीही कधी ही कुठे ही तक्रार असू शकते मा.नगरसेवक जनरल बोर्डा मध्ये विषय उपस्थित करू शकतात.

मा.श्री चव्हाण दि.ना.- जनरल बोर्डा मध्ये चर्चा होवून कमेटी नेमली जाते हे आपल्या निर्णया विरूध्द नाही का?

मा.सभापती साहेब - कमेटीने सदर रस्त्याची पहाणी केली त्याचे काय झाले.

शहर अभियंता श्री कुलकर्णी एन.डी. - तीन चार ठिकाणी खोदाई करून पाहिली तेथे खडीकरण केल्याचे आढळले.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- आम्ही पूर्वी सदर रस्त्याची पहाणी केली पेपरला ही आले मनपा ची बदनामी झाली नाही का ?

मा.सभापती साहेब - कामात काही गैर आढळल्यास मा.आयुक्त साहेब कार्यवाही करू शकतात.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- सदर रस्त्याचे कामास माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री जोशी अ.सु.- कार्यवृत्त मंजूर करा.

**ठराव** - मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सक्कर चौक ते आयुर्वेद कॉलेज पर्यत रस्त्याचे कामास मा.श्री त्रिपाठी सु.च. सदस्य स्थायी समिती यांचा विरोध .

सूचक - मा.श्री जोशी अ.सु.

अनुमोदक - मा.श्री गंधे मि.स.

ठराव बहुमताने मंजूर

सभापती ,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.११

विषय क्रमांक - २ दिनांक ४/२/२००६

---

ठराव क्रमांक - २ दिनांक ४/२/२००६

**प्रस्तावाचा विषय** -अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील महत्वाच्या रस्त्याचे खडीकरण डांबरीकरण साईड गटर सह सुशोभिकरण करण्याच्या एकूण सहा कामाचे एकूण रूपये १,३२,५४,५३०/- चे अंदाज पत्रकास व सदर कामाची एकत्रित एकाच रकमेची जाहिर निविदा मागविणेस प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपार्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती रिपोर्ट देण्यांत येतो कि, मा.खास महासभा ठ.क्र.१ दि.१९/२/२००५ अन्वये शहर विकासाच्या दृष्टीने शहरातील एकूण रस्त्यांचे मजबूतीकरण ,डांबरीकरण व सुशोभिकरणाची कामे करण्यास मंजूरी दिलेली आहे. मंजूर झालेल्या कामा पैकी एकूण सहा कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. ते खालील प्रमाणे.

| अ.नं. | रस्त्यांचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | माळीवाडा वेस ते डॉ.आंबेडकर पुतळा रस्त्यांचे रूंदीकरण डांबरीकरण व आवश्यक त्या ठिकाणी गटार करणे. | १४,०३,९१६/- |
| २ | केडगांव लिंक रोड आयोध्यानगर कॉलनी ते जय हिंद नगर ते भूमकर घर ते दत्त चौका पर्यत डांबरीकरण करणे. | ९,१०,८५०/- |
| ३ | गुलमोहर रोड व पाईप लाईन रोड यांना कोहीनूर मंगल कार्यालय मार्ग जोडणार रस्ता (जुना पिंपळगांव रस्ता रूंदीकरण ,मजबूतीकरण डांबरीकरण व आवश्यक त्या ठिकाणी गटार बांधणे. | ३०,६०,३२७/- |
| ४ | नगर-मनमाड रोड प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौक रस्ता रूंदीकरण,मजबुतीकरण,डांबरीकरण करणे व काही भागांत गटार करणे. | २६,११,३४९/- |
| ५ | एस.टी.स्टॅण्ड छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते आय.टी.आय.कॉलेज ते बुरूडगांव बाबर मळया पर्यत रस्ता रूंदीकरण,डांबरीकरण करणे व काही भागांत गटार बांधणे. | २२,६०,५८९/- |
| ६ | बोल्हेगांव येथील गांधीनगर ते नगर-मनमाड रोड रत्याचे रूंदीकरण मजबुतीकरण,डांबरीकरण व आवश्यक त्या ठिकाणी गटार बांधणे. | ३०,०४,२३७/- |
| | एकूण | १,३२,५४,५३०/- |

उर्वरीत चार कामे एम.एस.आर.डी.सी. खात्या मार्फत करण्यात येणार आहेत. तरी उपरोक्त रत्यांच्या खडीकरण ,डांबरीकरण सुशोभिकरण करण्याच्या कामांचे रक्कम रूपये १,३२,५४,५३०/- चे अंदाजपत्रक व आराखडे तयार करून सोबत जोडले आहेत. तरी उपरोक्त

सर्व रस्ते चागंल्या गुणवत्तेची होण्याच्या दृष्टीने सर्व कामांच्या एकत्रित एकाच जाहीर निविदा मागविणे करिता आदेशार्थ सविनय रिपोर्ट सादर.

शहर अभियंता - वरील सहा रस्त्याच्या कामाची एकत्रित (एकच रकमेची) निवीदा मागविणे करिता सादर.

City Engi.- please show budget prousion before ३१ March ०६

सन २००५-२००६ चा सुधारीत अंदाजपत्रका मध्ये शहरातील मुख्य रस्त्यांचे रूंदीकरण /डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली १,७५,००,०००/- ची तरतूद केली आहे.

शहर अभियंता वरील अंदाज पत्रकीय तरतुदी पेक्षा उपलब्ध शिफारस किती याचा खुलासा करा.

उपलब्ध शिल्लक - १,३६,८३,९६४/-

मुख्य लेखा परिक्षक - उपलब्ध शिल्लक पाहता सहा सदर प्रस्तावात मान्यता दिलेला मार्च २००६ अखेर नविन कोणतीही कामाचे प्रस्ताव सदर करणेस येवू नयेत. या बाबत शहर अभियंता यांची दक्षता देते आवश्यक आहे.सदर बाबीस अधिन राहून मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब सा - अहवालानुसार मंजूरीसाठी व निविदा प्रसिध्दीसाठीच्या कार्यवाहीसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावित रस्ते डांबरीकरणची कामे मा. महासभेने मंजूरी दिलेली असलेने या कामाचे अंदाज पत्रक प्रशासकीय मंजूरी देणेस हरकत नाही.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब - डॉ.आंबेडकर रस्त्याचे कामाबाबत माहिती सांगा

मा.श्री चव्हाण दि.ना.- एस्टिमेट मध्ये काय काय धरले आहे.

उपशहर अभियंता श्री मगर एन.बी.-रस्त्याची लांबी २२० मीटर रूंदी १२ मीटर धरली आहे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सदर रस्त्याचे एका बाजूस झोपड पट्टी व दुसरे बाजूस मनपा क्वार्टर आहेत. रस्त्याचे दोन्ही बाजूस पक्क्या बांधकामाची घरे आहेत. अतिक्रमण असलेने १२ मीटर रस्ता कसा धरला रस्ता कसा करणार.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - वसाहतीचे बोर्ड पर्यत रस्ता करणेस अडचण नाही पुढे पन्नास फूट रस्त्यासच अडचण येईल तेथील अतिक्रमण काढले तर रस्ता होईल जेवढे काम होईल त्या प्रमाणेच बील होणार.

शहर अभियंता श्री .कुलकर्णी एन.डी - प्रस्ताव प्रशासकीय मान्यातेस आहे. सदर रस्त्याचे एस्टिमेट प्रत्यक्षकात कमी जास्त होवू शकते.

मा.श्री चव्हाण दि.ना.- जेथे रस्ता कमी धरला तेवढे एस्टिमेट कमी करणार आहे का ? हा रस्ता कधी झाला त्याचा खर्च किती रस्ता करण्याची आवश्यकता आहे का ? काही ठिकाणी ग्राउटिंग धरले आहे. जागेवर बसून एस्टिमेट केले काय ?

मा.श्री गंधे मि.स.- सिटी इंजि.श्री कुलकर्णी साहेब येण्या पूर्वी रस्त्याचे एस्टिमेट केलेले आहेत जेथे आडरग्राउड गटरचे काम झाले आहे. तो खर्च कमी होईल

मा.उपायुक्त साहेब श्री देशमुख साहेब - गोवर्धन अपार्टमेंटच्या बाजूने गटर नाही.वीस वीस मीटरअंतरावर क्रॉस गटरचे काम धरलेलेआहे.

मा.श्री गंधे मि.स.- आत्ताच रस्त्याचे काम केलेले आहे. कारपेट केले तरी चालेल.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सदर रस्त्यांची बजेटला प्रोव्हिजन आहे. सिटी इंजि.यांनी सर्व रस्त्याची पाहणी करावी.ज्या रस्त्यावर चार चार वेळा डांबरीकरण केले तेथे डब्ल्यु बी एम चे काम एस्टिमेट मध्ये धरले आहे.सर्व रस्त्यावर डब्ल्यु बी एम चा खर्च वाढवून धरला आहे.

उपशहर अभियंता श्री मगर एन.बी - आवश्यक तेथे डब्ल्यु बी एम चे काम धरलेले आहे. डांबरीकरण केलेल्या जागेचे नाही.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बुरूडगांव रोड बाबर मळया पर्यत जिल्हा परिषदेने केला आहे. तेथे महापौर निधीतूनही काम झालेले आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- रस्ता एक नंबरचा झाला आहे. आय टीआय पर्यत काम करावे. पुढे रस्ता करू नये.उरलेले एस्टिमेट सहकार सभागृह रस्त्यासाठी वापरावे.

उपशहर अभियंता श्री मगर एन.बी - सदर रस्त्याचे तीन मीटर डांबरीकरण आहे. रस्ता रूंदीकरणाच्या ठिकाणी डब्ल्यु बी एम चे काम घेतलेले आहेत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- मनपा हद्यीतून बुरूडगांव वगळायचे चालेले आहे. तेथे तीस लाख खर्च नको.

मा.श्री गंधे मि.स.- हद्यी पर्यत रस्ता करावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- असे रस्ते वगळून दुस-या रस्त्याची कामे करावी.

मा.सभापती साहेब - जनरल बोर्डा मध्ये रस्ते ठरवलेले आहेत. त्यास मंजूरी आहे.

मा.श्री गंधे मि.स.- आहे अशा पोझीशन मध्ये काम करावे असे आमचे मत नाही. सर्व पाहून चांगले रस्ते करावेत सर्वची सर्व प्रोव्हिजन वापरू नये.

मा.श्री चव्हाण दि.ना.- आवश्यकते नुसार पाहणी करून काम करावे. आनावश्यक खर्च करू नये.

मा.सौ.काळे गि.सु.- वेगवेगळे टेंडर काढावेत.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - कामाचे क्वालिटी साठी एकच टेंडरे काढावे वेगवेगळे काढल्यास ठेकेदार कामे वाटून घेतील जास्त रक्कमेची टेंडर प्राप्त होतील.

मा.श्री लोंढे सु.सो.- जास्तीचे टेंडरे आल्यास फेर टेंडर काढावे.

मा.सभापती साहेब - ठेकेदार कामे वाटून घेतील.

शहर अभियंता श्री कुलकर्णी एन डी - कॉन्ट्रॅक्टरचा मागील इतिहास (बॅक हिस्ट्री ) पाहून टेंडर इश्यु करावे. त्याचे कडेस मागील काम पेडींग आहे का हे ही पहावे.

मा.श्री चोपडा सं.फु.- सभापती साहेब आपल्या कारकीर्दीत रस्त्याची नागरिकांना दिसतील अशी चांगली कामे व्हावीत.मार्च पूर्वी कामे व्हावीत.

मा.श्री जोशी अ.सु.- टेंडर नोटीस मध्ये नेहमीच्या अटी न टाकता स्टॅन्डर्ड अटी शर्ती सह कामाची मुदत अनियमितीता असल्यास दंडात्मक शिक्षेची तरतूद ठेवावी. अटी शर्ती कडक कराव्यात .मार्च अखेर कामे पूर्ण व्हावीत पेमेट साठी कामे थांबवू नयेत.

शहर अभियंता श्री कुलकर्णी एन डी.- शॉर्ट मुदतीची टेंडर नोटीस काढू कामे लवकरात लवकर करून घेवू.

मा.श्री जोशी अ.सु.- अटी शर्ती दाखव्यात शॉर्ट टेंडर काढावे.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - शॉर्ट टेंडर काढू आपल्या सूचने प्रमाणे शहर अभियंता यांनी दक्षता घेवून पुढील कार्यवाही करावी. दोन लिफाफे पध्दतीने टेंडर मागवावे एक लिफाफा उघडल्यानंतर त्यातील कागदपत्रे परिपूर्ण असल्यास दुसरा लिफाफा उघडावा व पुढील कार्यवाही करावी.

मा.श्री जोशी अ.सु.- ठराव सर्वानुमते मंजूर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील महत्वाच्या रस्त्यांचे खडीकरण डांबरीकरण साईड गटर सह सुशोभिकरण करण्याच्या एकूण कामांचे एकूण रूपये १३२५४५३०/- (रूपये एक कोटी बत्तीस लाख चोपन्न हजार पांचशे तीस फक्त ) चे अंदाज पत्रकास व सदर कामाची एकत्रीत एकाच रकमेची जाहिर निविदा मागविणेस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर

मा.शहर अभियंता यांनी सदर रस्त्यांच्या सर्व जागा पाहून आवश्यकते नुसार तयार केलेल्या अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता देवून त्या प्रमाणे कामे करून घ्यावीत तसेच सदरचे सहाही कामांचे शॉर्ट मुदतीचे टेंडर काढणेत यावे . टेंडर इशु करतांना ठेकेदाराचे मागील रेकॉर्ड पाहून टेंडर इशु करावे.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - चव्हाण दि.ना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.११

विषय क्रमांक - ३ दिनांक ४/२/२००६

ठराव क्रमांक - ३ दिनांक ४/२/२००६.

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभागासाठी सन २००५-२००६ या आर्थीक वर्षा करिता लागणारे इलेक्ट्रीक साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** - उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट कि, सन २००५-२००६ या आर्थिक वर्षा करीता इलेक्ट्रिक विभागासाठी लागणारे इलेक्ट्रिक साहीत्य पुरविण्या संबधी दोन लिफाफे पध्दतीने सिलबंद वार्षिक निविदा दै.केसरी व दै.लोकसत्ता दि.१८/५/२००५ च्या वृत्तपत्रात जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्दी देवून मागविल्या असता मुदतीमध्ये

१. मे.वरीन एंटरप्राईज मुलूंड (वेस्ट ),मुंबई - ८०
२. मे.डी व्ही एंटरप्राईजेस ,मांटुगा ,मुंबई - १९
३. मे. मोनार इलेक्ट्रिकल्स ,७२ मंगलदास रोड, मुंबई - ०२
४. मे.रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि. पिंपरी ,पुणे - १८
५. मे.कैलास इलेक्ट्रिकल्स ,औरंगाबाद .

अशा पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांची दि.२३/६/०५ रोजी उपस्थित निविदाकार मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.उपायुक्त (कर) यांचे समक्ष तांत्रिक लिफाफे उघडण्यात येवून छाननी केली असता प्राप्त पाच निविदांपैकी अ.नं.५ चे निविदाकारांनी तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची पूर्त ता केलेली नसल्याने व त्यांची निविदा अग्राहय असल्याने त्यांचा दराचा (व्यापारी ) लिफाफा उघडण्यात आलेला नाही. व उर्वरित अ.नं.१ ते ४ चे निविदाकारांनी तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची पूर्तता केलेली असल्याने त्यांचे व्यापरी (दराचा ) लिफाफे लगेच उघडण्यांत आलेली आहेत.

सदर निविदा दरांचा सोबतचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.नं.५५ मिक्सर स्टुडो मास्टर (२४ चॅनल) आहुजा कंपनीचे दराची निविदेत मागणी केली असता मं.वरीन एंटरप्राईज ,मुंबई व मे.मोनार इलेक्ट्रिकल्स ,मुंबई यांनी २० चॅनलचा दर दिलेला असून मे.डी.व्ही.एंटरप्राईजस ,मुंबई यांनी १४ चॅनलचा दर दिलेला असल्याने सदर दरांचा विचार करणे संयुक्तीक नाही. अ.नं.१७ ते २४ चे दर मे.वरीन एन्टरप्रायजेस मुंबई व मे.मोनार इलेक्ट्रीकल मुबई यांचे स्पार्धात्मक दृष्टया सर्वात कमी असून समान आहेत. अ.नं. १ ते११, १३ ते १५ १६ मधील Double Ended, १८,२९ ते ३२, ४० ते ४२ ४५,५०,५२ ते ५३ ५७ ६१ ते ६२ चे दर मे.मोनार इलेक्ट्रिकल्स ,मुंबई यांचे अ.नं.१२,१६ मधील single Ended, १९ ते २०, २५ ते२८,३३,३८ ते ३९ ४३,४६ ते ४९ ५१,५४,५६,५८,ते ५९ चे दर मे. डी.व्ही एंटरप्राईजस ,मुंबई यांचे, अ.नं. २१ ते २३ ३४ ते ३७,६० चे दर मे. वरीन एंटरप्राईजेस ,मुंबई यांचे व अ.नं. ४४ चे दर मे. रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि. पुणे यांचे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहेत. तरी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी असणारे दर व समान असणारे दर मंजूरीबाबत व समान असणारे दर कोणाचे मंजूर व्हावेत याबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

तसेच अ.नं.५५ चे दर स्पेसिफिकेशन प्रमाणे प्राप्त झालेले नसल्याने सदरचे साहित्य जरूरी प्रमाणे कोटेशन दर पत्रके मागवून व उर्वरीत अ.नं. चे इलेक्ट्रिक साहित्याचे दर मंजूर झाल्यास सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या नंतर याच मंजूर निविदा दराने सन २००६-०७ या आर्थिक वर्षा करीता मागिविण्यात येणा-या निविदा दरांचा अंतिम निर्णय होई पर्यत मालाचा पुरवठा बिनशर्त करावा

लागेल अशी अट करारनामा करून घेतांना नमूद करून घेवून त्या प्रमाणे साहित्य खरेदी करण्यास व निविदा नामंजूर झाल्यास नामंजूर निविदाकारांची बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळावी हि विनंती आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा रिपोर्ट असे.

सादर,

अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर इलेक्ट्रिकल्स विभागा करिता सन २००५-२००६ साठी स्टोअर विभागाकडून निविदा दर मागविण्यात आले असता निविदा दरा नुसार स्टोअर विभागाने स्पर्धात्मक तक्ता मागविला आहे. तक्त्या मधील अ.नु. क्र.-०१ ते ६२ पर्यत दर दर्शविलेले असून १. मे वरीन एंटरप्राईजेस मुंबई २. मे डी.व्ही एटंरप्राईजेस ,मुंबई ३. मे मोनार इलेक्ट्रिकलस मुंबई ४. मे.रेवाळे एंटरप्रायजेस ,पुणे यांचे दर इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख यांनी तपासले असता खालील प्रमाणे लोएस्ट आहे.

१. मे. वरीन एंटरप्राजेस मुंबई अनु क्र.- १७,२१,२२,२३,२४,३४,३५,३६,३७,६०
२. मे .डी व्ही एंटरप्रायजेस मुंबई अनु.क्र.- १२,१६,१९,२०,२५,२६,२७,२८,३३,३८,३९,४३,४६,४७,४८,४९,५१,५४,५६,५८,५९,
३. मे.मोनार इलेक्ट्रिकल्स मुंबई अनु.क्र. - १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१३,१४,१५,१६,१७,१८,२४,२९,३०,३१,३२,४०,४१, ४२,४५,५०,५२,५३,५७,६१,६२,
४. मे.रेवाळे इम्पेंक्स प्रा.लि.पुणे क्र. - ४४,

वरील अनु क्र. १ ते ४ चे वरील दर्शविल्या प्रमाणे टेनर मध्ये नमूद केलेल्या इलेक्ट्रिकल स्पेसिफिकेशन प्रमाणे आलेले दर स्पर्धात्मक दृष्टया कमी व वाजवी आहेत रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे इले. विभाग प्रमुख मनपा यांचा रिपोर्ट असे.

शहर अभियंता - प्राप्त झालेला निविदा मध्ये चारही पुरवठा दारांचे वेगवेगळया साहित्याचे दर कमी आहेत ज्यांने जे दर आहेत ते मंजूर करण्यास शिफारस आहे.

मुख्य लेखा परिक्षक - मागील सन २००४-२००५ चे मंजूर दर पाहता चालु आर्थिक वर्षात सन २००५-०६ चे दर वाढीव आलेले असले मुळे ज्या निविदा धारकांनी ज्या आयटमचे दर कमी दिलेले आहेत. त्यांनतर निगोशिएशन करिता बोलाविणे संयुक्तीक होईल

मा.उपायुक्त साहेब (कर) - कमी दराच्या निविदा धारकांना निगोशिएशन करीता बोलाविणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - वर्णन केलेल्या मालाचे निकष व गुणवते प्रमाणे संबधीत कंपनी कडून दरपत्रक घेवून फेरसादर करा.

फेर सादर,

विनंती फेर रिपोर्ट कि, आपले उपरोक्त आदेशान्वये निविदेत मागणी केलेल्या स्पेशिफिकेशन प्रमाणे जा.नं. स्टोअर १३८ दि.९/८/०५ अन्वये.

१. मे क्रॉम्पटन ग्रीव्हज लि.पुणे व मुंबई कार्यालय
२. मे.फिलिप्स इंडिया लि.मु बई
३. मे. पॉलिकेप वायर्स प्रा.लि.मुंबई
४. मे.फिनोलेक्स केबल लि. पुणे.
५. मे.एल ॲण्ड टी इलेक्टीकल्स पुणे
६. मे.आहुजा रेडिओ ,नवि दिल्ली.

या उत्पादक कंपन्या कडून दरपत्रकासह माहिती मिळणे बाबत कळविले असता वरील पैकी १. मे.क्रॉम्पटन ग्रीव्हज लि.मुंबई यांनी त्यांचे दि.१३/८/०५ चे पत्रान्वये व २. मे.पॉलीकॅब वायर्स प्रा.लि. मुंबई यांनी यांचे अधिकृत विक्रेते श्री एन एम इलेक्ट्रिकल्स लि.मुंबई यांचे मार्फत संदर्भ पत्र क्र. SH / A/M/ ०५ दिनांक ११/८/०५ अन्वये व मालाचे वर्णन मॉडेल नंबर दरपत्रकासह माहिती दिलेली आहे. त्याचे दर

निविदा दरांच्या तुलनात्मक तक्त्यात अनुक्रमे कॉलम क्र.५ व ६ मध्ये नमूद केले आहेत.मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज लि.मुंबई यांनी त्यांचे दरपत्रकातील अटी शर्ती नुसार १. Vat टॅक्स १२.५% अधिक आकाराला जाईल २. जकात वेगळी ३.पेंमेट - १००% Agaiust Proformq Inavoice ४. दर ३० दिवस ग्राहय आहेत. असे कळविले आहे. तसेच श्री एन.एम. इलेक्ट्रिकल्स लि. मुंबई यांनी त्यांचे दरात Vat टॅक्स ४% अधिक आकारला जाईल असे कळविलेले आहे.

उर्वरित उत्पादक कंपनी कडून अद्याप पर्यंत दरपत्रकासह माहिती प्राप्त झालेली नाही.

तरी माहिती व आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा फेर रिपोर्ट असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) - उपरोक्त प्रमाणे अहवाल सविनय फेरसादर.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावित मालाचे सध्या होलसेल विक्रीचे बाजारभाव दराची माहिती घेवून ७ दिवसांत फेरसादर करा.

फेरसादर,

विनंती फेर रिपोर्ट कि, प्रस्तावित इलेक्टिक साहित्याचे बाजारातील सध्या होलसेल विक्रीचे दराची माहिती घेवून निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र. ७ ते १० मध्ये नमूद केलेली आहे. त्यापैकी बहुतांश इलेक्ट्रिक साहित्याचे दर प्राप्त निविदेतील सर्वात कमीचे दरापेक्षा कमी असल्याने सर्वात कमीचे दर असणारे निविदाकारांकडून निविदा दर निगोशिएशन करून घेवून निर्णय घेणे योग्य होईल तथापी ओदशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा रिपोर्ट असे.

मा.उपायुक्त (कर) - निर्णयास्तव सादर.

मा.आयुक्त साहेब - मु.ले.यांचे अभिप्रायानुसार कमी दराचे निविदा धारकाशी वाटाघाटी कराव्यात सदरचे दर वाजवी आणि बाजारभाव किंमतीशी योग्य रहातील याची दक्षता घ्यावी.

उपायुक्त + मु.ले+ शहर अभियंता

सविनय फेर सादर,

विनंती फेर रिपोर्ट कि, आपले वरील आदेशन्वये प्राप्त निविदेमधील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दर असणारे निविदाकार मे. मोनार इलेक्ट्रिकल्स, मुंबई यांना जा.नं.स्टोअर १८०७ दि.१९/९/२००५ अन्वये मे.वरिन एंटरप्राईजेस ,मुंबई यांना जा.नं. स्टोअर विभाग १८१२ दि.१९/९/२००५ अन्वये ,मे.डी व्ही एंटरप्रायजेस,मुंबई यांना जा.नं.स्टोअर १८१३ दि.१९/९/२००५ अन्वये मे.रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि. पुणे यांना जा.नं. स्टोअर विभाग १८१४ दि.१९/९/२००५ अन्वये दर निगोशिएशन साठी दि. २१/९/२००५ रोजी दु.१२.०० वाजता समक्ष उपस्थित राहणे बाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहून त्यांनी मा.शहर अथियंता मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.उपायुक्त (कर) यांचे समक्ष दर निगोशिएशन करून निविदा दरात दर कमी करून दिलेले आहेत. सदरचे दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.११ ते १४ मध्ये नमूद केलेले आहेत. सदरचे सर्व दर वॅट टॅकस जकात, वाहतुक खर्चा सह महानगरपालिका स्टोअर पोहोच आहेत. तशी माहिती व निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा फेर रिपोर्ट माहिती व निर्णया करिता सादर.

सादर.

अहमदनगर महानगरपालिकेत दैनंदिन इलेक्ट्रीकल साहित्यांचे सन २००५-२००६ साठी आलेल्या टेंडर दरातील तक्त्यानुसार कंपनीचे दर,स्थानिक विक्रते यांचे बाजारभावानुसार आलेले दर व दिनांक २१/९/२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.उपायुक्त साहेब,मा.मुख्य लेखा परिक्षक मा.शहर अभियंता यांचे समोर निगोशिएशन धारकांनी इलेक्ट्रिकल साहित्यांची किंमत कमी केलेली आहे. कमी केलेली किंमत कॉलम क्र.११,१२,१३,१४, मध्ये दर्शिविलेली असून निगोशिएशन नुसार दर्श विलेली किंमत वाजवी असून सदरचे सर्व दर वॅट टॅक्स ,जकात वाहतुक खर्चा सह नगरपालिका स्टोअर विभागात पोहोच आहेत तरी आलेले दर वाजवी असून सन २००५-२००६ चे वार्षिक टेंडर दर मंजूर करण्यात हरकत नाही. रिपोर्ट आदेशार्थ सादर

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा रिपोर्ट असे.

शहर अभियंता - मा.उपायुक्त,मा.मुख्य लेखा परिक्षक व पुरवठादार यांच्या समवेत दर वाटाघाटी बाबत चर्चा होवून पुरवठा दाराने दर कमी केलेले आहेत. कमी केलेले दर हे वाजवी आहेत तरी सन २००५-२००६ चे वार्षिक कमी केलेले निविदा मंजुरीस हरकत नाही.

मुख्य लेखा परिक्षक -शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब - निगोशिएशन नंतर प्राप्त दर वाजवी आहेत. सबब प्रस्ताव मान्यते करिता मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य राहील मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब - वाटाघाटी नंतर आलेले दर व या पूर्वीचे मंजूर दराशी तुलना करता यावर्षी चे निविदेतील दर अवाजवी आले दरवाढ संयुक्तीक नाही प्रस्तावीत मालाचे मंजूर दर पत्रक (या वर्षीचे ) इतर ३/४ मनपा कडून माहिती घेवून व मुख्य लेखा परिक्षकांनी सदरचे दरवाढी मागील कारंणाचा अभ्यास करून फेरसादर करावे.

फेर सादर,

आपले वरील आदेशान्वे जा.नं.ऑडीट २०८३ दिनांक ११/१०/०५ अन्वये एकूण इतर सहा महानगरपालिकेतील इलेक्ट्रिकल साहित्याची सन २००५-०६ या आर्थीक वर्षा करिता टेडर दर
असणा-या दरपत्रकांची माहिती मागविली असता खालील प्रमाणे तीन महानगरपालिकांची माहिती प्राप्त झालेली आहे. त्यानुसार-

१. नाशिक महानगरपालिकेचे दर आपल्या निविदेतील स्पेसिफिकेशन प्रमाणे नाहीत.
२. मालेगांव महानगरपालिकेचे फक्त अ.नं. ३० ते दर रक्कम रू.३०९०/- प्राप्त असून ते आपल्या निविदेतील दरापेक्षा रक्कम रू.४८५/- कमी आहेत.

जळगाव शहर महानगरपालिकेचे बहुतांश इलेक्ट्रिक साहीत्याचे दर (निवीदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम नं.१५ वर नमूद ) आपल्या निविदेतील दरापेक्षा कमी आहेत. त्यामुळे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे निवीदा धारकांकडून पुनश्च दर निगोशिएशन करून निर्णय घेणे संयुक्तीक होईल

मा.उपायुक्त साहेब (कर) - ' अ ' प्रमाणे कार्यवाही करणे योगय राहील

मा.आयुक्त साहेब - सहमत.

फेरसादर,

विनंती फेर रिपोर्ट कि , आपले वरील आदेशान्वये प्राप्त निविदेमधील स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमीचे दर असणारे निविदाकार मे.मोनार इलेक्ट्रिकल्स ,मुंबई यांना जा.नं. स्टोअर २७२२ दि.८/१२/०५ अन्वये,मे.वरीन एंटरप्राईजेस ,मुंबई यांना जा.न. स्टोअर २७२४ दि.८/१२/०५ अन्वये मे.डी.व्ही. एंटरप्रायजेस ,मुंबई यांना जा.नं स्टोअर २७२२ दि.८/१२/०५व रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि.पुणे यांना जा.नं.स्टोअर २७२५दि.८/१२/०५ अन्वये दर निगोशिएशन साठी दि.१५/१२/०५ रोजी सकाळी ११.३० वाजता समक्ष उपस्थित राहणे बाबत कळविले असता मे.रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि. पुणे यांनी समक्ष उपस्थित राहून निगासिएशन केलेल नाही. उर्व रित तीन निविदाकार यांनी समक्ष उपस्थित राहून त्यांनी मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.उपायुक्त(कर) यांचे समक्ष पुनश्च दर निगोशिएशन करून निविदा दरात दर कमी करून दिलेले आहेत. सदरचे दर व प्राप्त सर्वात कमीचे निविदा दरात कमी करून दिलेल्या दराची टक्केवारी निवीदा दरांच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१७ ते १९ मध्ये नमूद केलेली आहे. सदरचे सर्व दर वॅट टॅक्स , जकात वाहतुक खर्चासह महानगरपालिका स्टोअर पोहोच आहेत. तरी माहिती व निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख मनपा यांचा रिपोर्ट असे.

मुख्य लेखा परिक्षक - फेर सादर दोन वेळेस वाटाघाटी करून दर निश्चीत केलेले आहेत सबब मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव

मा.उपायुक्त साहेब कर - संबधीत कमी दराच्या निविदाधारकाशी दुस-यांदा निगोशिएश्न करून दर निश्चीत केलेले आहेत. सदर दर वाजवी वाटतात तरी मंजुरी करिता शिफारशीसह प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य.

मा.आयुक्त साहेब - वाटाघाटी मध्ये निविदेतील दरात मोठया प्रमाणावर कमी केले असलेने प्रस्तावाशी सहमत.

सबब अहवाल स्थायी समिती पुढे सादर.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री जोशी अ.सु.- इ लेक्ट्रीकल साहित्याचे वार्षिक टेडर आहे का ? तीन महिन्यासाठी आहे.

मा.उपायुक्त श्री लहाने साहेब - होय वार्षिक टेंडर आहे

मा.श्री गंधे मि.स.- तीन महीन्यासाठीच आवययक त्या इलेक्ट्रीक साहीत्याची मागणी करावी.

मा.उपायुक्त श्री लहाने साहेब - टेंडर चालू आर्थिक वर्षा साठीचे आहे. याच मंजूर दराने पुढील वर्षीचे टेडर मंजूर होई पर्यत साहीत्य खरेदी करणे चालू रहाते.

मा.श्री चव्हाण दि.ना.- आर्थिक वर्षाचे आता तीन महीने शिल्लक राहीले आहेत.तेवढयाच काळासाठी टेंडर मंजूर करावे. इतक्या उशिरा टेंडर मंजूरी साठी आलेले आहे.

मा.उपायुक्त श्री लहाने साहेब - सदर प्रकरणी बाजार भाव पहाणे तसेच दोन तीन वेळा निगोशिएशन केलेले आहे. त्या मुळे उशिर झाला आहे. जादाचे दर आले होते.

मा.श्री चव्हाण दि.ना.- वार्षिक टेंडरची मंजूरी वेळचे वेळी व्हावी दहा दहा महिने टेंडर प्रोसेस पूर्ण होत नाही.

मा.श्री उपायुक्त श्री देशमुख साहेब - टेडर उशिरा मंजूरी साठी येण्याची कारणे पाहीली तर त्याची कारणे योग्य असल्याची आढळतील आलेले दर जादा होते. मार्केटचे दर पहाणे निगोशिएशन यामुळे उशिर झालेला आहे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- नागरीकांची गैरसोय झाली

मा.श्री गंधे मि.स.- या टेंडर दराने ३१ मार्च पर्यतच खरेदी करावी नंतर टेंडर काढावे.

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - ३१ मार्चला मटेरियल संपले टेंडर काढणेस उशिर लागला तर पुढील वर्षचे टेंडर मंजूरी पर्यत या टेडरचा प्रभाव राहवा.

मा.श्री चोपडा स.फ.- मंजूरी नसलेने ब-याच सदस्यांने आपआपले खर्चा ने टयुबा पुरवून लाईटची कामे केलेली आहेत .

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- याच दराने नगर मध्ये माल मिळतो.

मा.उपायुक्त श्री लहाने साहेब - त्यांनी टेंडर भरावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- याच दराने पुरवठादार साहित्य पुरवणार का ? नाहीतर ४० लाखाची ऑर्डर द्यायची व ५ लाखाचा पुरवठा व्हायचा.

मा.उपायुक्त श्री लहाने साहेब - मार्केट भावाशी तुलना करता टेंडर धारकांनी निगोशीएशन मध्ये कमी केलेल्या दराने माल पुरवठा करण्यांस टेंडर धारक तयार आहेत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सध्याचे मंजूर टेंडर दराने किती मटेरियल खरेदी केले.अंदाजपत्रकीय तरतूद शिल्लक किती?

इले.प्रमुख श्री सावळे - तरतूद रू.८५ लाख खर्च रू.२२ लाख

मा.श्री चव्हाण दि.ना.- मागचे आलेले दर सांगा

इलेक्ट्रीक प्रमुख श्री सावळे -

| तपशील | पूर्वीचे दर रूपये | आलेले कमीचे दर रूपये |
|---|---|---|
| १. ४० वॅट टयूब बजाज | ३६.५० | ३९.०० |
| २. सोडियम व्हेपर १५०वॅट | ४५४.०० | ४८०.०० |
| ३. चोक १५० वॅट | ४३९.०० | ६४०.०० |
| ४. चोक ४० वॅट | ११०.०० | १३५.०० |
| ५. ४० वॅट फिटिंग | ७६५.०० | ८१०.०० |
| ६. १५० वॅट सोडियम फिटिंग | १५०४.०० | ३१९.०० |

मा.उपायुक्त श्री देशमुख साहेब - १५० वॅटचे पुढील बल्ब इत्यादी घेवू नये. असे सभेने ठरवावे.रिफ्लेक्टर वापरल्यास प्रकाश वाढतो. ७० वॅट चा बल्ब २५० वॅटचा प्रकाश पुरवीतो.

मा.श्री गंधे मि.स.- १५० वॅटचे वरचे इत्यादी मागू नये.पण त्याच बरोबर रिफ्लेक्टरची खरेदी करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- पूर्वीचे इले.साहीत्य दर व आताचे दर या मध्ये तफावत आहे. आलेले दर३ ते ६००/- रूपये पर्यत वाढून आलेले आहेत. ३१ मार्च पर्यत पूर्वीचे टेंडर दराने खरेदी करावी. त्याने मनपाचे हित जपले जाईल एप्रिल पासून बजेट झालेवर फ्रेश टेंडर काढावे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- दोन महिन्यासाठी वार्षिक टेंडरला मंजूरी देणे मला मान्य नाही. सन २००५-०६ टेडर फेब्रुवारी २००६ ला स्थायी समिती पुढे मंजूरीस येते . माझा विरोध नोंदवावा.रोखीने स्थानिक खरेदी करावी.

इले.विभाग प्रमुख श्री सावळे- टेंडर मंजूरी शिवाय आम्हाला माल मिळणार नाही.

मा.सभापती साहेब - मंजूर करावे.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभागासाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षा करीता लागणारे इलेक्ट्रीक साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट पहाता १. मे.मोनार इलेक्ट्रीकल्स मुंबई २. मे.डी व्ही एन्टरप्रायजेस मुंबई ३. मे.वरीन एन्टरप्रायजेस मुंबई ४. मे रेवाळे इम्पॅक्स प्रा.लि. पिंपरी पुणे यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे . तसेच समान दराची खरेदी मंजूर निविदा धारक यांचे कडून सम प्रमाणात व स्पेशिफिकेशन प्रमाणे दरप्राप्त न झालेल्या आयटेमची खरेदी आवश्यकते नुसार करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र सन २००६-२००७ करिता इले. साहित्याचे खरेदी कामी एप्रिल २००६ मध्ये नवीन निविदा मागविण्यांत याव्यात.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

इले. साहित्य खरेदी प्रस्तावास मा.श्री त्रिपाठी सु.च.,सदस्य स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक - मा.श्री चव्हाण दि.ना.

अनुमोदक - मा.श्री जोशी अ.सु.

ठराव बहुमताने मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.११

विषय क्रमांक - १ दिनांक ८/२/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक ८/२/२००६

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२००७ सालचे मा.आयुक्त साहेब सादर करणार असलेले मुळ अंदाज पत्रक (म.न.पा.स्कूल बोर्डा सह ) विचारार्थ .

**ठराव** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समिती कडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२०००७ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाज पत्रक व सन २००६-२००७ सालचे जकात कराचे मध्ये वाढ घट करणे आणि अहमदनगर महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्ड भिंगार या दोहाचेही क्षेत्रात संयुक्त जकात कर वसुली बाबतचे कार्यालयीन प्रस्ताव सभे समोर पाहिले.

मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.श्री चव्हाण दि.ना.- इतर महानगरपालिकेमध्ये विशेष स्वच्छता कर नाही . तो बदलणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब ,मा.श्री गंधे मि.स.- मननाने परवानगी दिलेल्या जाहिरात बोर्डा वर परवानगीचा क्रमांक दिनांक मुदत इत्यादीचा उल्लेख करण्यांत यावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- परवानगी व्यक्तीरिक्त असलेल्या हॉटेल ,हातगाडयावर खादय पदार्थ विकणारे इ.व्यवसायांकावर अन्न भेसळ कायदयानुसार कार्यवाही करावी.

मा.श्री जोशी अ.सु. - मनपाचे शॉपिंग सेंटर मधील थकबाकी दारा कडून थकबाकी वसूल करावी करार संपलेले गाळे ताब्यात घ्यावे. उत्पन्न वाढी साठी कार्यवाही करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- डॉ.बाबासाहेब आबेंडकर स्मारक इमारतीतील सुधारणा सोयी चांगल्या कराव्यात लॉन लावावी. त्याचे भाडे वाढवून मिळेल अशा सुधारणा कराव्यात.

मा.श्री उडाणशिवे भा.भि.- डॉ.बाबासाहेब आबेंडकर स्मारकाचे भाडे रूपये ५००/- गरिबांसाठी ठेवावे.

मा.सभापती साहेब - महावीर कला दालनाचे पुस्तक प्रदर्शनासाठीचे भाडे रूपये १०००/- किंवा २०००/- करावे.

मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- दारिद्र रेषेखालील कार्ड धारकांना रूपये ५००/- भाडे डॉ.बाबासाहेब आबेंडकर स्मारकाचे ठेवावे.

मा.सभापती साहेब - महालक्ष्मी गार्डनला मुलासाठी रूपये १/- प्रौढासाठी रूपये २/- पांच वर्षा पर्यतचे मुलांना मोफत प्रवेश ठेवावा.मनपा चे सर्व बागेत खेळण्या बसवाव्या.

मा.श्री गंधे मि.सु.- मटन मार्केट इमारती संबधी अंदाजपत्रकात स्लॉटर शब्द वापरू नये.
बेग पटांगण - मटन मार्केट करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बुरूडगांव भाजी मार्केटचे जागी तळ घरास भाजी मार्केट वर भव्य शॉपिंग कॉम्लेक्स करावा.

मा.श्री जोशी अ.सु.- आमचे प्रभागात छोटी लायब्ररी चालू करावी.

मा.श्री गंधे मि.स.- महावीर कला दालन येथील लायब्ररी हुतात्मा स्मारक येथे आणावी.

मा.श्री जोशी अ.सु.- सावेडी क्रिडा संकुलात भरपुर जागा आहे तेथे ग्रंथालय करावे.

मा.श्री सादिक - हातगाडी वाले भंगार शहर हद्यी बाहेरून आणतात त्यांना जकात लावली जाते ती कमी करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- गुंठेवारी विकास फि वसुलीसाठी घर पट्टीचे बील बरोबर गुंठेवारी विकास फि चे हि बील प्रॉपटी धारकांना द्यावे.मनपा कर्मचा-याचे पाचवे वेतन आयोगाची थकबाकी देण्यांत यावी.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.,मा.श्री चोपडा सं.फु.- सारस नगर मधील ओढया वरील पुल कमकुवत झाला आहे. तो नविन बांधण्यासाठी नविन तरतुद करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.,मा.श्री चोपडा सं.फु- पारगमन फि चे सन २००६-२००७ चे उत्पन्न पाा कोटी धरले आहे. ते रूपये ९ कोटी धरावे.

मा.श्री चोपडा सं .फु - जकात दर अनुक्रमे नं.९ वनस्पती तूप,खाद्य तेले इत्यादीवर आकारलेली जकात वजनावर करावी .किमान दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे ठरवावा.

मा.श्री गंधे मि.स.- साखर इत्यादी अनुक्रमे नं. ६ मधील प्रस्तावीत दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे ठरवावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- मिरची इ.अनुक्रमे प्रस्तावीत तीन व एक ऐवजी प्रति पोत्यास किमान रू.१०/- व कमाल रूपये ५/- धरावी.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- फटाके इत्यादीवर जकात प्रस्तावीत नाही. ती किमान रूपये २/- कमाल ७/- ठरवावी.

मा.सभापती साहेब - डिझेल तेलावरील प्रस्तावीत किमान १ १/२ ऐवजी रूपये १/- ठरवावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- सोन्या चांदीवर अनुक्रमे नं.५४ वर प्रस्तावीत केलेली रूपये ३ /- रूपये १/- ची जकात कमी करून किमान रूपये ५/- व १/- ठेवावी.
जड वाहनाचे टायर टयुब वर जकात रूपये ४/- व १/- ठरवावी. अंबाडी व अंबाडी दोरावर रूपये २/- किमान ०.५० पैसे ठरवावी.

मा.श्री उडाणशिवे भा.भि.- भंगार गोळा करणा-या साठी विमा उतरवा. आपला खर्च कमी येईल.

मा.सभापती साहेब - उडाण कुत्रयाचे नसबंदी साठी तरतुद वाढवीत यावी.

मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- इलेक्ट्रीकल पोल हालविणे प्रस्तावीत तरतुद वाढवून एक कोटी करावी. हातगाडया खरेदी तरतुद वाढवून १० लाख करावी.क्रिडा खर्च १ लाख ३७ हजार ऐवजी २ कोटी करावी.

मा.श्री जोशी अ.सु.- बागेची खेळीसाठी ५० हजाराची तरतूद वाढवून ५ लाख करावी.

ट्री गार्ड साठी ५ लाख करावी. शहरातील मुख्य रस्तेचे डांबरीकरण करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- ले आउटचे अंतर्गत सुधारणेचे पैसे आल्यानंतर ही कामे त्वरीत करावे.प्रभाग समित्या नेमण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब - प्रत्येक नगरसेवकांना त्याचे वॉर्डातील तातडीच्या कामासाठी रक्कम रूपये ५० हजाराची तरतुद धरावी.

मा.श्री जोशी अ.सु.,मा.श्री गंधे मि.स.- नविन ड्रेनेज लाईन साठी २ कोटीची तरतूद करावी. टॅन्कर द्वारे पाणी पुरवठयाची तरतूद रूपये २५ लाख ठेवावी.

मा.श्री गधे मि.स.- भिगारदिवे मळा,प्रोफेसर कॉलनी ,सावेडी येथे जागा पाहून पे पार्क च्या साई ड विकसीत कराव्यात.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- कोठीवरील जुने संडास पाडून पे ॲण्ड युज अंतर्ग त तीस शिटचे सुलभ शौचालय बांधावे व तरतुद करावे.

मा.श्री चोपडा सं.फु.- पॉर्किग साठी मनपा कार्या लयात शेड तयार करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- चर्चा न झालेल्या मुद्यावर मा.जनरल बोर्डा मध्ये सविस्तर चर्चा करण्यांत यावी जनरल बोर्ड सभागृहाचे नुतनी करण करून नविन फर्निचर घ्यावे.

सर्व नगरसेवक -मा.श्री चव्हाण दि.ना.- इतर महानगरपालिकेमध्ये विशेष स्वच्छता कर नाही तो बदलणे आवश्यक नाही. तो बदलणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब ,मा.श्री गंधे मि.स.- मननाने परवानगी दिलेल्या जाहिरात बोर्डा वर परवानगीचा क्रमांक दिनांक मुदत इत्यादीचा उल्लेख करण्यांत यावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- परवानगी व्यक्तीरिक्त असलेल्या हॉटेल ,हातगाडयावर खादय पदार्थ विकणारे इ.व्यवसायांकावर अन्न भेसळ कायदयानुसार कार्यवाही करावी.

मा.श्री जोशी अ.सु. - मनपाचे शॉपिंग सेंटर मधील थकबाकी दारा कडून थकबाकी वसूल करावी करार संपलेले गाळे ताब्यात घ्यावे. उत्पन्न वाढी साठी कार्यवाही करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- डॉ.बाबासाहेब आबेंडकर इमारतील सुधारणा सोयी करण्यांत यावे. लॉन लावावी. त्याचे भाडे वाढवून मिळावे अशा सुधारणा कराव्यात.

मा.श्री उडाणशिवे भा.भि.- डॉ.बाबासाहेब आबेंडकर स्मारकाचे भाडे रूपये ५००/- गरिबांसाठी ठेवावे.

मा.सभापती साहेब - महावीर कला दालनाचे पुस्तक प्रदर्शनासाठीचे भाडे रूपये १०००/- व ५०००/- करावे.

मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- दारिद्र रेषेखालील कार्ड धारकांना रूपये ५००/- भाडे डॉ.बाबासाहेब आबेंडर स्मारकाचे ठेवावे.

मा.सभापती साहेब - महालक्ष्मी गार्डनला मुलासाठी रूपये ३/- प्रौढासाठी रूपये ५/- करावे.सिध्दी बागेत खेळण्या बसवाव्या.

मा.श्री गंधे मि.सु.- मटन मार्केट इमारती संबधी अंदाजपत्रकात स्लॉटर शब्द वापरू नये. बेग पटांगण - मटन मार्केट करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बुरूडगांव भाजी मार्केटचे जागी तळ घरास भाजी मार्केट वर भव्य शॉपिंग कॉम्लेक्स करावा.

मा.श्री शेख मुदस्सर - बोट टाईप गेस्ट हाउस चे मोकळया जागेत मंगल कार्यालया साठी उपयोगात आणावी.

मा.श्री जोशी अ.सु.- आमचे प्रभागात छोटी लायब्ररी चालू करावी.
मा.श्री गंधे मि.स.- महावीर कला दालन येथील लायब्ररी हुतात्मा स्मारक येथे आणावी.
मा.श्री जोशी अ.सु.- सावेडी क्रिडा संकुलात भरपुर जागा आहे तेथे ग्रंथालय करावे.
मा.श्री सय्यद सादिक - हातगाडी वाले भंगार शहर हद्दी बाहेरून आणतात त्यांना जकात लावली जाते ती कमी करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- गुंठेवारी विकास फि वसुलीसाठी घर पट्टीचे बील बरोबर गुंठेवारी विकास फि चे हि बील प्रॉपटी धारकांना द्यावे.मनपा कर्मचा-याचे पाचवे वेतन आयोगाची थकबाकी देण्यांत यावी.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.,मा.श्री चोपडा सं.फु.- सारस नगर मधील ओढया वरील पुल कमकुवत झाला आहे. तो नविन बांधकाण्यासाठी नविन तरतुद करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.,मा.श्री चोपडा सं.फु- पारगमन फि चे सन २००६-२००७ चे उत्पन्न पाा कोटी धरले आहे. ते रूपये ९ कोटी धरावे.
मा.श्री चोपडा सं .फु - जकात दर अनुक्रमे नं.९ वनस्पती तूप,खाद्य तेले इत्यादीवर आकारलेली जकात वजनावर करावी .किमान दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे ठरवावा.
मा.श्री गंधे मि.स.- साखर इत्यादी अनुक्रमे नं. ६ मधील प्रस्तावीत दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे ठरवावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- मिरची इ.अनुक्रमे प्रस्तावीत तीन व एक ऐवजी प्रति पोत्यास किमान रू.१०/- व कमाल रूपये ५/- धरावी.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- फटाके इत्यादीवर जकात प्रस्तावीत नाही. ती किमान रूपये ७/- कमाल २/- ठरवावी.
मा.सभापती साहेब - डिझेल तेलावरील प्रस्तावीत किमान १ १/२ ऐवजी रूपये १/- ठरवावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- सोन्या चांदीवर अनुक्रमे नं.५४ वर प्रस्तावीत केलेली रूपये ३ /- रूपये १/- ची जकात कमी करून किमान रूपये ५/- व १/- ठेवावी.
जड वाहनाचे टायर टयुब वर जकात रूपये ४/- व १/- ठरवावी. अंबाडी व अंबाडी दोरावर रूपये २/- किमान ०.५० पैसे ठरवावी.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.- भंगार गोळा करणा-या साठी विमा उतरवा. आपला खर्च कमी येईल.
मा.सभापती साहेब - उडाण कुत्रयाचे नसबंदी साठी तरतुद वाढवीत यावी.
मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- इलेक्ट्रीकल पोल हालविणे प्रस्तावीत तरतुद वाढवून एक कोटी करावी. हातगाडया खरेदी तरतुद वाढवून १० लाख करावी.क्रिडा खर्च १ लाख ३७ हजार ऐवजी २ कोटी करावी.
मा.श्री जोशी अ.सु.- बागेची खेळीसाठी ५० हजाराची तरतूद वाढवून ५ लाख करावी.
ट्री गार्ड साठी ५ लाख करावी. शहरातील मुख्य रस्तेचे डांबरीकरण करावे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- ले आउटचे अंतर्गत सुधारणेचे पैसे आल्यानंतर ही कामे त्वरीत करावे.प्रभाग समित्या नेमण्यात याव्यात.
मा.सभापती साहेब - प्रत्येक नगरसेवकांना त्याचे वॉर्डातील तातडीच्या कामासाठी रक्कम रूपये ५० हजाराची तरतुद धरावी.व्यायाम शाळा बांधण्यासाठी अंदाज पत्रकात तरतूद केलेली नाही. ती रक्कम रू.२० लाख करावी.

मा.श्री जोशी अ.सु.,मा.श्री गंधे मि.स.- नविन ड्रेनेज लाईन साठी २ कोटीची तरतूद करावी. टॅन्कर द्वारे पाणी पुरवठयाची तरतूद रूपये २५ लाख ठेवावी.

मा.श्री गधे मि.स.- भिगारदिवे मळा,प्रोफेसर कॉलनी ,सावेडी येथे जागा पाहून पे पार्क च्या साई ड विकसीत कराव्यात.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- कोठीवरील जुने संडास पाडून पे ॲण्ड युज अंतर्ग त तीस शिटचे सुलभ शौचालय बांधावे व तरतुद करावे.

मा.श्री चोपडा सं.फु.- पॉर्किग साठी मनपा कार्या लयात शेड तयार करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- चर्चा न झालेल्या मुद्यावर मा.जनरल बोर्डा मध्ये सविस्तर चर्चा करण्यांत यावी जनरल बोर्ड सभागृहाचे नुतनी करण करून नविन फर्निचर घ्याव

सर्व मा. सदस्य -

शहरातील रस्ते - डांबरीकरण करणे.

१. वाडिया पार्क ते मनपा कार्यालय ते होशिंग हॉस्पीटल ते सबजेल चौक पर्यत
   ब ) होशिंग हॉस्पिटल ते मजूर अड्डा ते स्वामी विवेकानंद चौक ते मैदान आड लक्ष्मीबाई कारंजा पर्यत
   क) मजूर अड्डा ते तख्ती दरवाजा पर्यत ते आझाद चौक ते लक्ष्मीबाई कारंजा.

१. वसंत किर्ती ते संत निरंकारी भवन प्रोफेसर कॉलनी पर्यत.

२. अण्णाभाड साठे चौक ते करंदीकर हॉस्पीटल पर्यत करंदीकर हॉस्पीटल ते बालिकाश्रम रस्त्यापर्यत

३. रेल्वे स्टेशन ते मल्हार चौका पर्यत .

४. अ) मनपा कार्यालय ते सबजल चौक ते दो बोटी चिरा ते झारेकर गल्ली ते दिल्लीगेट पर्यत
   ब) दो बोटी चिरा ते पटवर्धन चौक ते चितळे रोड पर्यत.

५. मनपा कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय ते पोस्ट ऑफिस पर्यत.

६. माळीवाडा वेस ते पंचवीर चावडी पर्यत.

७. भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा दक्षिण मुखी मारूती मंदिरा पर्यत

८. आदर्श कॉलनी प्रोफेसर कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.

९. चौपाटी कारंजा ते तेलीखुंट पॉवर हाउस पर्यत.

सन २००६-२००७ सालचे बाबवार जमा खर्चाचे अंदाज पत्रकावर व सन २००६-२००७ या आगामी वर्षा पासून जकात कराचे फि वाढ घट करणे बाबात जकात अभ्यास समितीचा चे अहवालावर सभे मध्ये सखोल साधक -बाधक सविस्तर चर्चा करणेत येवून ही सभा सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्यानुसार जकात करामध्ये वाढ घट करणेस तसेच अहमदनगर महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्ड भिंगार या दोहोच्या ही क्षेत्रात संयुक्त जकात कर वसुली बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव निर्णयार्थ मा.मनपा सभे पुढे सादर.

तसेच मा.स्थायी समिती सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे जकात नियम २००५ मधील नियमामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

१. जकात नियम २००५ मधील नियम १७ मध्ये सुधारणा

सोने चांदीचे जकात चुकवेगिरी प्रवृत्ती बाबत - अभ्यास समितीने कठोर कारवाईची शिफारस केलेली आहे. त्या मुळे नियम १७ मध्ये खालील प्रमाणे पोट कलम सुधारणा करण्यांत येत आहे.

नियम १७ (६) वरील पोट कलमांत काहीही तरतुद असली तरी जकात चुकवून आणलेला माल हा अनुसुची एक मधील बाब क्र.५४ मधील असल्यास त्यासाठी दंड किंवा तडजोड फि साठीची मर्यादा चुकविलेल्या मालाच्या जकात रकमेच्या किमान दहा पट व कमाल वीस पट अशा राहतील अशा राहतील व त्या वरील प्रमाणे योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

२. केवळ जॉब वर्क साठी फेर निर्यातीसाठी केलेल्या माला बाबत अहमदनगर महानगरपालिका हद्यीमधील लघु उद्योजकांनी शहर हद्यीत केवळ जॉब वर्क करून फेर निर्याती साठी आयात केलेल्या मालावर जकात आकारणी न करण्याचा विनंती केलेली आहे. शहर हद्यी मधील उद्योजकांचे विनंतीचाही विचार करून नियम २७ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

नियम २७ (२) नियम २७ चे पोट कलम १ नंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यांत येत आहे.

परंतु नियम २४ (३) किंवा अन्य तरतुदी नुसार केवळ जॉब वर्क अथवा जुळणीसाठी शहर हद्यीत आयात झालेला माल पुन्हा शहर हद्यी बाहेर फेर निर्यात करतांना वरील तरतुदी नुसार गणना केलेल्या प्रशासकीय खर्चा पेक्ष प्रत्यक्ष जॉब वर्क वरील मुजूरीच्या १८ % रकमे पेक्षा प्रशासकीय खर्च जास्त होत असल्यास जॉब वर्क चे मंजूरीच्या रकमेच्या १% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वसुल करणेत येईल.

तसेच सन २००६-२००७ सालचे अंदाज पत्रका मध्ये सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्श विल्या नुसार अंदाजीत रक्कमा कमी जास्त करणेस तसेच जकात करा मध्ये मा.स्थायी समितीने सुचविलेल्या फेर बदला प्रमाणे दरा मध्ये बदल करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या प्रती छापून घेवून मनपा सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारशी सह सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२००७ सालचे बाबवार अंदाजपत्रक स्कूल बोर्डाच्या शेअर्स सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - मा.श्री चव्हाण दि.ना.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

सोबत - १. सन २००६-२००७ चे मूळ अंदाजपत्रकात केलेले बदल .

२. जकात अभ्यास कर समितीने सादर केलेल्या प्रस्तावीत दरामध्ये केलेल्या वाढ घटी बाबत तक्ता.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.८

विषय क्रमांक - १ दिनांक २५/१०/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक २५/१०/२००६

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील खड्डे( खडीकरण,सेमी ग्राउंट व ओपन ग्रेडेड कारपेट सिलकोट सह) भरणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तवाचा मजकूर** - उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट कि, उपरोक्त कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनुसार सदर कामाची जाहीर निविदा दै.लोकमत या वर्तमान पत्रामध्ये जाहीर प्रसिध्दी देवून को-या निविदा दि.५/१०/२००६ ते दि.११/१०/२००६ अखेर विक्री करण्यात आली दि.१६/१०/२००६ रोजी सिलबंद निविदा स्विकारण्यांत आल्या. सदर निविदा मा.आयुक्त यांचे परवानगीने मा.शहर अभियंता ,यांचे कार्यालयात दि.१६/१०/२००६ रोजी सायं.५.३० वाजता उघडण्यात आल्या त्या मध्ये खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | निवीदा धारकाचे नांव | निवीदेत आलेले दर |
|---|---|---|
| १. | श्री राजेंद्र जाधव | निविदा दरापेक्षा २२% जादा दराने |
| २. | मे.मनिषा कन्स्ट्र. | निविदा दरापेक्षा २५.५१% जादा दराने |
| ३. | मे.ए.सी. कोठारी | निविदा दरापेक्षा १५.२५% जादा दराने |

प्राप्त निविदा पैकी क्रमांक ३ ची मे.ए.सी.कोठारी ,यांचे निविदातील दर निविदा रकमेपेक्षा १५.२५% जास्त हे दर सर्वात कमीचे आहेत.

अंदाजपत्रकामध्ये डांबराचे दर रू.२३२१४/- प्रती मे.टन इतके धरलेले आहेत. दि.१६/१०/२००६ रोजी डांबराचे दर इंडियन ऑईल कार्पो .लि.यांचे रू.२५,१२५.१२/- इतके आहेत. त्यानुसार अंदाजपत्रकामधील डांबराचे दर व प्रत्यक्ष बाजारातील डांबराचे दर याची तुलना करता रक्कम रू.१९११.१२/- प्रती मे. टन इतकी तफावत आढळून येत आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम + बाजार भावातील तफावत व ठेकेदाराने टेंडरमध्ये नमूद केलेले दर यांची तुलना करता प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय रक्कम + बाजारभावातील तफावत यांच्या पेक्षा ११.३८% जादा आहेत.

तरी निविदेतील सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकास वाटाघाटीसाठी बोलाविणे योग्य वाटते. आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा दि.१६/१०/०६ चा अहवाल असे.

शहर अभियंता - संबधीत ठेकेदारास वाटावाटीसाठी बोलविणे सयुक्तीक राहील असे वाटते. कामाचे स्वरूप अत्यंत तातडीचे असल्यामुळे फेरनिविदा काढण्यात फारच वेळ जाईल. त्याप्रमाणे वाजवी दर आल्यास सदर काम मंजूरीसाठी स्थायी समितीसमोर सादर करणे शक्य होईल. पुढील आदेशासाठी सविनय सादर.दि.१६/१०/०६.

अंतर्गत लेखा परिक्षक - शहर अभियंता याचे कडील प्रस्तावा प्रमाणे निगोशिएशन करिता बोलाविणेस हरकत नाही.

शहर अभियंता - संबधीत ठेकेदाराशी आज दि. १७/१०/२००६ रोजी वाटाघाटी केल्या असता त्यांनी पूर्वी नमूद केलेले १५.२५% जादा हे दर १३.५०% जादा इतके कमी करण्याचे कबूल केलेले आहे. चालू दराशी तुलना करता सदर दर ९.६३% जादा इतके येतात. व सदर दर वाजवी आहेत त्याप्रमाणे मंजूरीसाठी स्थायी समितीकडे प्रकरण सादर करणेस हरकत नाही. पुढील आदेशासाठी सविनय सादर. दि.१७/१०/०६.

अंतर्गत लेखा परिक्षक - शहर अभिंयता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर) - प्रस्तावीत दर चालू बाजारभावाशी तुलना करता ९.६३% जादा इतके आहेत. सबब फेरवाटाघाटीस बोलाविणे योग्य राहील. मान्यतेस्तव सादर.

मा.प्रभारी आयुक्त साहेब -'अ' सहमत.

शहर अभियंता - मे.ए.सी. कोठारी यांचेशी फेरवाटाघाटी केल्या असता त्यांनी वाटाघाटी अंती केलेले १३.५०% जादा हे दर ९.७१% जादा इतके कमी करायाचे कबूल केलेले आहे. सदर दर वाजवी वाटतात त्याप्रमाणे मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास हरकत नसावी असे वाटते. पुढील आदेशासाठी सादर.दि.१८/१०/०६.

मा.उपायुक्त साहेब (कर) - प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य

मा.प्रभारी आयुक्त साहेब - प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवा. कामाची तातडी व रस्त्यांबाबत नागरिकांच्या तक्रारी विचारात घेवून २४ तासांची सभेची नोटीस काढून मंजूरी घेणे योग्य राहील.

मा.सभापती साहेब - सदर विषयाबाबत प्रभारी आयुक्त यांचेशी दि.१९/१०/२००६ झालेल्या चर्चे नुसार बुधवार दि.२५/१०/२००६ रोजी दुपारी १.०० वाजता स्थायी समितीची सभा बोलाविण्यांत यावी .

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री गंधे मि.स.- पंधरा लाखाचे दिलेल्या कामाची स्थिती सांगावी

मा.श्री जोशी अ.सु.- कोण कोणत्या रस्त्याची कामे घेतलेले आहेत.

शहर अभियंता श्री कुलकर्णी एन.डी - लालटाकी दिल्लीगेट ते आयुर्वेद कॉलेज ,हॉटेल यश पॅलेस ते कोठी व सर्जेपूरा श्रीराम पेट्रोल पंप ते कोठला स्टॅण्ड हे रस्ते कामासाठी घेतले आहेत.सध्या काम बंद आहे. उद्यापासून सुरू होईल.

मा.श्री जोशी अ.सु.- हॉटेल यश पॅलेस ते कोठी हा रस्ता आपले ताब्यात आहे का ?

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - होय.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- पांच पांच लाख एका रस्त्यावर खर्च करतो आहेत. त्या खर्चात रस्त्याचे रस्त्याचे डांबरीकरण होईल

शहर अभियंता एन.डी कुलकर्णी - प्रत्यक्ष कामाचे मोजमाप घेवून बीले काढणेत येतील.

मा.श्री उडाणशिवे भा.भि.- पांच लाखाचे वाढून सहा लाख खर्च होईल का ?

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - नाही.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- वाढीव खर्चाला मंजूरी घ्यावी लागेल.

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.- पांच लाखा प्रमाणेचे तीन रस्त्याचेच काम का घेतले

मा.श्री जोशी अ.सु.- कामाचे तातडीची आवश्यकता का वाटली .

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - मा.आयुक्त साहेब ,मा.महापौर साहेब,मा.उपमहापौर साहेब,मा.उपायुक्त साहेब, इंजिनिअर यांची मिटींग घेतली तेव्हा हे रस्ते रिपेअर करणेचे ठरले होते.

मा.प्रभारी आयुक्त साहेब - मिटींग मध्ये हे तीन रस्ते तातडीने दुरूस्त केल्यास नागरिकांच्या तक्रारी कमी होतील. म्हणून कामे हाती घेतली.

मा.सभापती साहेब - अर्जंट कामे करावयाची होती पण दिवाळीत कामे बंद आहेत.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - सणामुळे लेबर कामावर येत नाहीत

मा.श्री जोशी अ.सु.- हॅाटेल यश पॅलेस ते कोठी रस्त्यावर फक्त मुरूम टाकला जात आहे.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - डांबराने खडडे बुजविणार आहोत.

मा.श्री खैरे दि.सा.व मा.श्री त्रिपाठी सु.चं.- टिळक रोडच्या गटारी चे काम चांगले झालेले नाहीत.त्याची चौकशी व्हावी गटर मधून पाणी वाहीलेले नाही. काही भागातील गटर पडली आहे.

मा.प्रभारी आयुक्त श्री देशमुख साहेब - एस्टिमेट मध्ये दर्शविलेल्या नुसार कामे झालेली आहेत.

उपशहर अभियंता मगर साहेब - मोटाराने धडक दिल्याने गटरचा काही भाग पडलेला आहे.

मा.श्री जोशी अ.सु.- मनपा कामांचे ठेकेदारा कडून काही गॅरंटी वैगरे घेतो का ?

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - पूर्वी घेत नव्हतो आता घेतो आहोत.जास्तीत जास्त एका वर्षाची

मा.प्रभारी आयुक्त श्री देशमुख साहेब - एका वर्षाची गॅरंटी रहाते पाउस पडला तर लायबलिटी कमी रहाते.

मा.श्री जोशी अ.सु.- यापुढे डिफेक्ट लायबलिटीची अट टाकणेत यावी.

मा.श्री गंधे मि.स.- ठेकेदारांने रस्त्या वरील दोन फुटाचे खडडे भरले व ५ x ५ फूटाचे कारपेट केले तर आपण काय करणार.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - प्रत्येक रस्त्यावर त्यासाठी दोन लेबर ठेवलेले आहेत. त्यांना खडीच्या ट्रीपा ही मोजण्यास सांगितल्या आहेत.

मा.सभापती साहेब - श्री ऐ.सी कोठारी यांना अद्याप पर्यत दिलेली कामे त्यांनी पूर्ण केलेली आहेत का ?

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - बरीचे कामे पेडींग आहेत.

मा.श्री दातरंगं अ.भा.- आगरकर मळा येथील टाकीचे काम अपूर्ण आहे.

मा.सभापती साहेब - किती कामे दिलेली आहेत.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - मोहनी नगर ,आगरकर मळा पाण्याच्या टाकीचे व अप्पू चौक ते दिल्ली गेट रस्ता व गटरची कामे दिलेली आहेत.बीले मिळाली नाही असे ते म्हणतात.

मा.श्री जोशी अ.सु.- दिल्लीगेट अप्पु हत्ती चौकापर्यतचे रस्त्याचे काम अपूर्ण आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं- मा. देवरा साहेबाचे काळात काम दिलेले आहे.

मा.सभापती साहेब - बागरोजा येथील गटरीचे कामाचे काय झाले तेथे आंदोलन झाले होते.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - तेथील छोटया ड्रेनेचे काम मंजूर आहे मोठे काम मंजूर नाही.

मा.सभापती साहेब - रस्ते दुरूस्तीचे आलेले टेंडर दर जादाचे आहे.सदर ठेकेदार कामे लवकर पूर्ण करीत नाही नागरीक तक्रार करतात.

मा.श्री जोशी अ.सु.- ठेकेदार ऐ.सी कोठारीचे नांव ब्लॅक लिस्टला टाकलेले आहे का ?

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - नाही.

मा.श्री त्रिपाठी सु.चं. - ज.बो.मध्ये श्री हिरे साहेबांनी एका महिन्यात काम पूर्ण न केल्यास ठेकेदार कोठारीचे नांव ब्लॅक लिस्टला टाकावे असे म्हटलेले होते.

मा.प्रभारी आयुक्त श्री. देशमुख साहेब - ठेकेदाराने मुदतीत काम सुरू केले तर केलेल्या कामाच्या टप्प्या नुसार रितसर बीले दिली जातात. अशी रितच आहे.

मा.श्री शेख मुदस्सर अ. इ.- रस्ता रिपेअरचे १५ लाखाचे दिलेले काम रस्त्यावर मुरूम टाकून होत आहे तसे होवू नये खडी डांबर टाकून खडडे बुजवावेत.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- ऐ.सी.कोठारी यांची बरीच कामे पूर्ण नसल्याने व ते घेतलेली कामे पूर्ण करीत नाहीत.त्यामुळे नारिकांचे रोषाला नगरसेवकांना बळी पडावे लागते. सदर कामी फेर निवीदा मागवाव्यात.

मा.श्री लोंढे सु.सो.- फेर टेंडर काढावे हे नामंजूर करावे.

मा.सभापती साहेब - ठेकेदार ऐ.सी कोठारी यांना दिलेली प्रलंबित कामे प्रथम पूर्ण करून घ्यावीत तो पर्यत त्यांना काम देवू नये. आलेले निविदा दर जादाचे असल्याने नामंजूर करून सदर कामासाठी सात दिवसाची नोटीस देवून फेर जाहीर निविदा मागवावी.

शहर अभियंता श्री एन.डी कुलकर्णी - त्यास पंधरा दिवसाचा कालावधी लागेल.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील खड्डे (खडीकरण सेमी ग्राडन्ट व ओपन ग्रेडेड कारपेट सिलकोट सह) भरणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर सभे मध्ये झालेल्या सविस्तर साधक बाधक चर्चे नुसार कमीचे निविदा दर धारक श्री ऐ.सी.कोठारी यांनी महानगरपालिकेची अद्याप पर्यत घेतलेली बरीच कामे पूर्ण केलेली नसल्याने नागरिक तक्रार करतात. व त्याची निविदा दर निविदा रकमे पेक्षा जास्तीचे आल्याने त्याचे आलेले निविदा दर नामंजूर करण्यांत येत आहे.

सदर कामी सात दिवसाची जाहीर नोटीस देवून फेरनिविदा मागविण्यांत याव्यात तसेच ना मंजूर निविदा धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री त्रिपाठी सु.चं.

अनुमोदक - मा.श्री लोढे सु.सो.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका